
किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर व्दारा,संचलित-
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर
e.. आसूड
वार्षिक अंक -२०१६-१७
NAAC Accredited 'B' Grade
कॅशलेस व्यवहारावर आज जनता बँकेतर्फे व्याख्यान
Digital India
Power To Empower
Email- mpmahmedpur@gmail.com
web-www.mpmahmedpur.in


महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर
कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर
संस्थापक
किसान शिक्षण प्रसारक मंडळ,उदगीर



किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर व्दारा, संचलित -
महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर जि.लातूर
आसूड
वार्षिक अंक -२०१६-१७
प्रकाशक व संपादक
प्राचार्य डॉ.वसंत बिरादार
कार्यकारी संपादक
डॉ.प्रशांत बिरादार
सहसंपादक
डॉ.अनिल मुंढे
प्रा.ससाणे एस.जी.
मुखपृष्ठ,संकल्पना व मांडणी
प्रा.एस.एच.गर्जे
छाया
प्रा.पी.एम.इंगळे
मुद्रक
दिनेश ऑफसेट,अहमदपूर
9881397999,9420403421


महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर
आमचे प्रेरणास्थान
आसूड
२०१६-१७
* डोळस नेतृत्व *
अध्यक्ष
मा.अशोकराव पाटील एकंबेकर
सहसचिव
मा.श्री.आर.के.देशमुख
कोषाध्यक्ष
मा.श्री.श्रीरंगराव ज्ञानोबा पाटील
व सर्व सन्माननीय कार्यकारिणी सदस्य,किसान प्रसारक मंडळ,उदगीर जि.लातूर


महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर
आसूड
२०१६-१७
विनम्र अभिवादन
दिव्यत्त्वाची जिथे प्रचिती...तिथे कर आमचे जुळती..!
ज्ञानियांचा राजा
कै.ॲड.सी.पी.पाटील
(सचिव,कि.शि.प्र.मंडळ,उदगीर)
सहकार महर्षी
कै.रामचंद्रराव पाटील तळेगावकर
(उपाध्यक्ष,कि.शि.प्र.मंडळ,उदगीर)
सुंदर ते ध्यान...
कै.मा.श्री.आप्पाराव जाधव
(सदस्य,कि.शि.प्र.मंडळ,उदगीर)


आसूड
२०१६-१७
शिस्तप्रिय प्रशासक
डॉ.वसंत बिरादार
प्राचार्य
महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर
ता.अहमदपूर जि.लातूर.



# आसूड

## २०१६-१७

## किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर जि. लातूर

# कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. श्री.अशोकराव पाटील एकंबेकर | अध्यक्ष |
| २. | मा.रावसाहेब किशनराव देशमुख | सहसचिव |
| ३. | श्री. श्रीरंगराव ज्ञानोबा पाटील | कोषाध्यक्ष |
| ४. | श्री. पांडुरंग तुळशीराम शिंदे | सदस्य |
| ५. | श्री. ज्ञानदेव रामभाऊ झोडगे | सदस्य |
| ६. | श्री. गुंडेराव भाऊराव पाटील | सदस्य |
| ७. | श्री.गोविंदराव बच्चाजी बिरादार | सदस्य |
| ८. | श्री. विजयकुमार बाबाराव पाटील | सदस्य |
| ९. | श्री.अजित केशवराव पाटील | सदस्य |
| १०. | श्री. विश्वनाथ मुकुंदराव बेळकोणे | सदस्य |

# किसान शिक्षण प्रसारक मंडळाचा विस्तार

| अ.क्र. | मंडळांअंतर्गत शाखा |
|---|---|
| १ | शिवाजी वरिष्ठ महाविद्यालय, उदगीर |
| २ | शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, उदगीर |
| ३ | महात्मा फुले वरिष्ठ महाविद्यालय, अहमदपूर |
| ४ | महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय, अहमदपूर |
| ५ | महात्मा फुले प्राथमिक विद्यालय, अहमदपूर |
| ६ | महात्मा फुले माध्यमिक विद्यालय, अहमदपूर |
| ७ | सावित्रीबाई फुले मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, अहमदपूर |
| ८ | विद्यावर्धिनी प्राथमिक विद्यालय, उदगीर |
| ९ | विद्यावर्धिनी माध्यमिक विद्यालय, उदगीर |
| १० | विद्यावर्धिनी इंग्रजी (माध्यम) प्राथमिक शाळा, उदगीर |
| ११ | विद्यावर्धिनी इंग्रजी (माध्यम) माध्यमिक शाळा, उदगीर |
| १२ | जिजामाता मुलींचे वसतिगृह, उदगीर |
| १३ | शिवाजी विद्यालय, हंडरगुळी ता.उदगीर |
| १४ | शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, हंडरगुळी ता.उदगीर |
| १५ | किसान मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, हंडरगुळी ता.उदगीर |
| १६ | निर्मलपुरी विद्यालय, हेर ता.उदगीर |
| १७ | निर्मलपुरी कनिष्ठ महाविद्यालय, हेर ता.उदगीर |
| १८ | जिजामाता विद्यालय, तोंडचीर ता.उदगीर |
| १९ | नागाबुवा विद्यालय, हेळंब ता.देवणी |
| २० | नागाबुवा मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, हेळंब ता.देवणी |
| २१ | शाहू विद्यालय, शेळगाव ता.चाकूर |

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर.
उत्कृष्ट परीक्षा केंद्र

## प्रमाणपत्र

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या वतीने मार्च/एप्रिल 2002 मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेसाठी आपल्या महाविद्यालयाची जिल्ह्यातील उत्कृष्ट परीक्षा केंद्र म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे अभिनंदन !

करिता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

दिनांक : 21 सप्टेंबर, 2002

डॉ. शेषराव सूर्यवंशी
कुलगुरू

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

*An Autonomous Institution of the University Grants Commission*

# Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
on the recommendation of the duly appointed
Peer Team is pleased to declare the
Mahatma Phule Mahavidyalaya
Ahmedpur, Dist. Latur,
affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University,
Maharashtra as

**Accredited**

with CGPA of 2.11 on seven point scale
at B grade
valid up to November 04, 2021

Date : November 05, 2016


Director

EC(SC)/18/A&A/106.1

## रजत पदक मानकरी







प्रमाण-पत्र

'गांधी विचार संस्कार परीक्षा'

चि. / कु. माने रोहिणी मारोतीराव तृतीय वर्ष

महात्मा फुले महाविद्यालय में

आयोजित 'गांधी विचार संस्कार परीक्षा' 2016 में सहभागी होने के उपलक्ष्य में

यह प्रमाण-पत्र प्रदान किया जा रहा है।

महात्मा गांधी के विचार रूपी संस्कार पथ पर चलने के लिए आपका हार्दिक अभिनंदन!

अशोक जैन
विश्वस्त

चंद्रशेखर धर्माधिकारी
चेयरमैन

गांधी रिसर्च फाउंडेशन जलगांव

गांधी तीर्थ, जैन हिल्स, पो. बॉ. नं. ११८, शिरसोली रोड, जलगांव ४२५००१ (महाराष्ट्र). वेबसाईट: www.gandhifoundation.net

त्याग के बिना मनुष्य का विकास नहीं हो सकता।

बी.ए.तृतीय वर्षाची विद्यार्थिनी **कु.माने रोहिणी मारोतीराव** ही सर्व व्दितीय आलेली आहे.यानिमित्य तिला मिळालेले **प्रमाणपत्र व रजत पदक**.



कु. भदाडे वैष्णवी शेषराव
(बी.ए. तृतीय वर्ष)



बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर व्दारा संचलित,

**महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर**

NAAC Accredited 'B' Grade

छात्र आम्ही एम.पी.एम.चे । घडवू राष्ट्र उद्याचे ।।

**कॉलेज आयडॉल प्रमाणपत्र**

श्री/कु. वैष्णवी शेषेराव भदाडे वर्ग बी.ए.तृतीय वर्ष यांनी IQAC अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कॉलेज आयडॉल परीक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

आपली गुणवत्ता राष्ट्रोद्धारास प्रेरक ठरो..!

प्रभारी सहाय्यक प्राध्यापक

प्राचार्य

दिनांक : १६ मार्च २०१७

# अनुक्रमणिका


| अ.क. | उपोद्घात | पृष्ठ क |
|---|---|---|
| | कॅशलेस पूर्वी | १५—१९ |
| | संपादकीय | २१—२१ |
| | महाविद्यालय गीत | २२—२२ |
| | ॲल्युमिनी टॉक्स | २३—३४ |
| | कॅशलेस | ३५—७८ |
| | **विभागनिहाय अहवाल** | ७९—१३५ |
| १. | मराठी विभाग | ८०—८४ |
| २. | हिंदी विभाग | ८५—८९ |
| ३. | इंग्रजी विभाग | ९०—९२ |
| ४. | संस्कृत विभाग | ९३—९५ |
| ५. | इतिहास विभाग | ९६—१०० |
| ६. | समाजशास्त्र विभाग | १०१—१०५ |
| ७. | राज्यशास्त्र विभाग | १०६—१०९ |
| ८. | भूगोल विभाग | ११०—११४ |
| ९. | अर्थशास्त्र विभाग | ११५—११९ |
| १०. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग | १२०—१२२ |
| ११. | क्रीडा विभाग | १२३—१२३ |
| १२. | सांस्कृतिक विभाग | १२४—१२६ |
| १३. | परीक्षा विभाग | १२७—१२८ |
| १४. | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठअभ्यासकेंद्र | १२९—१३० |
| १५. | ग्रंथालयविभाग | १३१—१३३ |
| १६. | गांधी विचार संस्कारविभाग | १३४—१३५ |

# कॅशलेस पूर्वी...

सध्याचा काळ हा संक्रमणाचा काळ आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचा काळ आहे. जो या काळात स्वत:मध्ये बदल घडवून आणेल तोच या काळात टिकणारा आहे. हा जसा सर्वांना लागू पडणारा अलिखित काळ आहे तोच काळ विद्यार्थ्यांनाही लागू पडणारा आहे. विद्यार्थी आणि परीक्षा यांचे नाते अतूट आहे. महाविद्यालय सुरु झाल्यापासून ते परीक्षा सुरु होईपर्यंत अविरतपणे ज्ञानदानाचे कार्य प्राध्यापक मंडळीकडून होत असते. ज्ञानदानाच्या प्रकियेत आणि गुणवत्तेच्या  दुष्ट चक्रात आजचा विद्यार्थी सापडला आहे. विद्यापीठीय परीक्षेचे निकाल लागल्यानंतर अनेक पालकांची मानसिकता ही वेगळी अनुभवयास मिळत आहे. परीक्षेचा निकाल कसाही लागला तरीही मुलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची आज नितांत गरजेचे आहे.

सर्वच मुलांची बौध्दिक क्षमता सारखी नसते. त्यामुळे सर्वच मुलांनी ८० ते १०० टक्के गुण मिळालेच पाहिजेत अशी अपेक्षा ठेवणे चूक आहे. मुलांनी टाटा, अंबांनीचा आदर्श नक्कीच ठेवावा. पण सर्वांनाच टाटा—अंबानी होता येणार नाही, याचीही जाणीव ठेवावी. सर्वसामान्य मुलांसाठी ७५ ते ८० टक्के गुण मिळवणे बरे असते पण यापेक्षा कमी गुण मिळाले, तर काही मुलांना आपले आता पुढे काय होईल? याची भीती वाटते हे आजच्या शिक्षणातले वास्तव आहे.

आपण पास होऊ याची मुलांना खात्री असतेच कारण त्याने अभ्यास करण्यासाठी मेहनत घेतलेली असते. याचबरोबर आपल्या शिक्षणासारखी आई—वडिलांनी केलेला खर्च यांचेही टेन्शन आजच्या मुलांमध्ये आढळून येत आहे. म्हणून आज पालकांनी आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांनी आपल्या विद्यार्थ्यांना, मुलांना यशपयशाचा विचार न करता प्रोत्साहन देऊन त्याच्या आवडीचा क्षेत्रात करिअर करण्याची परवानगी दिली, तर प्रत्येक विद्यार्थी,

विद्यार्थिनी उत्तम कामगिरी बजावून जीवनात नक्कीच यशस्वी होतील. आपले मूल ब्रिलियंट असावे, अशी प्रत्येक आई–वडिलांची इच्छा असते व त्यात काहीही वावगे नाही. कारण ती वात्सल्याची भावना असते, परंतू त्या वात्सल्याच्या भावनेला अट्टाहसाचे स्वरुप येऊ नये यामुळे आई–वडील व मुलांमधील संबंध "Condition apply" सारखे होतात.आजकाल शिक्षण म्हणजे नोकरी मिळविण्याचे साधन आहे. ही बहुतेक पालकांची मानसिकता आहे, परन्तु आता बदलत्या काळानुसार ही मानसिकता बदलण्याची गरज आहे.

आता मुलांना अभ्यासा बरोबरच आजूबाजूला घडणारे भौतिक स्थित्यंतरे, शासकीय, प्रशासकीय तसेच तंत्रज्ञानातील होणारे बदल पाहून नुसते डोळेझाक करुन चालणार नाही, तर त्यादृष्टीने विद्यार्थ्यांनी सक्षम बनले पाहिजे, नव्हे तर तसे विद्यार्थी तयार करणे काळाची गरज आहे. त्यातूनही विद्यार्थीकेंद्रबिंदू ठेवून सदरचा 'कॅशलेस'चा अंक आम्ही विद्यार्थ्यांच्याच स्वलेखनातून, त्यांच्या उत्कृष्ट लेखनाविष्कारातून साकार केला आहे. यातील लेखांचे अवलोकन केल्यानंतर आजचा विद्यार्थी बदलत्या तंत्रज्ञानाबद्दल किती जागरुक आहे, चौकस आहे, तसेच 'कॅशलेस' व्यवहाराची प्रक्रिया समजून घेतांनाही व घेतल्यानंतरही त्याचे आत्मभान किती असामान्य उंचीचे आणि प्रचंड खोली असलेले आहे ते जाणवते. यात कांबळे स्नेहा, वाडकर नेहा, ससाणे कैलास, गोरे शंकर, शिवदासे पल्लवी, काबलिया वैष्णवी सह इतर विद्यार्थ्यांचे लेख विशेष दर्जाचे आहेत. या 'कॅशलेस' वार्षिक अंकात महाविद्यालयाच्या पारंपरिक अंकाचे स्वरुपही अविकृत, अबाधित ठेवून त्यात आम्ही आमच्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला मुखरीत करण्यासाठी मुक्त वाङ्मयीन विचारपीठ उपलब्ध करुन दिले आहे. त्यात आमच्या महाविद्यालयाची आदर्श विद्यार्थीनी सौ.महादाबाई चौकटे व आदर्श विद्यार्थी राहूल गायकवाड यांच्या संपन्न व प्रतिभेचा स्वांग सुंदर आविष्कार करुन देणारे तसेच महाविद्यालयातील सहा. प्राध्यापकांचा आणि वातावरणाचा नेटका, नेमका, चेहरा आपल्या लेखातून त्यांनी आविष्कृत केला आहे. तसेच मुलांच्या गुणांच्या टक्केवारीबरोबर

त्यांच्यात दडलेल्या प्रतिभेला फुलवण्याचीही गरज आहे. आणि ते काम आमच्या महाविद्यालयाच्या 'आसूड' या वार्षिक अंकातून समर्थपणे केले जाते. जीवनातील यश जसे परीक्षेतील टक्केवारीवर अवलंबून असते तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वास दडलेला सुप्त गुणवंरही अवलंबून असते. पण काही व्यक्तींच्या जीवनातील यश—अपयश परीक्षेत मिळणाऱ्या टक्केवारीवरही अवलंबून नसते. तसे असते तर कमी शिकलेले धीरुबाई अंबानी, रिलायन्सचे साम्राज्य उभारु शकले असते का? सायन्समध्ये ९ टक्के गुण मिळविणारा सचिन तेंडुलकर क्रिकेटचा पहिल्या क्रमांकाचा खेळाडू झाला असता का? इयत्ता पहिलीत दीड दिवस शाळेत जाणारा अण्णाभाऊ साठे साहित्य—सम्राट बनला असता का? दुसरी इयत्ता शिकलेले पंढरीनाथ पाटील हे राज्यसभेचे खासदार होऊ शकले असते का? असे अनेक प्रश्न आपल्यासमोर उपस्थित होतात.

टक्केवारीबरोबर आता मुलांच्या प्रतिभाशक्तीला वाव मिळणारे वातावरण महाविद्यालयात निर्माण करणे गरजेचे आहे. स्नेहसंमेलन, काव्यवाचन, कथाकथन, युवक महोत्सव, विविध वाड्मय मंडळाची उद्घाटने, एन.एस.एस. क्रीडा विभाग यासारख्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पोषक वातावरण उपलब्ध करणे अपरिहार्य आहे. याचाच एक भाग म्हणून हा 'आसूड' होय. यात विद्यार्थ्यांनी आपल्यातील ललितलेखक, आपल्यातील प्रतिभा संपन्नता, आपले लेखन कौशल्य, भाषाशैली विविधांगानी गोचर करीत करीत स्वत:ला साक्षात केलेले आहे. हे लेखन आपल्या मनाचा ठाव घेणारे जसे आहे तसेच ते उद्याचे प्रतिभावंत म्हणून उदयास येणारे आदर्श नागरिकत्वही आहेत. त्यांच्या भावी लेखनास माझ्या शुभेच्छा! लेखनाबरोबरच, आमचे विद्यार्थी खेळातही आंतरराज्य पातळीवर चमकलेले आहेत.

या वर्षीच्या 'आसूड' या वार्षिक अंकाचे एक आगळे वेगळे वैशिष्टये म्हणजे 'ॲल्युमिनी टॉक्स्' हा कॉलम होय. या कॉलममध्ये माजी विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेऊन त्यांच्या लेखन गुणांना वाव देण्यासाठी अंकात संधी देण्यात आली आहे. यात राहुल गायकवाड व सौ. महादेवी चौकटे या दोनच

विद्यार्थ्यांचे अनुभव तथा मनोगत प्रसिध्द करता आले.जागे अभावी कमी विद्यार्थ्यांना यात सहभागी करुन घेता आले आहे. पुढच्या वर्षीच्या अंकात मात्र जास्तीत जास्त माजी विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

आमच्या महाविद्यालयाचे या वर्षात बेंगलोरच्या नॅक कमिटीकडून मूल्याकंन दिनांक ३ व ४ सप्टेंबर २०१६ रोजी झाले. सदरील कमिटीमध्ये आलेल्या मान्यवरांनी महाविद्यालयाअंतर्गत असलेल्या सर्व विभागांची प्रगती आणि त्यांनी विद्यार्थी केंद्रबिंदू मानून पार पडलेले कार्य तसेच संस्थेची सामाजिक बांधिलकी व योगदान, महाविद्यालयाचे समाजाभिमुख व राष्ट्रीय ऐक्याचे उपक्रम इत्यादींचा धांडोळा घेतला. तसेच विद्यार्थ्यांच्या मनात असलेले राष्ट्रभक्ती, देशभक्ती आली स्वत:चा विकसित झालेला दृष्टिकोन यांचे नॅक कमिटीसमोर घडलेले साक्षात दर्शन यासह आदिंचा वास्तव लेखाजोखा पाहून सदर नॅक मूल्यांकन कमिटीने ०५ नोव्हेंबर २०१७ रोजी महाविद्यालयास 'B' Grade (CGPA:2.11) मिळाल्याचे पत्र पाठवून संस्थेचे, महाविद्यालयाचे, प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच आमच्या महाविद्यालयाला यावर्षी विद्यापीठाची कायम मान्यता व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 2f ची मान्यता मिळाली आहे.

विशेष नोंद घेण्याची बाब म्हणजे गुणवत्तेतही आमच्या महाविद्यालयाने प्रगतीची गरुडभरारी घेतली आहे. विशेष गुणवत्तेत यावर्षी २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. म्हणून आमच्यासाठी हे वर्ष गुणवंतांची 'सिल्हर ज्युबली' ठरले आहे. सदरील विद्यार्थ्यांचा आम्ही यथोचित सत्कार केला. गुणवत्तेची 'सिल्हर ज्युबली' व 'नॅक' हे संस्था आणि कर्मचाऱ्यांच्या बळावर झाले. म्हणून या

यशाचे सर्व श्रेय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांना जाते.

सदरील 'आसूड' अंकाचे प्रेरणास्थान आमच्या कि.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष मा.अशोकराव पाटील एंकबेकर, सहसचिव मा.आर.के.देशमुख कै. ॲड् सी.पी. पाटील, कै. रामचंद्रराव पाटील तळेगावकर व सर्व कार्यकारी मंडळाने दिलेली प्रेरणा ही आमच्यासाठी हजारहत्तीचे बळ देणारी आहे.'आसूड' वार्षिक अंक हा देखणा व नीट—नेटक्या रुपात साकार करण्यासाठी कार्यकारी संपादक डॉ.पी. बी.बिरादार तसेच प्रा.एस.एच.गर्जे, डॉ.ए.व्ही.मुंढे व प्रा.एस.जी.ससाणे यांनी अविरत परिश्रम घेतले तर अंकातील सर्व लेखांचे टंकलेखनाचे क्लिष्ट काम अतिशय सहजपणे व सुलभपणे टंकलेखक श्री. अजय मुरमुरे यांनी पार पाडले. तर मुद्रित शोधनाचे जिकिरीचे काम भाषातंज्ञ व महाविद्यालय गीताचे गीतकार, संत साहित्याचे अभ्यासक डॉ.अनिल मुंढे यांनी पार पाडले. या सर्वांच्या बळावरच 'कॅशलेस' संबंधी व्यवहारबद्दलचा हा 'आसूड' अंक साक्षात आपल्यासमोर ठेवत आहे. यात जे जे चांगले आहे ते सर्व वरील मान्यवरांचे आहे व ज्या ज्या उणिवा आहेत त्या माझ्या आहेत असे येथे नम्रपणे नमूद करावेसे वाटते.

**प्राचार्य**

**• डॉ.वसंत बिरादार पाटील**

**महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर**



# महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर

NAAC - छायांकित

आसूड २०१६-१७



'नॅक पीयर' टीमचे महाविद्यालयात असे झाले आगमन...

'नॅक पीयर' टीमचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार स्वागत करतांना.





'नॅक पीयर' टीमचे शिवकालीन वातावरणात तुतारीच्या निनादाने केलेले स्वागत

'नॅक पीयर' टीम 'प्रिंसिपल मीट'



## संपादकीय ...

‘आसूड’ या वार्षिक अंकासाठी विद्यार्थ्यांना **‘रोकडरहित अर्थव्यवस्था’** हा विषय देण्यात आला आहे. बदलत्या जगानुसार विद्यार्थी घडवणे हे आपल्यापूढे खरे आव्हान आहे. हे आव्हान स्वीकारून आमच्या महाविद्यालयामध्ये या वर्षी **‘रोकडरहित अर्थव्यवस्था’** विषयी विद्यार्थ्यांमध्ये जाग्रती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. वेळ, पैसा व श्रमाची बचत करून व्यवहार सुरळीतपणे करता यावे यासाठी विविध उपक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयात **‘रोकडरहित अर्थव्यवस्थेचे** ज्ञान विद्यार्थ्यांना देण्यात आले. त्याचमाध्यमातून बॅंकेच्या ‘online’ व्यवहाराचा ‘Demo’ करून दाखवण्यात आला. तसेच बॅंकेच्या ‘online’ व्यवहाराचे फायदे काय आहेत? त्यांचा वापर कसा करावा? त्यासाठी काळजी काय घ्यावी? इत्यादीची सखोल माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांना **रोकडरहित अर्थव्यवस्थेचे** ज्ञान कितपत समजले याची खात्री व्हावी म्हणून या विषयावर निबंध स्पर्धा सुद्धा घेण्यात आली. या सर्व प्रक्रियेमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी व सर्व विभागाच्या प्राध्यापकांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. सरकारच्या **‘रोकडरहित’** भारत करण्याच्या धोरणांवर अनेक विचार, म्हणी, कविता, विनोद इत्यादी व्हाट्सॲप, फेसबुक या समाज माध्यमाने व्यक्त होऊ लागले होते. विद्यार्थ्यांच्या याच विविध गुणांना आमच्या महाविद्यालयाच्या ‘आसूड’ या वार्षिक अंकाने मुक्त विचारपीठ निर्माण करून दिले आहे.

या अंकाचे संपादन करण्याची संधी मला दिल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील व उपप्राचार्य डॉ.डी.डी.चौधरी यांचे ऋण व्यक्त करतो. तसेच अंकासाठी प्रेरणा व सहकार्य देणारे संस्थेचे अध्यक्ष मा.अशोकराव पाटील एकंबेकर, सहसचिव मा.आर.के.देशमुख व अन्य सर्व सन्माननीय सदस्यांचा मी ऋणी आहे. अंकासाठी सहकार्य करणारे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,कर्मचारी,टंकलेखन करणारे श्री. अजयमुरमुरे, विद्यार्थी व प्रकाशकाचे आभार व्यक्त करतो. या ‘आसूड’ चे वाचक स्वागत करतील. अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद !

• **डॉ. प्रशांत बिरादार**
कार्यकारी संपादक ‘आसूड’



## ●महाविद्यालय गीत ●

*क्रांतिसूर्य जोतिबांच्या लेखणीमधली ही शिक्षण वाणी ।*
*ज्ञानमंदिरी भारतभूमी दिसे शोभुनी ।। धृ ।।*
*सर्वांचा निर्मिक एक जानी*
*माणूस इथला आत्मज्ञानी*
*सत्याने वर्तावे सद्‌गुण मानी*
*ज्ञानचक्षु विद्यार्थी इथे अभिमानी*
*ज्ञानदीप लावुनी तेवत ठेवुया मनोमनी ।।1 ।।*
*घेऊनिया वसा जोतिबांचा*
*ठेविला आदर्श सावित्रीचा*
*फुलविला मळा शिक्षणाचा*
*मिळाला आधार किसान शिक्षण मंडळाचा*
*लाविले रोप दूरदृष्टीने बापुसाहेबांनी ।।2 ।।*
*बालाघाटच्या डोंगर रांगा*
*मन्याड खोऱ्यात फुलती ज्ञानबागा*
*शिक्षण क्रांतीचा गुंफला धागा*
*माणूस इथला सदैव जागा*
*'फुले पॅटर्न' चा झरा वाहे शिक्षण पंढरीतुनी ।।3 ।।*
*शिक्षण ज्ञानविज्ञानाचे*
*मानवतेचे गुणवत्तेचे*
*जिजाऊसावित्री अन् अहिल्याबाईंचे*
*स्वराज्य स्थापण्या शिवरायांचे*
*'बहुजन हिताय,बहुजन सुखाय' चा ध्यास घेऊनी मनोमनी*

• **डॉ..अनिल मुंढे**
(मराठी विभाग)

**राहुलायण...** **ॲल्युमिनी टॉक्स...**

## छात्र आम्ही एम.पी.एम.चे ! घडवू राष्ट्र उद्याचे...!!



• राहूल बब्रुवान गायकवाड
मुख्याध्यापक
माजी विद्यार्थी

सर्व प्रथम महात्मा फुले महाविद्यालयाच्या वार्षिक अंकास मन:पूर्वक स–स्नेह शुभेच्छा..!आणि हो...विशेष म्हणजे माझ्या महाविद्यालयास नॅक कमिटीचा 'बी' ग्रेड मिळाल्याबद्दल माझे आदर्श आदरणीय प्राचार्य डॉ. वसंतबिरादार, माझे सर्व आदरणीय प्राध्यापक वर्ग शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग या सर्वाचे अगदी मन:पूर्वक अभिनंदन करतो...! आणि भविष्यातील वाटचालीस माझ्या महाविद्यालयास अंत:करण पूर्वक शुभेच्छा देतो...! आणि माझ्या मोडक्या तोडक्या लिखाणास सुरुवात करतो...!

**'माझं' महाविद्यालय**

बहुजन हिताय... बहुजन सुखाय... या उदात्त हेतूनं प्रेरित होऊन अहमदपूरच्या इतिहासात शिक्षणाची खऱ्या अर्थाने सुरुवात केली ती म्हणजे किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर व्दारा संचलित महात्मा फुले महाविद्यालयाने कारण 'जिथं जिथं कमी तिथं तिथं महात्मा फुले महाविद्यालयाची हमी' असे जरी म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण शिक्षणाचा 'फुले पॅटर्न' हा संबंध जिल्हयातील एक आगळा वेगळा आपला असा निर्माण करणारा आहे यास तिळमात्र शंका नाही.

म्हणतात ना...'उडत्या पाखरांना परतीची तमा नसावी नजरेत सदा नवी दिशा असावी घरटयाचे काय आहे बांधता येईल कधीही, पण क्षितिजाच्याही पलीकडेझेप घेण्याची जिद्द असावी...!' या ओळी प्रमाणे आमच्या आदरणीय प्राध्यापकांनी आम्हाला 'शुन्यातून विश्व निर्माण करण्याची प्रेरणा दिली आहे. आम्ही अगोदर काय होतो? आणि आता काय आहोत? याचे सर्वश्रेय आमच्या महाविद्यालयास जाते. एक आदर्श नागरिक घडवण्याचे कार्य हे फक्त मला तर वाटतं आमच्याच महाविद्यालयात केलं जातं! हे मी माझ्या अनुभवातून सांगतोय...बाकीचे कॉलेज हे फक्त आपापल्या विषयापुरते किंवा कामापुरतेच असतात. या उलट महात्मा फुले महाविद्यालयात होताना दिसते. ते म्हणजे येथील प्रत्येक प्राध्यापकांचं, प्रत्येक विद्यार्थ्यांशी आत्मीयता व ज्ञानदानाची प्रक्रिया तनमयतेने करतात. मग तो विषयाचा असो किंवा नसो! आपल्याकडील ज्ञान हे दुसऱ्या पर्यंत कसे जाईल व आपल्या विद्यार्थ्यांचं भलं कसं होईल हिच अपेक्षा येथील सर्व प्राध्यापक करत असतो.

***'जे जे आपणासी ठावे!***
***ते ते इतरांशी सांगावे!!***
***शहाणे करुन सोडावे सकळ जन...!'***

या संत वचना प्रमाणेप्राचार्य सरांनी,प्राध्यापकांनी, कार्यालयीन कर्मचारी यांनी नि:स्वार्थ सेवेचा एक आदर्श शिक्षणाची पंढरी निर्माण करण्यामध्ये फुले पॅर्टनचा दबदबा नेहमीच दिसून राहिला आहे. विद्यार्थ्यांच्या जडण—घडणीकडे या महाविद्यालयात विशेष लक्ष दिलं जातं यात तिळ मात्र शंका नाही...

**महाविद्यालयातील माझे तीन वर्ष...**

मरगळलेल्या अस्वस्थ मनाला शांत करण्याचे उत्तम ठिकाण म्हणजेच पुस्तकांनी भरलेली जागा 'वाचनालय' चाफ्याच्या फुलांनी मन जसं प्रफुल्लीत होतं. अगदी तसंच नवीन कोऱ्या पुस्तकांचं असतं, नवीन पुस्तक हातात आले की, त्याचं नाव न पाहता, त्याची किंमत न पाहता, पहिला पुस्तकाचा गंध मनात भरुन घ्यावा हीच खऱ्या वाचकांची सवय म्हणून या अंकांस शुभेच्छा...!

इ.स.२००८ मध्ये मी बारावी पास झालो. आता पुढे काय करायचे? असा प्रश्न माझ्या समोर होता. अनेकांनी पुढील शिक्षणासाठी वेग—वेगळया शिक्षण प्रणालीची माहिती दिली. मी सर्वाचं ऐकून घेतलं आणि पप्पांना विचारलं, की मी आता पुढील शिक्षण कशात पूर्ण करु? तेव्हा त्यांनी म्हटले, की तुला ज्या महाविद्यालयात व ज्या शाखेत आवड आहे. त्या ठिकाणी प्रवेश घे. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी मी अहमदपूरातल्या महाविद्यालयाची चौकशी केली, की कुठंल कॉलेज चांगल असेल. अगोदर मी एमजीएम या कॉलेजमध्ये चौकशीसाठी गेलो पण त्या ठिकाणी म्हणावी तशी माहिती मिळाली नाही. मग मी एमपीएम कॉलेजमध्ये आल्यानंतर खूप अस्थेवाईकपणे जसं काही माझी अगोदरपासूनच ओळख आहे की, काय या भावनेतून प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी माहिती दिली व माझ्याकडील सर्व कागदपत्रे पाहून आमच्या महाविद्यालयात एवढे विषय आहेत असे सांगून विषय निवडीची माहिती दिली.कोणते विषय घ्यायचेयाची सविस्तर माहिती मिळाली. हे सर्व पाहून मनाला बंर वाटलं! कारण अगदी चांगल्या प्रकारची माहिती सांगणारे हे सर्व प्राध्यापक आहेत. सुरवातीलाच एवढे प्रेमानं सांगतात म्हणून मी व माझ्या आठ मित्रानी विचार न करता लगेच प्रवेश घेतला.

...आणि माझ्यासह माझ्या मित्रांच्या महाविद्यालयीन जीवनास सुरुवात झाली. दुसऱ्या दिवशी आमच्या सर्वाचा परिचय करुन घेण्यात आला. प्रत्येक विषयाचे सर येऊन आपल्या विषयाचे भविष्यातील महत्त्व सांगत होते. असेच दिवस जात होते. काही काळानंतर एनएसएस चा कॅम्प आहे अशी सूचना आली आणि आठ दिवस बाहेरगावी राहावं लागतं. यामध्ये सर्व गोष्टी शिकायला मिळतात. अशी माहितीप्रा.मुंढे सरांनी दिली. शिबीरापासून मित्रांच्या ओळखी होण्यास सुरवात झाली. एकमेकांचे स्वभाव आवड—निवड सुप्त गुण या सर्वाची माहिती या एन.एस.एस. च्या शिबीरातून मिळाली. आमच्या सर्व प्राध्यापकांची अगदी जवळून ओळख झाली. अशाच प्रकारे शिबीरातले दिवस जात होते. बघता बघता बी.ए.प्रथम वर्ष संपत आल. महाविद्यालयामधील सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडाविभाग, परीक्षा विभाग, एनएसएस विभाग यासर्व

विभागांशी खूप जवळचे नाते गुंतले गेले होते. या विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या उपक्रमांध्ये व्हायचे आणि जमेल तसं काहींना काही सादरीकरण करण्याचा प्रयत्न करायचो...

यामध्ये आम्हाला समजलं, की महाविद्यालयाचे प्राचार्य सर बदलून नवीन कायम स्वरुपी प्राचार्य येणार आहेत. सुरवातीस दडपण होतं. नवीन प्राचार्य सर आहेत कसलाच त्यांचा व आमचा परिचय नाही म्हणून आम्हाला ते समाजाऊन घेतील का? असा प्रश्न आमच्या समोर उभा होता.पण त्याही पेक्षा आदरणीय प्राचार्य खूप वेगळे होते.

*'अखंड चाललो पण थकलो कधीच नाही।*
*चकव्यामध्ये ही फसलो, चुकलो कधीच नाही.*
*ओठाशी आले तेव्हा कळले ते विष आहे.*
*प्यालो मिटून डोळे, थुंकलो कधीच नाही.*
*किती पाहिले उन्हाळे,तुडवीत तप्त वाळवंट तरी फल भावनांचे,*
*सुकले कधीच नाही. मोजू तरी कशाला,*
*ओझे किती अजुनी आभाळ पेलताना,*
*झुकलो कधीच नाहीसंघर्षमय हे जीवन जगणार निश्चयाने*
*माझ्या मी पणाला विकले कधीच नाही...'*

अगदी याच प्रमाणे मा.प्राचार्य यांची प्रेरणा नेहमी आदर्श असणारं व्यक्तिमत्व!आम्हाला लाभलं! हे आमचं भाग्यच समजावं लागेल. महाविद्यालयात आल्यानंतर प्राचार्यांनी महाविद्यालयास स्वर्ग बनवले आहे असं जरी म्हटलं तरी वावगें ठरणार नाही. हे आपणास महाविद्यालयात आल्यानंतर दिसूनच येईल यात तिळमात्र शंका नाही.

सकाळी ०७:०० ते सायंकाळी ०५:३० वाजेपर्यंत चालणारं एकमेव महाविद्यालय म्हणजे महात्मा फुले महाविद्यालय होय! आणि हो, या काळात मा.प्राचार्य व सर्व प्राध्यापक यांची उपस्थिती असतेय. फुले महाविद्यालयाचे प्रत्येक प्राध्यापक हे आपल्या विषयात पारंगत आहेत, विद्यार्थ्यांना ज्ञान देणारे आहेत. या महाविद्यालयात निकालाबरोबर, संस्कारही दिले जातात.

थोर—मोठयांचा आदर आपलेपणाची भावना निर्माण करणार हे माझ महाविद्यालय आहे.

बघता—बघता बी.ए.व्दितीय वर्षाची सुरुवात झाली आमच्या दैनंदिन जीवनात वेग—वेगळया प्रकारची ज्ञानाची भर पडत होती. अभ्यासक्रमा सोबत गल्ली—पासून दिल्लीची व जग भराची माहिती अभ्यासाच्या तासिकेच्या माध्यमातून आम्हाला मिळत होती. सर्व महापुरुष यांची माहिती मिळत होती. ग्रंथालयाच्या माध्यमातून प्राचार्यांनी जादा पुस्तके मिळण्याची व्यवस्था आम्हाला करुन दिली होती.

स्पर्धा परीक्षेची तयारी महाविद्यालयात करुन घेण्यात यायची. सकाळी शिकलेला प्रत्येक विषयाचा भाग हा रिव्हीजन म्हणून ३ ते ५ या वेळेत जादा तासिका होत असंत, संध्याकाळी नाईट लायब्ररी ७ ते १० या वेळेत महाविद्यालयात उपलब्ध करुन देण्यात आली होती. आणि या वेळेत स्वत: प्राचार्य जातीने उपस्थित राहायचे.याशिवाय महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांस आणखी काय पाहिजे? म्हणूनच, मी म्हणतो —'जिथे कमी तिथे'एमपीएम' ची हमी...!'

या सर्वाच द्योतक म्हणूनच की काय, मी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, अंतर्गत झालेल्या 'युवक महोत्सवात' महाविद्यालयास 'प्रेरणा २००९ सेलू येथे आदरणीय प्राचार्य सर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा.अनिल मुंढे आणि प्रा.सतीश ससाणे यांच्या मार्गदर्शनातून महाविद्यालयास प्रथमच.. मूक अभिनयात एक सुवर्ण पदक, — एकांकिका उत्कृष्ट दिग्दर्शन—दोन कांस्य पदक आणि एकांकी या कला प्रकारात महाविद्यालयास 'गोल्ड मेडल मिळवून दिले.यामध्ये विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा सिंहाचा वाटा आहे. यामध्ये प्राचार्य, प्रा.सतीश ससाणे, प्रा.अनिल मुंढे यांचे महत्त्वपूर्ण योगदान व मार्गदर्शनामुळे हे यश प्राप्त करता आले. तसेच यात सहभागी असलेले मी स्वत: राहुल गायकवाड, विशाल साबळे, यशवंत इबिद्रे, शीतल धसवाडीकर, मोनिका जाजू, मीरा केंद्रे, साधना वाघमारे यांची सुवर्णपदक मिळवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका आहे.

**क्रीडा विभाग :**

तसं पहिलं तर महाविद्यालयाच्या सुरुवातीपासूनच क्रीडा विभागाचा दबदबा आज पर्यंत कायम राहिलेला आहे. 'हॅन्डबॉल' मध्ये आमची संघ विद्यापीठाकडून 'एमपीएम' चा संघ ही व्दितीय आला होता. तर ऑल इंडिया मध्ये सर्व प्रथम येण्याचा मान सुध्दा स्वा.रा.ती.म.वि. अंतर्गत एमपीएम व इतरमहाविद्यालयास मिळाला होता. या सर्वाचे मार्गदर्शन म्हणून प्रा.डॉ.अभिजीत मोरे सर यांची कठोर मेहनत या यशाचे शिलेदार म्हणून यांच्याकडेच पहावे लागेल.

**एनएसएस विभाग :**

'Not Me But You' या ब्रीद वाक्याने प्रेरित होऊन एनएसएस चा एमपीएम चा विभाग हा सर्वांना आवडणारा विभाग होय. कारण याच विभागाच्या माध्यमातून अनेकाना नवे, मित्र जुळण्यास सुरुवात होते. एक मेकांचे सुप्त गुण याच माध्यमातून कळतात. हा विभाग माझ्या सर्वात आवडता विभाग. कारण या विभागाच्या माध्यमातून मला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या. गल्लीपासून दिल्लीचा प्रवास या विभागाच्या माध्यमातून मला पूर्ण करता आला. अनेक प्रकारचे शिबीरं या विभागाच्या माध्यमातून झाले. जेवढं काही घेता येईल ते प्रामाणिकपणे घेण्याचा प्रयत्न केला,याचे सर्व श्रेय मी त्यावेळेसचे एन.एस.एस.चे कार्यक्रम अधिकारी डॉ.अनिल मुंढे सर यांना देतो. यांच्या मार्गदर्शना मुळेच व माझ्या प्रयत्नामुळे माझी आणि मीरा केंद्रे यांची राष्ट्रीय शिबीरासाठी निवड झाली आणि त्यानंतर स्वा.रा.ती.म.वि.नांदेड व महाराष्ट्र शासनाच्या वतीने राष्ट्रीय शिबीरासाठी माझी आणि अनीता चव्हाण यांची हिमाचलप्रदेश येथील 'कुलुमनाली' साठी निवड झाली. जवळ पास २६ दिवसांचा हा कॅम्प होता. मला शिबीरातून खूप काही शिकण्यास मिळाले. हे फक्त या विभागामुळे त्यामुळे या विभागाचे धन्यवाद...!

**एक खंत :**

मला महात्मा फुले महाविद्यालयाचा विद्यार्थी संसद सचिव होण्याची फार इच्छा होती. पण ती इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. ही खंत वाटते. तस कारण

ही होतं. दरवर्षी महाविद्यालयात बी.ए.व्दितीय वर्षाला चांगले गुण घेणारे गुणवंत विद्यार्थी निवडून त्याला विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून निवड केली जात होती. तसं पाहिल तर मला माझ्या सर्व विद्यार्थी मित्रांचा पाठींबा होता. मला टक्केवारी मध्ये मार्क कमी होते. यामुळे मला 'जीएस' होता आलं नाही. पण आदरणीय प्राचार्य साहेबांनी मला जीएस पेक्षा ही जास्त बहुमान विविध ठिकाणी संधी देऊन दिला. त्यामुळे नंतरच्या काळात हीही खंत राहिली नाही. लिखाणाच्या माध्यमातून हे चार शब्द आपल्या समोर मांडत आहे. प्रत्यक्षरित्या कधी कोणासमोर हे मनोगत व्यक्त केलो नाही.

महाविद्यालयाने मला खूपकाही दिले आहे. ते आम्ही सर्व विद्यार्थी कधीही विसरु शकत नाही. असेच दिवसामागून दिवस जात होते. बघता—बघता आमचं शेवटंच वर्ष कधी आलं कळलंच नाही. सकाळी ०७ वाजता आम्ही महाविद्यालयात दाखल व्हायचो. सकाळचा परिपाठ (वंदेमातरम्, वैदिक प्रार्थना आणि राष्ट्रगीत) व्हायचे. मला तर वाटते, महाराष्ट्रातले हेच ऐकमेव महाविद्यालय असेल, जिथे असा आजही दैनंदिन परिपाठ घेतला जातो. असे आदर्श संस्कार आमच्यावर आमच्या महाविद्यालयातील या गुरुजन वर्गाने केले आहेत.

दुपारच्या सत्रामध्ये आम्ही सर्वजन मिळून गच्चीवर (तिसऱ्या मजल्यावर डब्बा जेवण करण्यासाठी जात असत. विशेष म्हणजे वर्गातल्या मुली सुध्दा आमच्या सोबत अगदी मन—मोकळे पणाने रोज डब्बा घेऊन येत असत. बी.ए. तृतीय वर्षामध्येसुध्दा आम्ही विविध उपक्रमामध्ये सर्वांनी सहभाग नोंदवला. त्यात एन.एस.एस. विभाग, क्रीडा विभाग, सांस्कृतिक विभाग, युवक महोत्सव यासर्वांमध्ये सहभाग घेऊन, महाविद्यालयाचा आमच्या परीने नावलौकीक करण्याचा प्रयत्न केला आणि आज सात वर्ष झाले तरी करतच आहोत.

आमचं महाविद्यालयीन जीवन कस संपल याची जाणीव आमच्या प्राध्यापकांनी कधीच होवू दिली नाही. मला तर सर्वच प्राध्यापकांनी खूप जीव लावला होता. मी त्यांच्या विषयाचा नसून सुध्दा, खरच! मी खूप भाग्यवान आहे की, मला असे प्राचार्य, डॉ.डी.डी.चौधरी , प्रा.बी.के.मोरे प्रा.संतोष

पाटील,प्रा.पी.पी.चौकटे, प्रा.ए.सी.आकडे, प्रा.डी.एन.माने, प्रा.एस.एच.गर्जे, प्रा. एस.जी.ससाणे, प्रा.ए.व्ही.मुंढे, प्रा.पी.बि.बिरादार,प्रा.डॉ.पी.डी.चिलगर, प्रा.नागराज मुळे , बी.के.पाटील ,व्ही.डी.गुरनाळे,प्रशांत डोंगळीकर, अरुण गिरी, वामन मामा, चोपडे मामा आणि आमचे ग्रंथालय प्रमुख पी.एम.इंगळे, प्रा.ज्योती सरकाळे, प्रा.सत्यवती इंगळे, प्रा.रेखा कांबळे या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे आम्ही एक आदर्श नागरिक बनण्याचा सदैव प्रयत्न करतो. आता महाविद्यालय सोडून आम्हाला जवळपास सात वर्षे झाले. तरी तोच स्नेहबंध, तीच आपुलकी, तोच आपले पणा..., आम्हाला आज वाटत नाही की आमचं आणि आमच्या महाविद्यालयाचं औपचारिक नातं संपले आहे.पण आजही आमचे औपचारिक व अनोपचारिक नात्यांची वेल हिरवी रसरशीत आहे. सर्वच प्राध्यापक आज सुध्दा बाहेर भेटले तर अवर्जुन थांबतात... बोलतात....चौकशी करतात... म्हणतात सध्या काय करतायं?... एवढयाने आमचं मन भरुन येत... आम्हाला दुसर... आणखी काय पाहिजेत? बस्सं! आयुष्याच्या! शेवटच्या क्षणापर्यंत, हाच जिव्हाळा...हीच आपुलकी... हीच माया... असाच प्रेमाचा वर्षाव...सदैव बरसत रहावा. हीच माझ्या गुरुजन वर्गाकडून माफक अपेक्षा...!

'आसूड' च्या या वार्षिक अंकाच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांसाठी जागा लेखनासाठी उपलब्ध करुन दिली त्यामुळेच यां लिखानाच्या माध्यमातून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मी माझ्या भावना अभिव्यक्त केल्या. यातून कळत न कळत माझ्या कडून कुणाच्याही भावना दु:खावल्या असतील तर खरंच... सो सॉरी...शेवटी—

'छात्र आम्ही एम.पी.एम.चे ! घडवू राष्ट्र उद्याचे !!'

• राहूल बब्रुवान गायकवाड
मुख्याध्यापक
बुध्दिस्ट इंटरनॅशनल हायस्कुल, अहमदपूर
ता.अहमदपूर जि.लातूर
चल्भाष९९२१९०३०३१

महादाउवाच... ॲल्युमिनी टॉक्स...

# मागे वळून पाहतांना...



•महादेवी भीमराव चौकटे
मुख्याध्यापिका
माजी विद्यार्थीनी

*'अंध:कारात ज्यांनी पेटविल्या ज्ञानज्योती।*
*तव चरणी कर माझे जुळती।।'*

माझा आणि माझ्या शिक्षणाचा अतूट असा संबंध आहे. माझे १२ वी पर्यंतचे शिक्षण माझ्या जन्म गावी म्हणजे अंधोरी या ठिकाणी झाले. गावी १२ वी नंतर चे शिक्षण नसल्याकारणाने मी माझे शिक्षण थांबविण्याचा निर्णय घेतला होता. पण त्या वेळी माझ्या बहिणीने व भावाने मला शिकविण्याचा निर्णय घेतला. नेमके म्हणजे माझे बंधू प्रा.पी.पी.चौकटे महात्मा फुले महाविद्यालयातकार्यरत होते.त्यांनी मला बी.ए.साठी फुले महाविद्यालयात प्रवेश दिला. याचेच फलित म्हणून मी माझे विचार किंवा मनोगत तुमच्या समोर ठेवत आहे.

जेव्हा मी अंधोरीहून शिकण्यासाठी यायची... तेव्हा याच महाविद्यालयातील... प्राध्यापक वर्ग... मला गावापर्यंत शिक्षणाचे महत्त्व सांगायला यायची... प्रा. सतीश ससाणे...जागतिक भूगोलाचे अभ्यासक व तज्ज्ञ असलेले व कवी प्रा.डी.एन.माने... प्रा.ए.सी.आकडे...या व इतर सरांनी मला मोलाचे सहकार्य केले.... सर्व सरांची मी ऋणी आहे...कारण या सर्वांनी माझ्या वडिलास...भाऊस... शिक्षणाचे महत्त्व सांगितले...अन् माझ्या वडिलांनी प्राध्यापकांच्या पटवून देण्याच्या प्रभावी शैलीने... मला, लागलीच शिक्षणाची

परवानगी दिली... मी एक साधारण कुटुंबातील जन्माला आलेली मुलगीअसून.. .माझे संपूर्ण शिक्षण लग्नाच्या अगोदर... देण्याची संधी माझ्या घरच्यांनी मला दिली... याचे सर्व श्रेय माझ्या फुले महाविद्यालयातील प्राध्यापकांनाच जातेय...

जे कोणी हे माझे मनोगत वाचताहेत...त्यांना... व... त्यांच्या पालकांना माझी विनंती आहे की... प्रत्येकांनी आपल्या पाल्यांना शिकण्याची संधी द्यावी.. . आणि संधी देत असताना महाविद्यालयाच्या अचूक निवडीकडे लक्ष द्यावे... आज मी व माझे कुटुंब... अभिमानाने... गौरवांने...महात्मा फुले महाविद्यालयाचे नाव सांगतोय... कारण...मी या महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षणाची शिदोरी गेलीय... तीच शिदोरी...आजही घेऊन... ज्ञानाची सार्थ गाथा... मी सर्वांना सांगतेय... जरी मी वेगवेगळया पदव्या संपादन केल्या असल्या तरीही... मी या महाविद्यालयाची व येथील प्राध्यापक वर्गांच्याऋणात आहे... कारण याच महाविद्यालयाची ज्ञान शिदोरी घेऊन...मी एक मुख्याध्यापिका..., एक शाळेची संचालिका... म्हणून तुमच्या समोर विचार मांडतेय...

महाविद्यालयातून बाहेर पडूनआज मला पुरते १३ वर्षाचा कालावधी उलटून गेलाय... तरी पण मला असे कधी वाटले नाही... की माझा व या महाविद्यालयाचा संबंध नाही... म्हणून आजही... या महाविद्यालयात मला तेवढाच मान व सन्मान दिला जातोय... जसा माहेरी आलेल्या मुलीला दिला जातो अगदी तस्सांच...

महाविद्यालयातील माझ्या प्राध्यापकांनी फोन केला...तेव्हा त्यांच्या बोलण्यात आमची विद्यार्थीनी...तसेच त्यांच्या मनात माजी विद्यार्थीनी म्हणून... माझ्या करियर बद्दल... त्यांची असलेली माझ्याबद्दल सहकार्याची भावना... शब्दाशब्दातून ओथंबलेली असते...मला अशा आलेल्या अनेक अनुभवापैकी प्रा. सतीश ससाणे... प्रा.संतोष पाटील... प्रा.ए.सी.आकडे... प्रा.डी.एन.माने... प्रा.अनिल मुंढे...यांचा आर्वजुन उल्लेख करावा लागेल... तसेच महाविद्यालयातील इतर सरांमध्येही... आजही तीच सहकार्याची भावना ओतप्रोत आहे...प्रा.पी.पी.चौकटे माझे भाऊ... पण त्यांनी मला महाविद्यालयामध्ये कधीच नाते बंधाचेबंध न घालता... मला शिक्षणासंदर्भात

आगळे वेगळे स्वातंत्र्य दिले होते... आपल्या महाविद्यालयाची विद्यार्थीनी म्हणून सदैव सहकार्याची भावना येथील प्राध्यापक वर्गानी माझ्याशी जोपासलीय...

इ.स. २००० ते इ.स. २००३ या कालावधीत माझे बी.ए. चे अध्ययन या माहाविद्यालयात झालेय... तेव्हा त्या वेळेस या महाविद्यालयात प्राचार्य डॉ. वसंत बिरादार हे प्राचार्य पदी नव्हते... तरी पण ते आज मला माजी विद्यार्थीनी महादाताई चौकटे म्हणून गौरवाने... सार्थपणे आणि अभिमानाने अधोरेखित करतात...आज कित्ती वर्ष होऊन गेलीय... महाविद्यालयातून शिकून मी बाहेर पडलेय... तरीही आज मला वार्षिक अंकाच्या माध्यमातून माझे विचार मांडण्याची संधी मला मिळतीय... प्राचार्यांनीव प्राध्यापकांनी आम्हाला म्हणजे माजी विद्यार्थ्यांनावार्षिक अंकात एक विशिष्ट जागा उपलब्ध करुन दिलीययाबद्दल 'आमचा... आम्हालाच...अभिमान वाटतो...'

माझे शिक्षण एम.ए.बी.एड झालेय...नुकतेच माझे एम.फील ही झालेय... एम.फील झाल्यामुळे माझ्या फुले महाविद्यालयाने संस्थेच्या वतीने... विद्यार्थ्यांच्या वतीने मा. प्राचार्य साहेबांनी... माझा सत्कार महाविद्यालयात सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत केला... एवढे माझे शिक्षण झालेय...त्या सर्वांचे श्रेय महात्मा फुले महाविद्यालयातून मी बी.ए.चे शिक्षण घेतल्यामुळेच... येथून झालेले माझे शिक्षण...कदापि विसरु शकत नाही... आज मी अभिमानाने या महाविद्यालयाचे नाव घेतेय... महाराष्ट्रात भरपूर महाविद्यालय पाहिले... पण फुले महाविद्यालयातील प्राध्यापकांचा... विद्यार्थ्यांशी जो प्रेमाचा जिव्हाळा आहे तो इतरत्र मी कुठेच पाहिला नाही.... म्हणून मी सर्वांना... गौरवाने व सन्मानाने या महाविद्यालयाचे नाव सांगतेय...जर भविष्यात मला कधी येथून शिक्षणघेण्याची (पीएच.डी.चे गाईड म्हणून येथील प्राध्यापकांना निवडण्याची संधी आली) तर मी सुरुवातीला या महाविद्यालयातील प्राध्यापकांची निवड करेन.

• महादेवीभीमराव चौकटे
अमरदीप प्राथमिक विद्यालय,अमरावती
चल्भाष: — ८२३७०५६०४९



# महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

## Alumni Photo Gallery

आरूड २०१६-१७




माजी विद्यार्थी-पालक मेळाव्यात मनोगत व्यक्त करतांना पालक सर्वश्री शिवाजीराव जाधव




माजी विद्यार्थी-मेळाव्यात महाविद्यालयाबद्दल मनोगत व्यक्त करतांना




माजी विद्यार्थी-पालक मेळाव्यास संबोधीत करतांना प्राचार्य डॉ.वसंत बिरादार




माजी विद्यार्थिनी महादेवी चौकटे यांचा एम.फील पदवी संपादन केल्या बद्दल विद्यार्थी स्नेह मेळाव्यात सत्कार करतांना प्राचार्य डॉ.वसंत बिरादार



माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्यात राहूल गायकवाड यांचा सत्कार करतांना प्राचार्य व इतर




महाविद्यालयाचे अराध्य दैवत असलेले माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी वृंद महाविद्यालयाच्या हिरवळीवर...

# मैत्री

अनेक सुत्रांचे
अनेक मित्रांचे
हे जीवन आहे.
अनिल शक्तीचे
अनिल विश्वासांचे
हे बंधन आहे.
अनेक नात्यांचे
अनेक गोत्यांचे
हे कुटुंब आहे
अनेक गंधाची
अनेक बंधाची
ही आमची मैत्री आहे...!

• **राहुल बब्रुवान गायकवाड**
माजी विद्यार्थी
(महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर)

# रोकड रहित व्यवहार : फायदे व तोट

रोकड रहित व्यवहार म्हणजे डिजिटल कॅशलेस होय. रोकड रहित व्यवहारामुळे त्याचे आपणास फायदे ही होतात आणि सुरळित व्यवहारही होतात. यामध्ये आपण हा व्यवहार न पैसा वापरता म्हणजे कसे उदा. ATM Card, Credit Card, Debit Card, Prepaid Card इ.व्दारे आपण रोकड व्यवहार करु शकतो. या व्यवहारामुळे आपणास पैशाची गरज भासत नाही. आपल्याजवळ यापैकी कोणते ही जरी कार्ड असेल तर आपण हा व्यवहार करु शकतो किंवा त्याचा वापर आपणास करता येतो. कॅशलेस पध्दतीमुळे जी काही Black Money आहे. ती बाहेर पडली. हे सर्व कार्य नरेंद्र मोदींनी करण्याचा प्रयत्न केला. १ हजार व ५०० रुपयांचा नोटा बंद करुन त्यांनी २ हजार व ५०० रुपयांच्या नवीन नोटा चलनात आणल्या हया नोटांमुळे काळा बाजार होणार नाही. कारण यावर मंगलयान आहे. त्यामुळे याचा वापर कसा होतो हे कळणे सहज शक्य करुन जी काही Black Money आहे.ती मोठया प्रमाणात उघडकीस आली. उदा. जे लोक श्रीमंत होते ते जास्तच श्रीमंत होत होते आणि जे गरीब आहेत ते गरीबच होत होते. याचा विचार करुन मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदीनी Cashless पध्दत सुरु केली. आपल्याला जसा आधार कार्डाशिवाय काही सोयी सुविधांचा लाभ घेता येत नाही त्याचप्रमाणे आपण जे हे कार्डस आहेत, त्या मार्फत आपण रोकड व्यवहार करु शकतो. आपल्याजवळ पैसा असण्याची गरज नाही. आपल्याकडे एखादे कार्ड असेल तर आपण आपल्याला जेव्हा केव्हा, पैशाची गरज आहे. तेव्हा आपण ATM व्दारे पैसे काढू शकतो आणि आपली गरज भागवू शकतो ही पध्दत नांदेड जिल्हयात १ जानेवारीपासून चालू झाली यामुळे डिजिटल कॅशलेस पध्दत सुरु होईल. याचे काही तोटे किंवा फायदे मोठया प्रमाणात होऊ शकतात.

**फायदे:**

१) रोकड रहित व्यवहारामुळे आपण डिजिटल कॅशलेस पध्दती सुरु केली यामुळे Cards व्दारे आपण आपली अडचण असेल तेव्हा यामुळे भागवू शकतो.

२) रोकड रहित व्यवहारामुळे आपण ऑनलाईन व्यवहार करु शकतो.

३) आपल्याला बॅंकेत जाऊन रांगेत थांबून पैसे काढण्याची आवश्यकता नाही.

४) ATMकार्ड असेल तर आपण त्याव्दारे पैसे काढू शकतो.

५) आपण शॉपिंग सुध्दा हे जे कार्डस आहेत त्यानुसार करु शकतो.

६) आपण दवाखाना सुध्दा या Cards व्दारे करु शकतो.

**तोटे:**

१) रोकड रहित व्यवहार हा ठोक व्यवहार असला तरी याचा तोटा होतो.

२) जर आपण एखाद्या ठिकाणी गेलो तेव्हा आपण समजा खरेदी केली आणि आपले Card चलन नसेल किंवा जे काही मशिन आहे ती बंद पडली तेव्हा तोटा होतो.

३) ATM Card, Prepaid Card, Debit, Credit Card याचाCode असतो हा कोणला कळला तर हा ही एक तोटा आहे.

अशाप्रकारे रोकड रहित व्यवहाराचे काही फायदे ही होतात. काही तोटे ही होतात. रोकड रहित व्यवहारामुळे आपल्याला आपल्याकडे पैसा नसला तरी चालतो आपण कार्डव्दारे रोकड व्यवहार करु शकतो. या कॅशलेस पध्दतीमुळे जे काही मागे मुद्रण घोटाळे, काळा बाजार होत होता तो होणार नाही. रोकड व्यवहारामुळे आपण रोखठोक व्यवहार करु शकतो रोकड व्यवहार हा डिजिटल व्यवहार झाला.

**•कांबळे स्नेहा रमेश**
**(बी.ए.व्दितीय वर्ष)**

# सामर्थ्य आहे रोकड रहित व्यवहारात

रोकड रहित व्यवहार हा अतिशय महत्त्वपूर्ण स्वरुपाचा आहे. रोकड व्यवहारामुळे अतिशय कामे ही व्यवस्थित स्वरुपात पार पाडली जातात. रोकड म्हणजेच अतिशय जलद गतीने व्यवहारांची दिशा सरळ सोप्या रुपाने होत असते. भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदींच्या कार्यकाळामध्ये त्यांनी अचानक हया गोष्टीचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये ५०० आणि १ हजार च्या नोटा बंद करुन त्या ठिकाणी ५०० आणि २ हजार च्या नोटा बदल करुन आणलेली आहे. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी हया गोष्टीची अचानक अंमलबजावणी झालेली दिसून येते.

या व्यवहार प्रक्रियेतून काळा पैसा, भ्रष्टाचार वेगवेगळी काळी धने सामोरे आलेली दिसून येते. अशाप्रकारे या व्यवहारातून भारतातल्या सर्व लोकसंख्येला घर बसल्या रोकड रहित व्यवहार करता येतो. या माध्यमातून वेगवेगळी सत्तासुत्रे हाती घेता येतात. भारताला विकसित राष्ट्र बनायला काहीच वेळ लागणार नाही. डिजिटल भारत हे स्वप्न मा. नरेंद्र मोदींचे आहे. ते होण्यास मदत होते. व जनता ही साक्षर ज्ञान प्रिय, सामर्थ्यवान, बलशाली व रोकड रहित व्यवहार जनता करु शकते. कुठलाही कोणताही व्यवहार हा रोकड रहित (कॅशलेस) होऊ शकतो.

या व्यवहारातून भारताचे कल्याण होईलच पण सर्वसामान्य जनता ही बुध्दिमान व सावधान होईल. कुठे? कसे? व कशा आधारे व्यवहार करावे? हे जनतेला समजून येईल.

''विनम्रता पैसा आणि सेवा करुन ज्ञानाला प्राप्त करा.''

भारत या देशाचे सामर्थ्य हे रोकड रहित व्यवहारातून दिसून येताना पाहता येते. माणसाने हे व्यवहार कोणाची मदत न घेता स्वत:हून करता येतात. या व्यवहाराची अराजकता व्यवस्थित व स्वप्नबध्द पध्दतीची दिसून येते. या व्यवहार श्रमतेतून व्यवस्थित व चांगले व्यवहार करता येतात.

''बुध्दी ही रोकड रहित व्यवहारांने पवित्र होते.'' अशा प्रकारे आपणास रोकड रहित व्यवहारांचे फायदे (सामर्थ्य) पुढील प्रमाणे सांगण्यात येतात.

**सामर्थ्य :**

१) कर चोरण्याची शक्यता नसते.

२) आपण कुठेही न जाता घर बसल्या व्यवहार करु शकतो.

३) पैसा घेऊन फिरण्याची गरज नसते.

४) आपण इंटरनेटव्दारे आपण घर बसल्या लाईटबिल, फोनबिल कोणत्याही ऑफीसला न जाता घरी बसून व्यवहार व कामे पूर्ण करु शकतो.

५) कामे ही अतिशय कमी वेळात अतिशय तेज गतीने करता येतात.

६) वेळेची बचत होते.

७) आपण रेल्वे रिझर्वेशन, बस रिझर्वेश इंटरनेटव्दारे घर बसल्या करु शकतो.

८) आपण आपल्या जवळ पैसे घेऊन न फिरता मोबाईल इंटरनेटव्दारे शॉपिंग करु शकतो.

**आणखी हेही आहेत सामर्थ्य:**

१) मोठया प्रमाणात गोपनियता पाळली जाते.

२) अतिशय सावधानता असते त्यामुळे कोणताही प्रसंग सामोरे येऊ शकतो.

३) अतिशय अप्रत्यक्षपणे व्यवहार न होता प्रत्यक्ष होतात.

४) चोरीचे प्रमाण वाढू शकतात पण त्यावर मात करता येते.

५) आर डी नंबर कोणाला माहिती नसतो त्यामुळे काही करु शकत नाहीत.

६) वेळ वाया जाऊ शकतो.

७) अप्रत्यक्ष पणे व्यवहार होतात.

८) अतिशय व्यवहार चांगले सावधतेचे असतात.

अशाप्रकारे रोकड रहित व्यवहार सांगता येतो.

**•वाडकर नेहा संगमेश्वर**
**(बी.ए.तृतीय वर्ष)**

# उर्जा देणारा :रोकड रहित व्यवहार

रोकड रहित व्यवहार यामध्ये ऑनलाईन सर्व व्यवहार चालत असतात. यामध्ये पैशाचा वापर केला जात नाही. आजकाल आपण आपल्या आजूबाजूला पाहतच असतो की, सर्व व्यवहार हे ऑनलाईन होत आहेत. एखादी वस्तू जर आपल्याला खरेदी करायची असेल तर आपण घरबसल्या त्या कंपनीला किंवा एखाद्या दुकानामध्ये मोबाईलच्या माध्यमातून संपर्क साधून ती वस्तू घरबसल्या मिळवू शकतात. म्हणजेच आपल्याला घराच्या बाहेरसुध्दा जाण्याची गरज नाही. आपण आजकाल पाहतच आहोत. आपला भारत देश हा कॅशलेस इंडिया बनत चाललेला आहे. रोकड रहित व्यवहारामुळे आपली उर्जा कमी होत नाही. म्हणजेच आपण कुठे जाण्याची आवश्यकताच नाही. रोकड रहित व्यवहार हा असा व्यवहार आहे की, एकदा मानवाने ऑनलाईन व्यवहार केला की, त्याचे त्याला वेड लागून जाईल व तो नेहमी ऑनलाईन पध्दतीचाच व्यवहार करण्यास इच्छुक असेल व तो दुसऱ्यांनाही असा व्यवहार करण्यासाठीचे मार्गदर्शन देईल.

ऑनलाईन व्यवहार हे एखाद्या सहकारी संस्थेप्रमाणे कार्य करतात. जशा सहकारी संस्था या ना नफा, ना तोटा या तत्वावर कार्य करतात. अगदी त्याच प्रमाणे रोकड रहित व्यवहारामुळे ना नफा, ना तोटा होतो. म्हणजेच ऑनलाईन व्यवहारामुळे आपले जास्तीचे पैसे उत्पादकाला जात नाहीत किंवा त्याचे जास्तीचे पैसे ही आपल्याला मिळत नाहीत. यामुळे रोकडरहित व्यवहार करणे हेच लोकांना म्हणजेच भारतीयांना आवडत चालले आहे. व रोकड रहित व्यवहार हा अतिशय सोयीस्कर आहे.रोकड रहित व्यवहारामुळे आपण घरबसल्या एखाद्या वस्तुची मागणी ऑनलाईन पध्दतीने करु शकतो. उदा. कपडे, शुज व इतर वस्तू.रोकड रहित व्यवहारामुळे आपले जास्तीचे पैसे एखाद्या उत्पादकाला जात नाहीत. किंवा त्याचे जास्तीचे पैसे आपल्याला मिळत नाहीत.

रोकड रहित व्यवहारामुळे चोरी आपल्या पैशाची होत नाही. किंवा एखाद्या व्यक्तीचे पैसे आपण चोरु शकत नाही. आपण पाहतच आलेले आहोत की, आपल्याला जर पैसे एखाद्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जायचे असतील तर आपल्या मार्गावर लोक मिळत असतात. त्यामुळे पैशाची चोरीही होऊ शकते. त्यामुळे रोकड रहित व्यवहार आज सर्वत्र चालत आहेत. आणि आपण आपले पैसे चोरी होऊ नयेत म्हणून आज रोकड रहित व्यवहारामुळे विविध बॅंका, एटीएम, व इतर ची सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. आपण आपले पैसे बॅंकेमध्ये साठवून ठेऊ शकतो. त्यामुळे आपले पैसे केव्हाच चोरीला जाणार नाहीत.

जर आपल्याला एखादी वस्तू खरेदी करायची असेल तर आपल्याला उन्हात वा पावसात घराच्या बाहेर सुध्दा जाण्याची गरज नाही. रोकडरहित
यवहाराचे तोटे जास्त प्रमाणात आहेत. किंवा नाहीत यापैकी या व्यवहाराचे तोटे जास्त प्रमाणात सांगता येऊ शकत नाहीत. जसे फायदे जास्त आहेत. त्याच्या तुलनेत तोटे कमी आहेत. तर आपण एखादी वस्तु रोकड रहित व्यवहाराच्या माध्यमातून किंवा ऑनलाईन पध्दतीने मागवली असेल तर ती वस्तू खराब सुध्दा असू शकते किंवा एखाद्या चांगल्या, दर्जेदार वस्तूऐवजी कमी दर्जाची वस्तू आपणास ऑनलाईन मिळूही शकते.

अशा प्रकारे आपल्या भारतात व सर्वच ठिकाणी रोकड रहित व्यवहार आज मोठया प्रमाणात होत असलेले दिसून येतात. आणि त्याचे वरील प्रकारे काही फायदे ही आहेत व तोटेही आहेत.याचाच परिणाम म्हणून आज हे व्यवहार मोठया प्रमाणात चालत आहेत.

**•ससाणे कैलास सुनील**
**(बी.ए.प्रथम वर्ष)**

# देशाला 'डिजिटल' करणारा : रोकड रहित व्यवहार

रोकड रहित व्यवहार म्हणजे कॅशलेस पध्दती यामुळे भरपूर सारे फायदे झाल्याचे आपणास दिसून येतात. या रोकड रहित व्यवहारामुळे आज बाजारात खूपच मोठी समस्या पण उभ्या होत असल्याच्या आपणास दिसून येतात. तसं सर्व प्रथम आपण याचे फायदे पुढील प्रमाणे.

**१) भ्रष्टाचाराला आळा:**

रोकड रहित व्यवहारामुळे आज खूप मोठया प्रमाणात भ्रष्ट मार्ग समोर आले आहेत. यामुळे सर्व सामान्य माणूस खूपच सुखी आहे. आज आपल्या भारतासारख्या विकसनशिल देशात या रोकड रहित व्यवहाराची खूपच मोठया प्रमाणात गरज आहे. जर आपल्याला डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे स्वप्न पूर्ण करावयाचे असेल तर या व्यवहाराचा पूर्णपणे लाभ घेतला पाहिजे. जे लोक लाच घेत आहेत त्यांना आता या रोकड रहित व्यवहारामुळे लाच घेता येत नाही. कारण की आता सर्व पैशाची माहिती सरकारकडे जमा होत आहे. ज्यामुळे हा व्यवहार मोबाईल, कॅम्प्युटर याव्दारे केले जातात व या भ्रष्ट व्यक्तीचा पर्दाफाश होतो. म्हणून भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी रोकड रहित व्यवहार फायद्याचा ठरलेला आहे.

**२) वेळेची बचत:**

आज आपण पाहत आहोत की, कोणाकडे निवांत बसून जेवण करण्यासाठी वेळ नाही जर मग बॅकेच्या रांगेत कोणी थांबावे असा प्रश्न सर्व नागरिकांसमोर पडत आहे. आज कालच्या फस्टलाईफ मध्ये वेळच राहिला नाही. रोकड रहित व्यवसाय यामुळे सर्व कामे सोपी झाली आहेत. पूर्वी बॅकेत जाऊन थांबून पैसे काढणे भरणे ही प्रक्रिया मोठया प्रमाणात चालत होती. पण आता तशी गरज नाही. आता मात्र आपल्याला घरबसल्या सर्व बॅकीगच्या सोयीसुविधा आपल्या मोबाईलवर उपलब्ध झाल्या आहेत. घर बसल्या आता आपण सर्वच बॅकेतली कामे करु शकतो ते पण खूपच कमी वेळेत पैसे

काढणे—भरणे आता सोपे झालेले आहे. म्हणून रोकड रहित व्यवहार फायद्याचा ठरत आहे.

### ३) Digital India:

ही संकल्पना रोकड रहित व्यवहारामुळे पूर्ण होत आहे. कारण कोणीच आता बॅकेच्या रांगेत जास्त वेळ दिसणार नाही. आता पूर्णपणे आपला भारत देश कॅशलेस होताना आपणास पहावयास मिळत आहे. पूर्ण भारताने जर ठरवले की, आता फक्त कॅशलेसच व्यवहार करायचा तर या देशाचा पूर्ण अवतारच बदलून विकसीत झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून फारच गुणकारक फायदे या व्यवहारातून साध्य होतात.

पण जशा नाण्याला दोन बाजू असतात त्याचप्रमाणे याच्याही दोन बाजू आहेत चांगल्यापण आणि वाईटपण. आपण चांगली बाजू पाहिली आता आपण त्याची दुसरी बाजू म्हणजेच पाची बोटे का होतात हे पुढील प्रमाणे पाहणार आहोत.

**रोकड रहित व्यवहाराचे तोटे:**

**१) माणसाची फसवणूक:**

हो हे तितकेच बरोबर आहे जितके आपण समजलो ते असं की, काही गावातील माणसं शिकलेले नसतात त्यांना यामध्ये काहीच माहिती नसते. अशावेळी शिकलेल्या लोकांकडून ते फसवलेजातात.

उदा. एखाद्या व्यक्तीला मोबाईल मधील काहीच कळत नसेल त्याने एखाद्याला मदत मागितली तर जो शिकलेला व्यक्ती त्याचा फायदा घेतो व पूर्णपणे त्याची फसवणून करु शकतो. म्हणून रोकड रहित व्यवहाराचे जसे फायदे आहेत त्याचप्रमाणे ज्याचे अशा प्रकारे तोटेपण आहेत.

**२) खेडेगावची जास्त संख्या:**

भारत देश हा खेडयांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतात ६७ टक्के खेडे गाव आहेत. त्यामुळे खेडे गावातील माणसे या रोकड रहित व्यवहारापासून दूर जात असतात. ज्यांची फसवणूक होऊ नये म्हणून ते आपल्या गावाजील व्यवहार हा तसाच चालू ठेवतात. अगोदर हे सर्व आपणास

बदलता आले पाहिजे.ज्यांना सर्व सोयी सुविधा पुरविल्या गेल्या पाहिजेत. खेडेगावातील माणसे अशिक्षित असल्यामुळे या व्यवहाराला ते मान्य करत नाहीत. जे पूर्णपणे सुशिक्षित झालेले असतात त्यांना व्यवहारात ज्ञान असते.**३) अज्ञान:**

अगोदर आपणास हे माहिती असावं की, आपला भारत देश खेडेगावचा देश म्हणून ओळखला जातो. तिथे पूर्णपणे सुविधा पोहचल्या जात नाहीत. तेथिल लोक अज्ञानी असतात. रोकड रहित व्यवहार अगोदर ज्यांना याची पूर्ण सविस्तर माहिती घ्यावी लागते ते अज्ञानी असल्यामुळे त्यांना या व्यवहारातच काही एक समजत नाही. त्यामुळे पूर्ण भारत रोकड रहित व्यवहार करणे अशक्य आहे. भारतातील लोकांचा अज्ञानीपणा हा फार मोठा तोटा आहे. हा जर अज्ञानीपणा दूर केला तर काहीतरी सिध्द होऊ शकेल.

**४) गरिबी:**

भारत हा गरीबांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतातील ९० टक्के लोक गरीब आहेत. कोणीतरी असे म्हटले आहे की, भारतात परत दोन देश राहतात. India म्हणजे १० टक्के लोक असलेला देश व हिन्दुस्थान म्हणजे ९० टक्के गरीब असलेला देश या व्यवहारातून आर्थिक स्वप्न पूर्ण होऊ शकते. पण ९० टक्के लोकांपाशी पैसाच राहत नाही. ही फार मोठी समस्या आपणास पहावयास मिळते. गरीब लोकांकडे पैसा नसल्यामुळे मोबाईल विकत घेऊ शकत नाहीत. ज्यामुळे आपला Digital India चे व रोकड रहित व्यवहाराचे स्वप्न पूर्ण होणे अशक्यच आहे. त्यामुळे फार मोठया प्रमाणात रोकड रहित व्यवहाराचे तोटे आपणास पहावयास मिळतात.

रोकड रहित व्यवहार हा अतिशय चांगल्या प्रकारचा व्यवहार आहे. पण त्यात काही अडचणींना आपणास सामोरे जावे लागते. कोणतीही गोष्ट साध्य होण्यासाठी थोडा वेळ लागतोच ज्यामुळे पूर्णपणे कॅशलेस व्यवहार भारतासाठी थोडा कालावधीही नक्कीच लागेल. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत.

• **गोरे शंकर बाबुराव**
**(बी.ए.व्दितीय वर्ष)**


महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर
NAAC - छायांकित
आसूड
२०१६-१७
'नॅक पीयर' टीमचे महाविद्यालयात असे झाले आगमन...
'नॅक पीयर' टीमचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार स्वागत करतांना.
'नॅक पीयर' टीमचे शिवकालीन वातावरणात तुतारीच्या निनादाने केलेले स्वागत
'नॅक पीयर' टीम 'प्रिंसिपल मीट'

# रोकड रहित व्यवहाराच्या दोन बाजू

रोकड रहित व्यवहारामध्ये आपण रोखा पैशाचा व्यवहार करु शकतो. आज आपण रोख पैशाचा व्यवहार करु शकतो. या व्यवहारात आपणास बॅकाच्या चकरा मारण्याची गरज नाही. मोबाईल वरतीच सर्व व्यवहार होतात. आज आपण घरी बसून सर्व सामान खरेदी करु शकतो. आज बॅकेमध्ये पैसे उपलब्ध नसले तरी ही आपण सर्व सामान खरेदी करु शकतो.

आपला भारत देश हा बदलत आहे. जेथे कधीकाळी चोर, लुटेऱ्यांची भिती होती. आता ती भिती नाहिशी झाली आहे, असे आपण म्हणू शकतो. कारण रोकड रहित व्यवहारामुळे आपण घरी बसल्या सर्व सामान खरेदी करु शकतो. आता तर घराच्या बाहेर ही जाण्याची काही गरज नाही.

**रोकड रहित व्यवहाराचे फायदे —**

१) आता नोटा हातात घेऊन जाण्याची काही गरज नाही.

२) नोटा हातात नसतील तर चोराची भिती ही राहणार नाही.

३) दुकानदाराकडे जर आपले पैसे असतील तर तो १,२ रुपयाचे चॉकलेट देण्याच्याऐवजी आपले पैसे आपणास परत देईल.

४) त्यामध्ये आपली खरेदी ही बरोबर होईल व दुकानदाराची विक्रीही बरोबर होईल.

५) आपले जास्त पैसे ही जाणार नाहीत व कोणाचे जास्त पैसे आपल्याकडे ही येणार नाहीत.

अशा प्रकारे आपणास रोकड रहित व्यवहाराचे फायदे सांगता येतात. ज्याप्रमाणे रोकड रहित व्यवहाराचे फायदे आहेत. तसेच त्याचे तोटेही आहेत. ज्याप्रमाणे प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. त्याचप्रमाणे प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात.चांगली बाजू व वाईट बाजू मग आपण कसा विचार करतो, त्यावर हे सर्व अवलंबून असते.

**रोकड रहित व्यवहाराचे तोटे:**

प्रत्येक गोष्टीत कोणाचा ना कोणाचा तोटा किंवा फायदा हा होतच असतो. तसेच रोकड रहित व्यवहारामध्ये तोटे होतात. त्यामध्ये कधी कधी मोबाईल हा बंद पडू शकतो. तेव्हा रोकड रहित व्यवहार आपण करु शकत नाही. तेव्हा व्यवहार कसा करावा ते समजते. नोट बंदीमुळे लोकांना रांगेत थांबावे लागते व लोकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते.

आपण आपल्या पैशाचा वापर हा चुकीचा करु शकतो. त्यामध्ये बाहेरचे पदार्थ घरात मागवणे त्यामुळे आपण सर्व आळशी होऊ शकतो. आईने भाजीपाला किंवा इतर वस्तू आणण्यासाठी सांगितल्यानंतर आपण बाजारात न जाता भाजीपाला घरात मागवतो.

आपण सर्व मोबाईलचा वापर करत असल्यामुळे माहिती नसते की, पैसे आहेत की नाहीत. रोकड रहित व्यवहारामुळे आपण सर्व पैसे खिशात ठेवत नाही. त्यावेळी अनेक अडचणी येतात.

१) रोकड रहित व्यवहारामध्ये आपल्याकडे पैसे असलेतरी कधी कधी आपणास देता येत नाही. कारण शेतकरी माणसाकडे तेवढया महागाचे मोबाईल सध्या उपलब्ध नाहीत. तेव्हा आपल्याकडे पैसे असतानासुध्दा आपण पैसे देऊ शकत नाही. किंवा दुसऱ्याकडून मागून पैसे द्यावे लागतात.

२) रोकड रहित व्यवहारामध्ये आपण काही सामान घेतले व पैसे देण्यासाठी मोबाईल काढल्या व पैसे ट्रान्सफर झाले नाही. मग आपणास आपली आवडती वस्तू ही आपण घेऊ शकत नाही.

३) गावी गेल्यानंतर गावाकडील लोकांकडे मोबाईल नसतात. तेव्हा तेथे ही काही वेळेस आपण पैसे देऊ शकत नाही.

४) आपल्याकडे पैसे असताना ही आपण काही वेळेस पैसे देऊ शकत नाही हे रोकड रहित व्यवहाराचे तोटे आहेत.

- **शिवदासे पल्लवी देवीदास**
  **(बी.ए.प्रथम वर्ष)**

# रोकड रहित व्यवहार : फायदे व तोटे

गुणवत्ता सुधार म्हणजे आजच्या आधुनिक काळात सर्व काही आज एकच ऑनलाईन उपलब्ध आहेत. आज गुणवत्ता शेवटी वाढलेली आहे की फक्त आज सर्व काही इंटरनेट, पेटीएम, एटीएम या सर्व माध्यमातून आज जग पुढे चाललेले आहे.गुणवत्ता सुधार आपण खालील प्रमाणे पाहणार आहोत.

**१) एटीएम २) ऑनलाईन ३) डेबिट कार्ड**

उदा : आपण जर एखादी वस्तू खरेदी करण्यासाठी गेलात तेव्हा आपण पॉकेट, पर्स जर आपण विसरलात तर मोबाईलच्या सहायाने आपण ते पेटिएम करु शकतो. आपण जर एखादी वस्तू खरेदी करायची असेल, तर आपण ऑनलाईनच्या माध्यमातून अथवा मोबाईलच्या माध्यमातून ते आपण खरेदी करु शकतो. आपणाला टी.व्ही. रिचार्ज करावयाचा असेल तर ते आपण मोबाईलच्या सहायानेसुद्धा करु शकतो. आपण अनेक प्रकारच्या सुविधा आज गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत आपण आज त्या वस्तूच्या सेवा अथवा सुविधा करु शकतो. आज गुणवत्ता सुधार मध्ये अनेक प्रकारची सुविधा आहे. अनेक प्रकारचे सुखसुविधा पुरविली जातात.इंटरनेटच्या माध्यमातून तो घर बसल्या करु शकतो. इंटरनेटच्या माध्यमातून अनेक वस्तूंची खरेदी–विक्री करु शकतो. इंटरनेटच्या सहायाने आपण कपडे खरेदी करु शकतो.

**रोकडरहित व्यवहार फायदे**

एटीएम कार्डसुध्दा खरेदी करु शकतो. आज आपण जर काही वस्तू खरेदी करावयाची असेल आपण एटीएम कॉर्डव्दारे, ते खरेदी करु शकतो. आजचे युग हे रोकड रहित व्यवहाराचे आहे. आज आपण काही घेतले किंवा विकत असलो तर ते आपण पेटीएम व्दारे करु शकतो. आणि जर आपणाला रिचार्ज करायचा असेल समजा त्यामध्ये एटीएम, पेटीएम, ऑनलाईन या सर्व मार्गाव्दारेकरु शकतो. इंटरनेटवर जर क्लिक केले तरआपणाला जे पाहिजे ते मिळू शकते.

आज आपणाला सर्व काही इंटरनेटच्या सहायाने मिळू शकते.कोणत्याही बसल्या ठिकाणी हवे ते मिळू शकते आज मात्र बाजारात जाऊन त्यांची खरेदी करण्याची गरज नाही. आपण ऑर्डर केल्यानंतर हवे ते आपणाला घरी पोचवतात. आज हे अशा विविध सुविधा आपणास उपलब्ध आहे. जर आपण काही खरेदी करण्यासाठी गेलेलो असलो तरी आणि आपल्या जवळ पैसे नसले तरी ते पेटीएम अंतर्गत आपण पेड करु शकतो. जर आपण ऑटोमध्ये जात असलो आणि ऑटोरिक्शावाला जर तुम्हाला पैसे मागत असला तेव्हा तुमच्या लक्षात आले की, तुमचे पॉकेट अथवा पैसे घाई घाईत घरी विसरला असेल तेव्हा तुम्ही तुमच्या मोबाईलच्या सहायाने तुमचे जेकाही भाडे आहे, ते तुम्ही मोबाईलच्या सहायाने देऊ शकतोत. जर तुमचा छोटा भाऊ, बहीण दुसऱ्या शहरात अथवा परदेशात राहत असतील तर तुम्ही त्यांच्या अकाऊंटवर तुम्ही पैसे पाठवू शकता. आज सर्व काही वस्तू खरेदी विक्री इंटरनेटच्या सहायाने सोप्या झालेल्या आहेत. तुम्हाला जर तुमचे पैसे उचलायचे असतील तर तुम्हाला बॅकेमध्ये जाऊन रांगेत थांबून पैसे काढून आणायची आज आवश्यकता नाही. कारण जर तुम्ही एटीएममध्ये गेलात तर तुमचा जो पासवर्ड आहे तो टाईप केल्यानंतर तुम्हाला पैसे मिळतात. आज मोठया प्रमाणावर रोकड रहित व्यवहार सुरु आहेत.

काही दिवसापूर्वी गॅस बुकींगसाठी गॅस एजन्सीमध्ये जाऊन गॅस बुकींग करावा लागत असे परंतु आज मात्र मोबाईलमध्ये गॅस बुकींग टाईप केला व त्याला कॉल केला की, आपला गॅस लगेच दुसऱ्या दिवशी आपल्या घरी येतो. अगदी त्याचप्रमाणे आधुनिक युगामध्ये आपण फार बदललेले आहोत. आपण बसल्या ठिकाणी ऑनलाईन वस्तू–विक्री–खरेदी करु शकतो. आपण नगदी पैसे देण्याऐवजी त्यांना पेटीएम करु शकतो. कोणतीही वस्तू मोबाईलमध्ये इंटरनेटच्या सहायाने टाईप केल्यास ती वस्तू मिळू शकते.

- **काबलिया वैष्णवी गोविंद**
  **(बी.ए.प्रथम वर्ष)**

# रोकड रहित व्यवहार : स्वरुप व वास्तव

**रोकड रहित व्यवहाराचे फायदे:**

रोकड रहित व्यवहार झाल्यामुळे खूप मोठया प्रमाणात लोकांना फायदा झालेला आहे. रोकड रहित व्यवहारामुळे चोरीचे प्रमाण कमी झालेले आहे रोकड रहित व्यवहारामुळे आपल्याला कुठेही पैशाचा व्यवहार करता येतो. रोकड रहित व्यवहारामुळे लोकांची धावपळही कमी झालेली आहे. त्याच कारणाने लोक कुठेही बसून आपले दैनंदिन काम पूर्ण करु शकतात. रोकड रहित व्यवहारामुळे भारतामध्ये राहणाऱ्या लोकांचा खूप मोठया प्रमाणात फायदा झालेला आहे. बॅकेमधून पैसे काढणे आणि त्या माणसापर्यंत पोहचवणे ही खूप मोठया प्रमाणात भिती होती. पण आता कॅशलेस व्यवहार झाल्यामुळे लोकांना आपला एटीएम नंबर देऊन तोच पैसा दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहचवता येतो.

रोकड रहित व्यवहाराचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे रोकड रहित व्यवहार झाल्यामुळे आता लोकांना टॅक्स पूर्ण भरावा लागेल म्हणजे लोकांना चोरीकरुन माल विकता येणार नाही. आता जेवढे कमावले तेवढे दाखवावे लागेल आणि आपल्या पध्दतीने व्यवहार करता येईल. प्रत्येकजण घरी बसल्यावरसुध्दा व्यवहार करु शकणार आहे. महिला घरी बसून व्यवहार करु शकतील. आपले एटीएम नंबर देऊन ज्या वस्तू पाहिजेत त्या वस्तू खरेदी करु शकतील. रोकड रहित व्यवहारामुळे लोकांचे ओझे सुध्दा कमी झालेले आहेत. लोकांच्या अनेक गरजा लवकर पूर्ण होण्याची शक्यतासुध्दा आहे. आता प्रत्येकाचा फायदा होताना दिसत आहेत. कॅशलेस व्यवहारामुळे प्रत्येक व्यक्ती आपल्या वस्तू रोकड रहित खरेदी करु शकतो.कॅशलेसमुळे एखादा माणूस बाहेर काम करत असेल तर तो तिथेच बसल्या बसल्या आपल्या घरी वस्तू पाठवू शकतो. एटीएमच्या सहायाने हे सर्व करु शकतो. एखाद्या व्यक्तीला रात्री—बेरात्री पैशाची गरज भासली तर तो लगेच आपल्या एटीएममधून पैसे काढू शकतो.रोकड रहित व्यवहाराचे फायदेसुध्दा खूप मोठया प्रमाणात आहेत.

आणि तोटे सुध्दा खूप मोठया प्रमाणात आहेत.रोकड रहित व्यवहाराचे फायदे पुढील प्रमाणे सांगता येतील.

**रोकड रहित व्यवहाराचे तोटे :**

रोकड रहित व्यवहाराचे तोटे पुढील प्रमाणे सांगता येतात. रोकड रहित व्यवहार झाल्यामुळे खूप मोठया प्रमाणात तोटेसुध्दा होत आहेत ते म्हणजे लोकांना पैसा लवकर मिळत नाही. शेतकऱ्यांना आपल्या मालाचा हमी भाव मिळत नाही. कारण प्रत्येक शेतकरी आपले खाते बॅकेत जाऊन काढू शकत नाही. रोकड रहित व्यवहार झाल्यामुळे प्रत्येक व्यक्ती आपला माल किंवा पैसा साठवू शकत नाही त्यामुळे व्यवहार हे खूप मोठया प्रमाणात बंद झालेले आहेत. रोकड रहित व्यवहाराचा त्रास हा सर्वात जास्त अज्ञानी लोकांना झालेला आहे. कारण त्यांना कोणते अॅप कसे चालवावे हे त्यांना माहिती नाही आणि त्यांना मोबाईल कसे वापरावे हे सुध्दा माहिती नाही.

अशा लोकांना खूप मोठया प्रमाणात तोटा होत आहे कॅशलेसमुळे किती तरी लोकांनी आपला जीव गमावलेला आहे. प्रत्येक व्यक्तीना बॅकेमधून रांग करुन थांबावे लागत आहे. कॅशलेसमुळे प्रत्येक व्यक्ती आपल्या गरजा पूर्ण करु शकत नाही त्यामुळे तो आत्महत्या सुध्दा करत आहेत. रोकड रहित व्यवहारामुळे प्रत्येकाला उपासी पोटी मरावे लागत आहे. कारण हातात पैसा नसला तर तो काढून आपल्या घरातील लोकांच्या गरजा पूर्ण करु शकत नाही. शाळेमध्ये मुलांना किंवा विद्यार्थ्यांना परीक्षा फीस न दिल्यामुळे परीक्षेमध्ये बसू दिले जात नाही.

अशा प्रकारे रोकड रहित व्यवहाराचे तोटे सांगता येतील.

**• नाखुवा निशा अरविंद**
**(बी.ए.प्रथम वर्ष)**

# रोकड विरहित व्यवहार :व्यावहारिक स्वरुप मीमांसा

आज भारत देशामध्ये अनेक वर्षापासून सुरु असलेला भ्रष्टाचार या रोकड व्यवहारामुळे बंद झाला आहे. नोटाबंदी होण्याचे एकमेव कारण म्हणजे भ्रष्टाचार मुक्त भारत करणे. रोकड व्यवहारामध्ये सर्वच लोकांना खूप फायदा झाला आहे. फायदा हा सर्वच लोकांना झाला असे म्हणता येणार नाही. कारण या रोकडव्यवहारामध्ये गोरगरीब सामान्य माणूस यांना फार त्रास सहन करावा लागला आहे.

**रोकड व्यवहाराचे फायदे:**

१. रोकड व्यवहारामध्ये सर्व सामान्य लोकांना रोकड व्यवहार कसा होतो व त्यामुळे त्यांना घरबसल्या अनेक सोयी सुविधांचा उपयोग होतो.

२. शिक्षणतज्ज्ञ लोकांना तर यांचा भरपूर फायदा होतो. त्यांना आपले काम करत करत रोज व्यवहारही करता येतो.

३. आपण घरबसल्या मोबाईलवर रिचार्ज करु शकतो. रोकड व्यवहारामध्ये सर्व कामे सुरळीत होतात.

अशा रोकड व्यवहारामुळे देशात कुठेही भ्रष्टाचार होत नाही. व देश हा भ्रष्टाचार मुक्त होतो. व गोरगरीब लोकांना याचा भरपूर फायदा होतो. तसेच या व्यवहारामुळे सर्वसामान्य माणूस हा स्वत:चे कामे स्वत: करतो.

**रोकड व्यवहाराचे तोटे:**

रोकड व्यवहारामुळे जसे याचे फायदे झाले तसेच या व्यवहारामुळे बरेच नुकसान झाले आहे. यामुळे गोरगरीब माणसाचे खूप मोठे नुकसान झाले आहे. याचे तोटे खालीलप्रमाणे आहे.

१) रोकड व्यवहारामध्ये अज्ञानी लोकांचे खूप नुकसान आहे. कारण हे लोक अज्ञानी असल्यामुळे यांना रोकड व्यवहार करता येत नाही. आणि आजचे युग हे स्पर्धेचे व कॅम्पुटरचे युग आहे. त्यामुळे त्यांना यातले काहीच कळत नाही. कारण ते अज्ञानी असल्यामुळे त्यांना यातले काहीच

कळत नाही व यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

२) रोकड व्यवहारामुळे लवकर बॅकेतून पैसे काढण्यासाठी लोकांना खूपच त्रास झालेला आहे. जे लोक अज्ञानी आहेत त्यांना पैसे काढण्यासाठी बॅकेत जावे लागते त्यामुळे त्यांना रोकड व्यवहार करता येऊ शकत नाही.

३) रोकड व्यवहारामुळे अनेक गोरगरीब लोकांना याचा तोटा झाला आहे.जे निरक्षर आहेत त्यांनाही रोकड व्यवहाराचा खूप तोटा झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांनाखूप त्रास झाला आहे. रोकड व्यवहारामुळे सर्वसामान्य लोकांचे खूप नुकसान झाले आहे. तसेच रोकडव्यवहारामुळे काही लोकांचे फायदे ही झाले आहेत व काहींचा तोटाही मोठया प्रमाणावर झाला आहे.

- **वाघमारे एकनाथ केशव**
  **(बी.ए.प्रथम वर्ष)**

## रोकड विरहित व्यवहार : एक चिकित्सा

आजपर्यंत समाज व्यवहारामध्ये रोकड व्यवहारास अनन्य साधारण महत्त्व होते व पुढेही त्याला असेच महत्त्व असणार. रोकड रहित व्यवहार म्हणजे काय? तर रोकड रहित व्यवहार म्हणजेच जे व्यवहार रोख पैश्याच्या सहाय्याने केले जात नाहीत तर इंटरनेटच्या सहाय्याने पूर्णकेले जातात. मानवाने चलन निर्मिती ही व्यवहार सोपे करण्यासाठी केली होती सुरुवातीला मानवाने साधणांची म्हणजेच वस्तुंची देवाण—घेवाण करुन व्यवहार केले पण ते व्यवहार किचकट वाटू लागले. नंतर मानवाने कवडयाचा उपयोग चलन म्हणून व्यवहारामध्ये करु लागला पण तेही व्यवहार सुटसुटीत असे झाले नाहीत त्यामुळे मानवाने सोने, चांदी अशा चलनाची निर्मिती केली व त्यानंतर रुपया, नोटा या स्वरुपामध्ये विकसित झाले.

रोकड रहित व्यवहार हे एका बाजूने पाहिले तर ते मानवी व्यवहारामध्ये रोख पैसा वापरला जात नाही.त्यामुळे व्यक्तिकडे किती उत्पन्न खर्च करतो याची माहिती सरकारला मिळत असते. त्याचा फायदा असा की, त्यामुळे काळापैसा कमी होतो.काळा पैसा कमी झाल्यामुळे मानव समान पातळीवर येऊन पोहचेल. देशामध्ये निर्माण झालेली विषमतेची पातळी कमी होते. त्याचा दुसरा फायदा असा की, मानव इंटरनेटच्या सहाय्याने व्यवहार करत असल्यामुळे भ्रष्टाचारास आळा बसेल भ्रष्टाचार कमी होईल. भ्रष्टाचार कमी झाल्यामुळे देशातील लोकांचा आत्मविश्वास वाढेल.रोकड व्यवहारामध्ये सोबत रोख पैसा बाळगावा लागत असतो. त्यामुळे सतत त्या रोख रक्कमेची काळजी करावी लागत असे. रोख रक्कम ही कधीही चोरिला जाऊ शकते. किंवा हरवली जाते. त्यामुळे तो धोका रोकड रहित व्यवहारामुळे सुटे पैश्यासाठी जी तफावत निर्माण होत होती ती आता दूर होण्यास मदत होईल. मोदी सरकारने नोटाबंदी कायदा केला व दोन तीन महिने मानवाला त्या नोटाबंधीच्या संकटाला सामोरे जावे लागले. त्या संकटात कॅशलेस व्यवहार मदतीस आले. त्यामुळे माझ्यामते, मानवी समाज व्यवहारामध्ये रोकड रहित व्यवहार खूप फायद्याचा ठरणार आहे.

कोणत्याही वस्तु, व्यक्तीमध्ये जसे चांगले गुण असतात. तसेच काही वाईट गुण ही असतातच, तश्या प्रकारे रोकड रहित व्यवहाराचे काही तोटे ही आपणास सांगता येईल. रोकड रहित व्यवहार हे इंटरनेटच्या सहाय्याने चालवले जाते. इंटरनेटसाठी नेटवर्क ची आवश्यकता असते. कधी—कधी काही भागात नेटवर्क असतच नाही. तेव्हा तेथे व्यवहार कसा करायचा? हा मोठा प्रश्न मानवासमोर उभा राहतो. तेव्हा त्या भागातील व्यवहार ठप्प होईल हे एक रोकड रहित व्यवहाराचे मोठे संकट आहे. दुसरा तोटा म्हणजेच रोकड रहित व्यवहार हे शहरामध्ये यशस्वी होऊ शकतो; कारण तेथे रोकड रहित व्यवहारासाठी मशिन्स असतात. तेथे नेटवर्कची समस्या नसते. तिथे मोठे व्यापारी असतात. त्यामुळे शहरी भागामध्ये रोकड रहित व्यवहार पार पाडता येतात. पण खेडे गावामध्ये, आदिवासी भागामध्ये हे व्यवहार कसे चालणार?

त्याच्यासाठी खेडे गावामध्ये रोकडरहित व्यवहार होणे फार प्रमाणात शक्य नाही. खेडे गावामध्ये छोटे व्यापारी असतात. त्यामुळे कमी व्यवहार होतात. खेडयामध्ये रोजच्या रोज उत्पन्न कमवून जीवन भागवावे लागते. त्यामुळे छोटे व्यवहार करण्यासाठी रोकड रहित व्यापार हे वावगे ठरणार नाही. आणि छोटे व्यापारी छोटया व्यवहारासाठी रोकड रहित व्यवहार करणे टाळतील त्यामुळे ग्रामीण क्षेत्रामध्ये रोकड रहित व्यवहार करणे अवघड होईल.

रोकड रहित व्यवहाराचे फायदेही मोठया प्रमाणात आपणास मिळू शकतात.

**•पठाण गुलशन सत्तार**
**(बी.ए.तृतीय वर्ष)**

## काही फायद्याचा तर काही तोटयाचा: रोकड रहित व्यवहार

आपल्या देशात रोकड रहित व्यवहार चालू झाला आहे. यामुळे पैश्याच्या व्यवहारात होणारे घोटाळे बंद झाले आहेत. व्यवहार करताना ऑनलाईन व्यवहार करावा लागत आहे. रोकड रहित व्यवहारामुळे अनेक फायदे होत आहेत. तसे याचे तोटे ही होत आहेत.

रोकड रहित व्यवहाराचे फायदे पाहिले तर बॅंकेचा व्यवहार घरी बसल्या बसल्या आपल्या मोबाईलने करु शकतो. कोणताही व्यवहार असेल तर पैसे घेऊन फी भरावी लागत होती पण आता फक्त एकच कार्ड घेऊन फी भरावी लागते ते म्हणजे क्रेडीट कार्ड. वेगवेगळे ॲप्स निघाले आहेत.यामुळे नोटांचा व्यवहार करत असताना आपले पैसे चोरीला जाण्याची, हरपण्याची शक्यता होती पण आता चोरीला जाण्याची भिती वाटत नाही. चोरीला जाण्याची भिती वाटत नाही. व्यवहार करत असताना आपल्याला खूप वेळा बॅंकेत जावे लागायचे पैसे भरण्यासाठी पैसे काढण्यासाठी पण आता जाण्याची गरज नाही.

रोकड रहित व्यवहाराचे फायदे तर झालेच पण त्या सोबत तोटे ही खूप झाले. ज्या लोकांनी इ—बॅकीगंचा व्यवहार कधीच केला नाही. त्या लोकांना याचा फायदा नाही. शेतकऱ्यांना व लहान लहान खेडयात राहणाऱ्या लोकांना याचा उपयोग करता येत नाही. असे लोक रोकड रहित व्यवहारात येत नाहीत. रोकड रहित व्यवहार झाल्यापासून काही खाते बंद पडल्याच्या व कोणीतरी पैसे काढून घेतल्याची बातमी रोज येत आहेत.

साधा फोन लावता येत नाही मोबाईलवर, मग काय करील रोकड रहित व्यवहार अशा लोकांनी हा व्यवहार कसा करावा. आज खरी गरज आहे. म्हणजे ती ही की, ठिक—ठिकाणी जाऊन खेडो पाडयाने जाऊन याची माहिती सांगीतली जावी. रोकड रहित व्यवहार कसा करावा व कसा केला जातो याची माहिती शेतकरी बंधुना, ज्यांना या व्यवहाराची माहिती नाही अशा लोकांना माहिती दिली पाहिजे. सर्वानी मिळून रोकड रहित व्यवहार केला पाहिजे. कोणालाही रोकड रहित व्यवहाराविषयी सांगणे हे फक्त शासनाचेच काम नाही. आपण ही शेतकऱ्यांना याची माहिती दिली पाहिजे. आपला व्यवहार नोटाच्याव्दारे न करता इ—बकिंगव्दारे, ऑनलाईन व्यवहार करावा त्यामुळे कसलीही अडचण आपल्याला येणार नाही. सर्वांनी या व्यवहाराचा वापर करावा.

**• नालबंद प्रतीक सोमनाथ**
**(बी.ए.प्रथम वर्ष)**

## रोकड रहित व्यवहाराचा जनमानसावरील प्रभाव

आजच्या युगात पैशाला अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहेत हे आपण बघत आहोत. पैशावर आपण चालत आहोत. आज काल चे व्यवहार हे सर्व रोकड बनले आहेत. आणि त्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहेत. त्यांचे मोठया प्रमाणात फायदे आहेत व तसेच त्यांचे तोटे

झालेले आपणास लक्षात येतात. म्हणून त्याचा मोठया प्रमाणात विस्तार हा वाढत आहे.

मित्रहो आजचे युग हे इंटरनेटचे युग म्हणून पाहिले जाते. अत्यंत मोठया प्रमाणात त्याचा प्रसार झालेला आहे. ए.टी.एम. या ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी झालेली आहे. वेगवेगळया ठिकाणी त्या गरीब जनतेवर मोठया प्रमाणात संकट आले आहे. कारण व्यवहार हे फार मोठया प्रमाणात चालत आहेत. त्यांचा विचार करण्याची क्षमता अत्यंत मोठया प्रमाणात वाटत होती. त्याचे फायदे व्यापाऱ्याला होत होते म्हणून नोटा बंदीचे फायदे आपणास लक्षात येतात. म्हणून विचारवंतानी या गोष्टीचा मोठया प्रमाणात वापर करण्याचा प्रयत्न त्यानी केला आहे. म्हणून या रोकड व्यवहाराला मोठया प्रमाणात गती देण्याचे काम चालले आहे.

या रोकड व्यवहाराचे फायदे व तसेच तोटे हे मोठया प्रमाणात जनतेवर झालेले आहेत. त्या प्रमाणात फायदे म्हणजे बॅकांनाही झाले आहेत. रोकड व्यवहार हा मोठया प्रमाणात भारतात चालत आहे.म्हणून नरेंद्र मोदींनी नोटा बंदी कायदा आत्मसात आणण्याचे प्रयत्न केले आहेत. कमी लोकांचा तोटा त्यात होणार आहे पण त्यात जास्त लोकांचा फायदा या रोकड व्यवहारात होणार आहे. याची लोकांना जाणीव व्हावी त्यामुळे अनेक व्यक्तीचेसंकट व अडचणी कमी होणार आहेत. त्यात त्यांचा फायदा व विकास होणार आहे. म्हणून त्यांच्यासाठी ही मोहीम मोठया प्रमाणात चालू करण्यात आली.याचे जाळे हे फार मोठया प्रमाणात वापरण्यात आले व त्याची रोकड किती प्रमाणात जमा व्हावी, त्याचे व्यवहार करण्याची क्षमता किती असावी इत्यादी सर्व गोष्टींचा विचार त्यात मांडण्यात आला आहे.

अशा प्रकारे रोकड व्यवहार त्याचे फायदे व तोटे, महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे.

**• गोरे परमेश्वर गोविंदराव**
**(बी.ए.तृतीय वर्ष)**

# देशाचा रोकड रहित व्यवहार

८ नोव्हेंबर २०१६ रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५०० व १ हजार रुपयांच्या नोटा चलनातून बंद करुन ५०० व २ हजार रुपयांची नवीन नोट काढली.तेव्हाच त्यांनी आपला देश हा रोकड रहित व्यवहार करणारा झाला पाहिजे, असे सांगितले. परंतु पहिल्यांदा त्याचा वापर करण्यासाठी त्रास हा होतोच पण त्याचा फायदा ही त्यापेक्षा जास्त होणार आहे.

अनेकजन भांडवल गुंतावागुंतीच्या मागे लागलेले आहेत. परंतु त्याचा फायदा इतरांना थोडा सुध्दा होत नव्हता. गरीब जनता ही पैशामुळे खूप हाल सोसत होती. परंतु रोकड रहित व्यवहारामध्ये तसे काही सुध्दा होणार नाही. कारण लोकांना आहे तेवढेच पैसे वापरायला लागतील. काळा पैसा हा आता कोणाजवळही राहणार नाही. रोकड रहित व्यवहार झाल्यामुळे हा एक मोठा फायदा होईल.डिजिटल पेमेंट पध्दतीमुळे कर चुकवेगिरीला आळा बसेल व काळा पैसा हा कोणाजवळही राहणार नाही. रोकडरहित व्यवहार झाल्यामुळे आपल्याला पैसे वाहून ओझे घेऊन जाण्याची गरज भासणार नाही व चोर व दरोडेखोरांची त्याच्यापासून पूर्णपणे मुक्तता होईल. त्यामुळे सगळयांना विचार करुनच रोकडरहित व्यवहार करावा लागेल.

रोकड रहित व्यवहार जर सर्वांनीच केला तर बॅकांवरील ताण कमी होईल. कोणताही त्रास होऊ नये म्हणून बॅक सुध्दा जास्त कर्ज देणार नाही. बॅकांवरील ताण कमी झाल्यानंतर लोक अर्थव्यवस्थेकडे नीट लक्ष देतील. भारतीय अर्थव्यवस्था ही चांगल्या प्रकारे व सुरळीत कारभार चालवेल. काळा पैसा बाहेर निघाल्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेत भर पडेल. रोकड रहित व्यवहार झाल्यामुळे भारताची प्रगती ही विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे होईल. भारत हा शेतकऱ्यांचा जरी देश असला तरी लोक हे भारताला विकसित करण्याच्या वाटचालीकडे नेहतील.

रोकडरहित व्यवहार झाल्यामुळे देशाच्या चलन व्यवस्थेत वाढ होईल. शेअर बाजारात वाढ होईल. व्यापार व उद्योगधंद्यांना चालना मिळेल. लोक नवनवीन उद्योगधंदे सुरु करतील. लोक आपल्याजवळ जास्त पैसे ठेवणार नाहीत. अशाप्रकारे भारत देश हा नोटाबंदी मुक्त म्हणून ओळखला जाईल.

रोकड रहित व्यवहारामध्ये जास्त जणांना आपल्या सोबत पैसे बाळगण्याची गरज भासणार नाही. आपण प्रवास करत असताना सुध्दा एखाद्या दूरवर ठिकाणी जाण्यासाठी पैसे जर सोबत असतील तर मनामध्ये सतत भीती राहत होती. व ताण खूप वाढत होता. आता आपणाला कशाचीही भीती वाटणार नाही. परंतु आपले आधारकार्ड,पॅनकार्ड आणि आपला गुपित कोड मात्र नक्की आपल्या सोबत असेल तर आपल्याला पैशाचा व्यवहार कोठेही आणि केव्हाही करता येतो. एखाद्या माणसाला आपला गुपित कोड किंवा आधारकार्ड सोबत नसेल तर त्या मनुष्याला कुठेतरी तातडीने पैसे भरावयाचे असल्यास तेथे त्याचा तोटा होतो. आपला गुपित कोड हा सतत बदलत रहावा व तसाच तो लक्षात पण ठेवावा लागतो. कारण आपण व्यवहार करताना हा कोड जर कोणाला माहित झाला किंवा कॅमेऱ्यामध्ये दिसला असेल तर तो आपण लगेच बदलून घ्यावा व लक्षात ठेवावा. त्यामुळे त्रास होणार नाही.

• **देमगुंडे सोनल वैजनाथ**
**(बी.ए.प्रथम वर्ष)**

## रोकड रहित व्यवहार : थांबा आणि पाहा

भारत देशामध्ये रोकड रहित व्यवहार फायदे व तोटे या विषयी जागरुकता केली जाते. सर्व व्यवहार हे देशातील कॅशलेस व्यवहार करण्यावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढाकार घेतला आहे. या व्यवहारामध्ये देशातील सर्व पैसा हा कॅशलेसच्या माध्यमातून बॅंकेमधून देवाण—घेवाण

करण्यासाठी केला जातो. याचे सर्व फायदे देशाच्या अर्थव्यवस्थेला होतील. देशातील सर्व पैसा हा बॅकिंग व्यवहार होतील.

देशातील सर्व तरुण वर्गांना रोजगार देण्यासाठी यांचा फायदा होईल. यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व व्यवहार कॅशलेस करण्यासाठी तरुण वर्गांना कॅशलेस व्यवहार कसा करायचा या विषयी मोबाईलवर नवीन ॲप तयार करण्यात आले आहे.या ॲपचा उपयोग तरुण वर्गाला मोठया प्रमाणावर होईल, याचा फायदा देशाला होईल कारण की, देशात ६५ टक्के तरुण वर्ग आहे. या ॲपचा उपयोग करण्यासाठी नरेंद्र मोदींनी देशातील सर्व तरुण वर्गांना आपल्या संपर्कातील वर्गांना समजवावे, जेणेकरुन ज्यांना या ॲपचा उपयोग करता येत नाही. याचा उपयोग केल्यास देश विकसित करण्यासाठी कॅशलेस व्यवहारावर भर देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. कारण की नरेंद्र मोदी हे विकासावर भर देणारे पंतप्रधान आहेत. यामुळे सर्व काळया पैशावर बंधने येथील. हा सर्व काळा पैसा हा कॅशलेस व्यवहारामध्ये उपयोग केला जाईल तेव्हा देशातील सर्व पैसा बॅकेत जमा होईल. या पैशामुळे देशातील तरुण वर्गांना उच्च शिक्षण भारतामध्ये दिले जाईल. देशातील सर्व व्यापार उद्योजक, इंजिनियर, डॉक्टर सारख्या उच्च पदावर जाण्यासाठी देशातच सर्व तरुणांना शिक्षण दिले जाईल. देशातील अर्थव्यवस्था सुधारेल. भारत देशाची अर्थव्यवस्था ही ७० टक्के पर्यंत सुधारित आहे. काळा पैसा बाहेर आणण्यासाठी मोदिंनी चलनातील १ हजार,५०० रुपयांच्या नोटा बंद केल्या आहेत. सर्व व्यवहार हे कॅशलेस होतील तेव्हा देश प्रगती पथावर जाईल.याचा फायदा तरुण शिकलेल्या, युवकांना जास्त होईल. ज्या लोकांना कॅशलेस व्यवहार करता येत नाही. जे लोक निरक्षर आहेतत्यांना मात्र याचा तोटा होणार, पण त्यांच्या कुटुंबातील तरुण युवक असल्यामुळे त्यांना कॅशलेस व्यवहार करण्यासाठी याचा उपयोग घ्यावा लागेल.

आता कॅशलेस व्यवहारामुळे मोबाईलव्दारे पैसे पाठवता येतील. व्यवहार करण्यासाठी आता फक्त मोबाईल ॲपचा उपयोग करता येईल. दैनंदिन व्यवहार करण्यासाठी कॅशलेस अर्थव्यवस्थेचा उपयोग होईल. या व्यवहारामुळे

भ्रष्टाचाराला आळा बसेल व सर्व लोकांना याचा उपयोग करणे सोपे होईल. आजच्या भारतातला तरुण वर्ग हा उच्च शिक्षित आहे. तरुणांचा भारत देश आहे. यांचा उपयोग केल्यास भ्रष्टाचार थांबेल आणि देशाचा विकास होईल.

शेतकऱ्यांचे उत्पन्न हे व्यापार करण्यासाठी अगोदर माल विकल्यावर नगदी पैसा मिळत होता आता तो पैसा कॅशलेसच्या माध्यमातून मिळत आहे. विकलेल्या मालाचा पैसा हा थेट बॅकेमधून मिळतो. खरेदी करणारा आपल्या मालाचे पैसे कॅशलेसच्या माध्यमातून तुमच्या बॅकेमध्ये टाकतो.कॅशलेस व्यवस्था ही मोदिंनी सुरु केली आहे. याचे फायदे तोटे हे येणाऱ्या भविष्यकाळात समजतील.

**•केंद्रे रामदास भगवान**
**(बी.ए.प्रथम वर्ष)**

## रोकड रहित व्यवहार फायदे व तोटे

आजच्या रोकड व्यवहाराचे फायदे आणि तोटे सुध्दा कमी प्रमाणात मिळतात रोकड रहित व्यवहार पैशाशिवाय व्यवहार होतो. पैसा आहे तर व्यवहार मोठया प्रमाणात केला जातो. आणि रोकड रहित व्यवहार फायदे आणि तोटे यामध्ये वेगवेगळया प्रमाणात व्यापार केला जातो. रोकड रहित व्यवहारात फायदे जास्त प्रमाणात होत असतात. कमीत कमी प्रमाणात तोटे होत असतात. एखाद्या व्यक्तीचे जर दुकान असेल तर त्याला कमी फायदे आणि तोटे जास्त होतात. मात्र रोकड रहित व्यवहारात फायदे जास्त आणि तोटा कमी प्रमाणात असतो.

एखाद्या वेळी वस्तूला कमी भाव मिळतो.याचा रोकड रहित व्यवहार मोठया प्रमाणात करता येतो.व्यापाऱ्यांना रोकड रहित व्यवहार मोठया प्रमाणात करण्याची संधी मिळत असते. त्यातूनच रोकडरहित व्यवहाराचे फायदे आणि तोटे दिसून येतात. उदा. एखाद्या वस्तू मध्ये ४ रुपये मिळाले तर त्याला फायदा असे म्हणतात. तसेच एखाद्या वस्तूमध्ये ४ रुपये मिळाले नसतील तर

त्याला तोटा असे म्हणतात. थोडक्यात काय तर रोकड रहित व्यवहारामध्ये फायद्याचे गणित आणि तोटयाचे गणित करता येत नाहीत.

**• मोरतळे संगीता संजय**
**(बी.ए.प्रथम वर्ष)**

## रोकड रहित व्यवहार

रोकड रहित व्यवहार हा भारतातील महत्त्वाचा घटक आहे. रोकड रहित व्यवहार करणे हे सोपे असते. भारतात पैशाच्या बाबतीत अनेक व्यवहार करता येतात. भारत हा रोकड रहित व्यवहाराशी निगडीत आहे. यामध्ये अनेक व्यवहार करता येतात. व्यवहारामध्ये फायदाही होतो आणि तोटा होतो. व्यवहार करत असताना त्या व्यवहाराबद्दल परिपूर्ण अभ्यास, ज्ञान, माहिती असणे गरजेचे आहेतर व्यवहार करावा. व्यवहार करत असताना विचार करुन व्यवहार करावा. व्यवहारात पैसा देणे घेणे हे सतत चालू असते. व्यवहार हा व्यक्तींशी निगडीत असतो. व्यवहार म्हणजे ही एक मोठी व्यक्तींवर असलेली जबाबदारीच आहे.

रोकड रहित व्यवहार हा करत असताना रोकड रहितच व्यवहार करावा लागतो. यामध्ये चलन, नाणी, पैसा इ. साधनांचा उपयोग केला जातो. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे भारतातील अनेक व्यवहार शेतीशी निगडित चालतात. व्यवहार हा प्रत्येक व्यक्तिंना करता येतो. रोकड रहित भारत हा व्यवहाराशी निगडीत आहे.

व्यवहार करत असताना व्यवहारामध्ये लोकांशी प्रामाणिकपणे वागले तर व्यवहार करत असताना फायदा होतो. खोटे बोलून व्यवहार करत असताना फायदा होत नाही. खोटे बोलून किंवा लुबाडून व्यवहार केला तर माणूस हा कधीच व्यवहारात यशस्वी ठरत नाही.

**• सलगर किरण मोतीराम**
**(बी.ए.प्रथम वर्ष)**

# रोकड रहित व्यवहार : नाव तसं चांगलं...

रोकड रहित व्यवहार हे शब्द आपल्या कानावर पडताच आपली अवस्था कशा प्रकारे होते. याची पाहणी जर आपण चांगल्या पध्दतीने केली तर आपणास सर्व प्रथम काय जाणवेल?हया शब्दांना जरी आपण महत्त्व दिले नाही तरी ते आज आपल्या पुढे येऊन उभा राहिले आहे. रोकड रहित व्यवहार हा आजच्या परिस्थितीला पाहून तसा खूप चांगलाच आहे. कारण ज्याप्रमाणे आपण खूप जास्त पैसे घेऊन कोठेपण जातो मग नंतर त्या ठिकाणी काहीपण अडचणी आपल्या समोर उभ्या राहतात. आपणच त्यांना आमंत्रण देऊन बोलावले आहे की काय असे वाटते. असे भरपूर प्रकार आजपर्यंत आपण बातम्या, वर्तमानपत्रे यातून ऐकतो. कॅशलेसचे फायदे असे की, आपण जर कोठेपण पैसे घेऊन जाऊ शकत नसलो तर पेटीएम घेऊन जाऊ शकतो. आपण आपला व्यवहार एका कार्डामार्फत करु शकतो. आपल्या जवळ पैसे घेऊन जाण्याची अथवा त्यांना गर्दीच्या ठिकाणी जपून ठेवण्याची व्यवस्था नसते. त्यामुळे आपण त्यांना एका कार्डामार्फत पैसे देऊ आणि घेऊ शकतो. पेटीएम, एटीएम अशा सुविधा आपल्या जीवनातील एक नंबर सुविधा आहेत. आपले पैसे काढण्यासाठी अथवा जमा पैसे करण्यासाठी मौल्यवान असा वेळ वाया जाऊ शकत नाही. कार्ड काढा मशीनमध्ये घाला आणि पैसेच पैसे मग आपण आपला मौल्यवान वेळ असा कामा धंद्यामध्ये घालवू शकतो.

रोकड रहित व्यवहार हा खूप चांगला निर्णय आहे आपल्या भारत सरकारचा. त्याचबरोबर आपण हे सुध्दा विसरला नाही पाहिजे की, रोख पैशामुळे खूप ठिकाणी लोकांच्या गर्दीत अनेक बहिणी, वृध्दांचे जीव गेलेले आहेत. याबरोबरच त्याचे तोटे म्हणजे सरकारने त्यांचा निर्णय सांगून ते मोकळे झाले पण प्रत्यक्षात पाहता त्यावेळेस अनेकांना आपला जीव गमवावा लागला. त्याचबरोबर अनेक ठिकाणी भांडणे होऊ लागले. कशासाठी?तर रांगेमध्ये उभे राहण्यासाठी आणि तुझा अगोदर की माझा अगोदर नंबर! यासाठी. रोकड रहित

भारत करायचाच होता तर दोन दिवसापूर्वी सर्वांना जाहीर करायला पाहिजे होते.

•कदम सुलोचना ज्ञानोबा
(बी.ए.प्रथम वर्ष)

## रोकडविरहीत व्यवहार स्वरुप व अडचणी

कोणत्याही प्रकारच्या अर्थव्यवस्थेत घडणारी अर्थकारणे बदलणारे आर्थिक प्रवाह हे ज्या घटकांशी केंद्रीत असतात तो म्हणजे पैसा. विनिमय व्यवहाराचा आत्मा, ज्यात विश्वसनियता,विलंबीत देणी—घेणी स्विकारण्याची स्विकार्यता, व शासन मान्यता असते तो पैसा होय.पैशाचे विविध प्रकार आहेत. पण आज प्रामुख्याने चर्चिल्या जातात ते प्रकार म्हणजे रोख पैसा व रोखताविरहीत पैसा. या प्रकारावरुनच विनिमय व्यवहाराचे दोन प्रकार समोर येतात ते म्हणजे रोकड व्यवहार व रोख विरहित व्यवहार ज्यास कॅशलेस व्यवहार यानावाने ओळखल्या जाते.

नोव्हेबंर ०८, २०१६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जुन्या ५०० व १००० रुपयांच्या नोटा या चलनातून रद्द करण्यात येण्याची घोषणा केली, ज्यास विमुद्रीकरण धोरण म्हणून म्हटल्या जात आहे. त्याच सोबत भ्रष्टाचार, काळापैसा, अपारदर्शी व्यवहार कमी करण्यासाठी त्यावर मात करण्यासाठी रोकडरहित व्यवहारांना प्राधान्य देण्याचे निश्चित केले. देशातील नागरिकांनी नोटांचा व रोख पैशाचा वापर शक्य तितका कमी करुन डेबीट कार्ड, क्रेडिट कार्ड, मोबाईल वॉलेट व नेटबॅकींग सारख्या साधनाचा वापर करुन रोकडरहित आर्थिक व्यवहारांना स्विकारावे असे आवाहन सरकारने केले.

भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल या आवाहनामुळे रोखयुक्त अर्थव्यवस्थेकडून रोख विरहीत वा रोखमुक्त अर्थव्यवस्थेकडे वाटचाल सुरु झाली. या मुळे रोकड विरहित अर्थव्यवस्था म्हणजे काय? रोकड विरहित

व्यवहाराची साधने कोणती? रोकड विरहित व्यवहारातील अडचणी व रोकड विरहित व्यवहाराचे लाभ या अनुषंगाने प्रस्तूत लेखात मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**रोकडविरहित अर्थव्यवस्था अर्थ:**

ज्या व्यवहारांसाठी रोख स्वरुपातील रक्कम म्हणजे चलनी कागदी नोटा अथवा धातू पैसा न वापरता क्रेडीट कार्ड, डिबीट कार्ड, मोबाइल बॅकींग, इंटरनेट बॅकीग इ.सारख्या डिजिटल साधनांचा वापर केला जातो त्यास रोकडविरहित व्यवहार म्हणतात व या प्रकारचे व्यवहार ज्या अर्थव्यवस्थेत होत असतात त्यास रोकड रहित अर्थव्यवस्था म्हणतात.

रोकडविरहित व्यवहारांची आवश्यकता

रोकडविरहित व्यवहार अधिकाधिक प्रमाणात करण्यात यावेत असे आवाहन सरकारने वारंवार केले व अर्थव्यवस्थेतील नियमित व्यवहारांना रोख विरहीत व्यवहारावर भर देण्यासाठी प्रोत्साहीत केल्या जात आहे. रोख विरहीत व्यवहाराची आवश्यकता खालील मुद्यांच्या आधारे लक्षात येते.

**१) भ्रष्टाचार मुक्त व्यवहार:**

रोख रक्कमेच्या साहयाने केलेले व्यवहार हे दृश्य स्वरुपाचे अथवा नोंद स्वरुपाचे असतात असे नाही अनेक वेद्य. अवैध कारणासाठी रोख स्वरुपात व्यवहार केले जातात ज्यातून भ्रष्टाचार वाढीला वाव मिळतो व वाढत्या भ्रष्टाचारामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होतात. त्यावर मात करण्यासाठी रोख विरहीत व्यवहार महत्त्वाचा मार्ग ठरतो.

**२) समांतर अर्थव्यवस्था नियंत्रणासाठी:**

रोख व्यवहारातून भ्रष्टाचारास वाव मिळतो त्यातून अवैद्य संपती व काळा पैसा आधारित आर्थिक व्यवहारांना वाव मिळतो याचेच पुढचे स्वरुप म्हणजे समांतर अर्थव्यवस्था जी वैध अर्थव्यवस्थेला हानीकारक ठरते त्यामुळे चलनवाढ, गुन्हेगारी इ. प्रवृत्ती वाढतात व अर्थव्यवस्थेच्या विकासावर प्रतिकुल परिणाम होतो.



**महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर**

NAAC - छायांकित

आसूड २०१६-१७



'भूगोल' विभागाच्या प्रात्यक्षिक विभागात

खेळाडू सोबत क्रीडा विभागात





सांस्कृतिक विभाग

'नॅक पीयर टीम' सांस्कृतिक संभागृहातील कार्यक्रमात



**३) कर उत्पन्न वाढने:**

रोख व्यवहारातून कर टाळले जातात. तसेच खरे उत्पन्न समोर येत नाही. त्यामुळे कराच्याव्दारे संकलित उत्पन्न समोर येत नाही व कराच्याव्दारे संकलीत उत्पन्न कमी येते. कमी कर संकलीत उत्पन्नामुळे लोकहीतकारी कामे करण्यासाठी उत्पन्न अपुरे ठरते. अशा स्थितीत रोख विरहीत व्यवहार असल्यास उत्पन्न व खर्चाचे स्त्रोत शासनास, वित्तीय यंत्रणेस माहिती होतात. करचुकवल्या जात नाहीत. कर उत्पन्न वाढण्यास वाव निर्माण होतो. म्हणून रोख विरहीत व्यवहार महत्वाचे ठरतात.

**४) पारदर्शी व्यवहार :**

रोखीने केलेले व्यवहार पारदर्शी नसतात. परिणामी अर्थव्यवस्थेतील विनिमय व्यवहाराची सत्यता समोर येत नाही. देणगी, भेट, इत्यादीतून वेगवेगळया देश विधायक कार्यासाठी तो  पैसा अथवा संपत्ती म्हणून वापरल्या जाते. हा धोका टाळण्यासाठी तो व्यवहार रोख विरहीत नोंद आवश्यक आहे म्हणून पारदर्शी व्यवहारांना चालना देण्यासाठी रोखविरहीत व्यवहार आवश्यक आहेत.

**५) शाश्वत विकासासाठी:**

रोख व्यवहारासाठी मोठया प्रमाणात कागदी चलन व धातू चलनाची आवश्यकता असते. त्यासाठी वनस्पती, झाडे तोडून कागदी चलन तर धातू उत्खनन करुन धातू चलन बनवले जाते. त्यातून वृक्षतोड व मौल्यवान धातू सतत संपुष्टात आल्यामुळे पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहे. भावीपिढयांना ही संपदा राहील की नाही? या विषयी संभ्रम होतो. म्हणून या कारणासाठी होणारे पर्यावरणीय होणारे नुकसान टाळण्यासाठी व्यवहारात रोख पैसा म्हणजेच कागदीचलन व धातू पैसा यांचा वापर टाळून डीजिटल व्यवहार महत्वाचे ठरतात. म्हणून शाश्वत विकासासाठी रोखविरहीत व्यवहार महत्त्वाचे आहेत.

**६) पैशाची चोरी व अन्य धोका टाळण्यासाठी:**

रोख व्यवहारासाठी मोठया प्रमाणात रोख रक्कम जवळ बाळगावी लागते. पण ही रक्कम दृश्य असल्याने ती चोरी होण्याची अथवा फाटण्याचा, जळण्याचा धोका सातत्याने राहतो. तो धोका टाळण्यासाठी रोख विरहीत व्यवहार महत्त्वाचे ठरतात.

**७) रोगराई पसरण्याचा धोका टळतो:**

रोख व्यवहारात जो धातू पैसा व कागदी पैसा व्यवहारात वापरण्यात येतो. त्यातून हानिकारक विनाशकारी व रोगराई पसरण्याचा धोका राहतो. तो धोका टाळण्यासाठी रोखविरहीत व्यवहार महत्त्वपूर्ण ठरतात.

**८) आर्थिक सर्वसमावेशीकरण:**

रोख व्यवहार करण्यासाठी बॅकिंग प्रक्रियेची अनिवार्यता नसते. त्यामुळे बॅकिंग सुविधा तसेच शासकीय योजने पासून सवलती पासून वंचिताचे प्रमाण अधिक राहते. भारतातील निम्मी लोकसंख्या आर्थिक प्रवाहात नोंदणीकृत नाही त्यांचे बॅकिंग प्रक्रियेशी कसलेही व्यवहार नाहीत त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वसमावेशक आर्थिक विकास साध्य करण्यासाठी रोख व्यवहारा ऐवजी रोख विरहीत व्यवहारास प्राध्यान्य देणे आवश्यक आहे. त्याच उद्देशाने सरकारने जनधन योजनेव्दारे अधिकाधिक लोकसंख्या बॅकिंग प्रक्रियेशी जोडण्याचा प्रयत्न केलेला आहे. थोडक्यात,सर्वसमावेशी आर्थिक विकासासाठी रोख व्यवहाराऐवजी रोख विरहीत व्यवहार महत्त्वाचे ठरतात.

**९) धातू पैसा व कागदी चलन निर्मिती खर्च:**

रोख व्यवहार मोठया प्रमाणात होत असल्याने भारतात धातू पैसा व कागदी चलनाची निर्मिती मोठया प्रमाणात करावी लागते. त्यासाठी येणाऱ्या खर्चात सातत्याने वाढ होत आहे. चलन निर्मिती सोबत सुरक्षीत वाहतुकीसाठी व त्याची चोरी होऊनये यासाठी मोठया प्रमाणावर खर्च होते हा खर्च टाळण्यासाठी रोख स्वरुपात होणारे व्यवहार कमी करुन रोख विरहीत व्यवहारांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. म्हणून रोख विरहीत व्यवहाराची आवश्यकता आहे.

**१०) नकली चलनाचा धोका:**

रोख व्यवहारात दहशतवादी, राष्ट्र विरोधी शक्तीकडून नकली नोटा, चलन व्यवहारात आनले जाते. त्यामुळे समस्या निर्माण होतात. नकली चलनाचा धोका रोखविरहीत व्यवहारात नसतो. म्हणून रोख व्यवहाराऐवजी रोकडविरहीत व्यवहारास चालना देणे आवश्यक ठरते.

उपरोक्त कारणाशिवाय अन्य कारणे रोख व्यवहाराऐवजी रोखविरहीत व्यवहाराची गरज, आवश्यकता प्रतिपादीत करतात.

**रोखविरहीत व्यवहाराची साधने:**

रोख विरहीत व्यवहार करण्यासाठी चेक, वचनचिठ्या, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड या सारख्या स्मार्ट कार्डचा उपयोग, नेट खाते, नेट वॉलिटस, मोबाईल बॅकीग, पेटीएम सारख्या मोबाईल वॉलेटस सेवा इ. साधने वापरली जातात. ज्यातून विनिमय व्यवहार करण्यासाठी प्रत्यक्ष रोख रक्कम वापरण्याची गरज नसते, थोडक्यात उपरोक्त साधनाचा वापर करुन रोख विरहीत व्यवहारांना चालना देण्यात येत आहे.

**रोख विरहीत व्यवहारातील अडचणी:**

रोख विरहीत व्यवहारांना गती देण्यासाठी प्रयत्न सरकारकडून होत आहे. परंतु प्रत्यक्षात रोख विरहीत व्यवहारांना अपेक्षित प्रतिसाद मात्र अत्यल्प आहे. याच्या कारणांचा मागोवा घेताना त्यातील प्रमुख अडचणी पुढील प्रमाणे लक्षात येतात.

**१) बॅकिंग सेवेपासून वंचित लोकसंख्या:**

रोखविरहीत व्यवहारासाठी बॅकिंग खाते आवश्यक आहे. तरच रोखविरहीत साधने वापरता येतील. परंतु वास्तवात भारतातील मोठया प्रमाणात लोकसंख्या बॅकिग प्रवाहात नाही. २०१५ च्या अहवालानुसार भारतातील २३३ दशलक्ष लोकसंख्या अजूनही बॅकिंग सेवापासून वंचित आहे. रोख विरहीत व्यवहारासाठी आवश्यक साधने मिळणे त्यांना शक्य होत नाही. अशा स्थितीत रोख विरहीत व्यवहाराचा विस्तार व्यापक न होता संकुचितच राहतो.

**२) पॉईट ऑफसेल (POS) ची कमी संख्या:**

रोख विरहीत व्यवहारासाठी विक्रीकेंद्राची म्हणजे पॉईंट ऑफ सेल (पीओएस) ची संख्या पर्याप्त असणे आवश्यक आहे.परंतु सध्या भारतात केवळ १४ लाख पॉईट ऑफ सेल (POS) असून एवढया मधून मोठया प्रमाणात रोख विरहीत व्यवहार करण्यावर मर्यादा येते म्हणून रोख विरहीत व्यवहारात पॉइंट ऑफ सेल ची कमी संख्या ही महत्त्वाची अडचण आहे.

**३) असंघटीत क्षेत्राचे प्राबल्य:**

भारतात मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती ही असंघटीत क्षेत्रात आहे. म्हणजेच मजुरांची व रोजगार कर्त्यांची ९० टक्के संख्या असंघटित क्षेत्रात आहे. जिथे दैनंदिन मजुरी रोख स्वरुपात दिली जाते तसेच होणारा दैनंदिन व्यवहार हा छोटा असल्याने रोख स्वरुपातच होतो. संबंधीत व्यवसायात रोख विरहीत साधने वापरणेपरवडत नाही. थोडक्यात असंघटीत क्षेत्राचे प्राबल्य रोख विरहीत व्यवहाराची अडचण आहे.

**४) करचुकविण्याची वृत्ती:**

आपणावर कमीत कमी कर रहावा किंवा करचक्रात आपण येऊच नये यासाठी सर्वच क्षेत्रातील व्यावसायिक प्रयत्न करतात रोख विरहीत व्यवहार केल्यास कर टाळता येणार नाहीत. म्हणून कर चुकविण्याची कृती रोख विरहीत व्यवहारांना मर्यादीत करते.

**५) इंटरनेट सुविधांची स्थिती:**

रोख विरहीत व्यवहाराची साधने ही इंटरनेट संबंधी आहेत. म्हणजेच रोख विरहीत व्यवहार करावयाचा असेल तर इंटरनेट सुविधा अद्यावत व सर्वदूर असणे अपरिहार्य आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र भारताच्या सर्वच भागात इंटरनेट सुविधा पोहचविली नाही. जिथे ती आहे तिथे इंटरनेट सेवेचा दर्जा सुमार आहे. त्यामुळे रोख विरहीत व्यवहारांना मर्यादा येते.

**६) डिजिटल व्यवहारावर शुल्क:**

रोख विरहीत व्यवहार करताना जी साधने वापरली जातात त्या साधनाव्दारे करण्यात येणाऱ्या व्यवहारावर, बॅंका शुल्क आकरतात. अशा स्थितीत ग्राहक व्यवहार करताना शुल्क देण्याऐवजी रोख रक्कमेव्दारे होणाऱ्या

व्यवहारांना प्राधान्य देतो. म्हणून रोख विरहीत व्यवहारावरील शुल्क रोख विरहीत व्यवहाराची समस्या आहे.

**७) अशिक्षित लोकसंख्या:**

देशामध्ये अशिक्षित लोकसंख्येचे प्रमाण २४ टक्के आहे. तर आर्थिक व्यवहाराचे म्हणजे आर्थिक साक्षर नसलेली लोकसंख्या त्यापेक्षा जास्त आहे. अशा नागरिकांकडून डिजिटल साधनाच्या वापराची अपेक्षा योग्य नाही. उलट त्यांना मदत करणारे त्यांना फसवण्याची शक्यता आहे. जोपर्यंत लोकसंख्या शिक्षीत व आर्थिकदृष्टया साक्षर होत नाही तोपर्यंत रोख विरहीत व्यवहार प्रत्यक्षात येणार नाहीत.

**८) सायबर गुन्हेगारीचा धोका:**

रोख व्यवहारातील अनिश्चितता व धोके टाळण्यासाठी रोख विरहित व्यवहार महत्त्वाचे ठरतात परंतु प्रत्यक्षात रोख विरहित व्यवहार करताना मोठया धोक्यांना सामोरे जावे लागते. रोख विरहित व्यवहार हे अभासी स्वरुपाचे असतात. ते सर्व तांत्रिक बाबीवर अवलंबून असतात अशा स्थितीत डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, इंटरनेट बॅकींग, मोबाइल बॅकींग अन्य साधनाचा उपयोग रोख विरहित व्यवहारात करताना पिन क्रमांक किंवा पासवर्ड चोरीस जाणे शक्य आहे. त्यामुळे काही क्षणात होत्याचे नव्हते होऊ शकते. मोठया प्रमाणावर असे सायबर गुन्हे घडत आहेत. त्यावर नियंत्रण आणणारी यंत्रणा जोपर्यंत सर्वव्यापी व सक्षम होत नाही तोपर्यंत रोख विरहीत व्यवहार अडचणीचेच ठरतात.

थोडक्यात उपरोक्त अडचणी रोखविरहित व्यवहारात आहेत त्यावर मात करण्याचा प्रयत्न सरकार स्वत: व लोक प्रबोधनाच्या साधनाचा वापर करुन करत आहे.

**रोख विरहित व्यवहाराचे लाभ:**

सरकारने रोकड मुक्त भारतासाठी रोख विरहित व्यवहाराचे आवाहन केले आहे. या रोख विरहित व्यवहाराचे खालील लाभ लक्षात घेऊनच त्यासाठी सरकार प्रोत्साहन देत आहे.

**१) कर चुकवेगिरीवर मर्यादा:**

रोख विरहित व्यवहार हे संस्थात्मक पातळीवर होतात. ते डिजिटल साधनाचा उपयोग करुन होत असल्याने त्यांची आर्थिक यंत्रणेकडे नोंद होते. परिणामी ते व्यवहार कर उत्पन्नात येत असेल तर त्यावरील कर चुकविले जाऊ शकत नाहीत. कर चुकवेगिरीवर मर्यादा येऊन कर उत्पन्नाचा परीघ विस्तारता येतो. म्हणून रोख विरहित व्यवहाराचा कर कर चुकवेगिरीवर मर्यादा व कर उत्पादनात वाढ हा लाभ सरकारला मिळतो.

**२) व्यवहारात पारदर्शकता येते:**

रोख विरहित व्यहार हे नोंदणीकृत राहतात त्यामुळे कोणी, कोणाशी, कशासाठी व्यवहार केला हे समजते. परिणामी राष्ट्र विधायक, गैर आर्थिक व्यवहार होत नाहीत व पारदर्शी व्यवहार नसल्याचे धोके टाळून पारदर्शी व्यवहाराचा लाभ मिळवता येतो.

**३) नकली चलनाचा धोका टळतो:**

रोख विरहित व्यवहारात प्रत्यक्ष रोख पैसा नसल्याने नकली नोटामुळे निर्माण होणारे धोके टाळले जातात. अर्थव्यवस्था यामुळे सक्षम बनते.

**४) रोख रक्कम व्यवस्थापन खर्च बचत:**

रोख विरहित व्यवहारामुळे रोख रक्कम निर्मितीवरील खर्च, वाहतूकीवरील खर्च तसेच सुरक्षेवरील खर्चाची बचत होते व तो खर्च अन्य लोकहितकारी साधनासाठी वापरता येतो.

**५) शासकीय योजनांची योग्य अंमलबजावणी:**

रोख विरहित व्यवहारामुळे शासनाच्या विविध योजनावर होणारा खर्च लाभधारकाच्या खात्यावरच वर्ग होतो त्यामुळे त्याची योग्य अंमलबजावणी शक्य होते.

**६) आर्थिक समावेशनासाठी उपयुक्त:**

रोख विरहित व्यवहारासाठी बॅंकिंग प्रणालीशी लोकसंख्येतील प्रत्येकाचा संपर्क व खाते आवश्यक आहे. त्यामुळे आर्थिक समावेशनाचा मुख्य टप्पा यशस्वीपणे होतो. बॅकीग व्यवस्थेशी वंचित असणारी लोकसंख्या जोडली जाते.

त्यांत आर्थिक साक्षरता निर्माण होऊन त्याच्या उपयुक्ततेचे लाभ मिळतात म्हणून रोख विरहित व्यवहार आर्थिक समावेशनासाठी उपयुक्त आहेत.

**७) विकास वेग वाढतो:**

रोख विरहित व्यवहारामुळे अनावश्यक खर्च व वेळ वाचतो. तो खर्च विकास कामात वापरता येतो. तसेच लोकउपयोगी योजनांची परिणामकारकता लक्षात येते. विकास कामात होणारा भ्रष्टाचार डिजिटल व्यवहारामुळे टाळला जातो. त्यामुळे विकासदरात राहणाऱ्या गळत्या रोख विरहित व्यवहारामुळे टाळल्या जातात. मुडीज सारख्या वित्त संस्थानांच्या मते विकास दरात १ टक्के वाढ रोख विरहित व्यवहारामुळे शक्य आहे. थोडक्यात विकासातील अडथळे टाळून अर्थव्यवस्थेचा विकास दर वाढण्यासाठी रोख विरहित व्यवहार लाभधारक आहेत.

वरील लाभाशिवाय अन्य महत्त्वपूर्ण लाभ सरकार सोबत जनसामान्यांना रोख विरहित व्यवहारामुळे मिळतात. प्रामुख्याने पर्यावरण विकास, समांतर अर्थव्यवस्थेचा धोका कमी करणे या सारखे लाभ मोठया प्रमाणात रोख विरहित व्यवहारामुळे शक्य होतात. भारतात रोख विरहित व्यवहारांना प्रोत्साहित करण्यासाठी केंद्रसरकारने चंद्रबाबु नायडु, मुख्यमंत्री आंध्रप्रदेश यांच्या समन्वयकाच्या नेतृत्वाने मुख्यमंत्र्यांची समिती स्थापन केली आहे. यात नंदननिळकेणी हे मार्गदर्शक आहेत.

थोडक्यात रोखयुक्त व्यवहारापेक्षा रोकडमुक्त किंवा रोख विरहित व्यवहारांची उपयुक्तता लक्षात घेता रोख विरहित व्यवहार निर्धोक होण्यासाठी प्रयत्न वाढवणे आवश्यक आहेत. त्यासाठी सायबर गुन्हे रोखणारी सक्षम यत्रंणा जिल्हा व तालुका स्तरापर्यंत निर्माण करणे, बॅकिंग प्रणाली अधिक अद्यावत करणे रोख विरहित व्यवहाराची साधने संघटीत असंघटीत व्यवसायात वापरण्यासाठी प्रोत्साहन देणे. या मार्गाचा अवलंब करुन रोख व्यवहारातील अडचणी दूर झाल्यास रोकड विरहित भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकार होईल.

•**डॉ.डी.डी.चौधरी**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

# रोकड विरहित व्यवहार

Cashless Transaction ही एक e-payment service आहे. ज्याचा वापर online payment करण्यासाठी केला जातो. ही एक अशी सेवा आहे की याव्दारे आपण Bank मध्ये न जाता आपल्या Account चे व्यवहार करु शकतो.

उदा.Electric, EMI, Life Insurance, Loan, House, Water, Shopping etc.घरी व कोठेही बसल्या बसल्या Payment करु शकतो.

आपल्या देशात खूप कमी प्रमाणात Cashless Transaction चा वापर केला जातो. पण जगात असेही देश आहेत तेथे ७० टक्के Cashless Transaction चा वापर केला जातो. (उदा.स्वीडन)

Cashless Transaction मुळे आपण सर्व कामे घरी बसल्या करु शकतो. यासाठी आपणास बॅंकेत जाऊन रांगेमध्ये उभे राहण्याची गरज नाही. तर आपण घरीच एक Bank व्दारे व्यवहार करु शकतो.कोणत्याही रोख रक्कमेशिवाय सर्व आर्थिक देवाण—घेवाण करणे. कार्ड, चेक,डीडी, नेट बॅंकिंग, इ—वॉलेट, फोन बॅंकिंग इ. गोष्टीने पैशाची देवाण—घेवाण करणे हा होय.

**Cashless साठी आवश्यक गोष्टी.**

१) बॅंकेत अकाऊंट असावे लागते.

२) स्मार्टफोन असावा.

३) स्मार्टफोन इंटरनेटशी कनेक्ट असावा.

**Cashless Transactionची साधने :**

**१) चेक ने पेमेंट:**

चलनी नोटाशिवाय आर्थिक व्यवहारात चेक ने आर्थिक व्यवहार करणे ही सर्वात जुनी पध्दत असून ती सर्वांना परिचयाची आहे.

चेक ने — नियोजित रक्कम देऊ शकतात.

— खात्यावर जमा करण्यात येते.

— रोख रक्कमही काढणे.

यामुळे सर्व व्यवहारांच्या नोंदी पुरावा म्हणून ठेवता येतात.

**२) डिमांड ड्राफ्ट:**

ही पध्दत एक प्राथमिक पध्दत आहे. जी पेमेंट स्वीकारण्यासाठी सर्वात सुरक्षित आर्थिक व्यवहार पध्दती मानली जाते. चेक प्रमाणे डिमांड ड्राफ्टमध्ये सही नमुना न जुळण्याची समस्या उद्‌भवत नाही.

असे असले तरी या पध्दतीत प्रत्यक्ष बॅकेत जाऊन सर्व आर्थिक व्यवहार करावे लागतात. जास्तीचा वेळ वाचतो.

**३) ऑनलाईन हस्तांतरण RTGS/NEFT:**

कॅशलेस व्यवहारासाठी ही सर्वात सोपी पध्दत आहे. या पध्दतीत ऑनलाईन रुपये हस्तांतरित करण्यासाठी तुमच्याकडे इंटरनेट बॅकिंग सुविधा असणे गरजेचे असते त्यामुळे या पध्दतीत तुम्ही तुमचे आर्थिक व्यवहार कोणत्याही ठिकाणावरुन इंटरनेटचा वापर करुन अगदी घरी बसूनही करु शकतो या पध्दतीत व्यवहार हे चेक व डिमांड ड्राफ्टपेक्षा खूप कमी वेळात होतात.

**४) क्रेडीट कार्ड आणि डेबीट कार्ड:**

कॅशलेस व्यवहारासाठी ही आणखी एक पध्दत आहे. जिचा भारतात मर्यादित स्वरुपात वापर असून तो वाढला आहे. यात क्रेडीट व डेबीट कार्डचा वापर करुन ATMमधून पैसे काढणे तसेच ATM ते ATM पैसे हस्तांतरित करणे. ATM च्या सुविधा कमी असल्यामुळे या पध्दतीचा वापर मर्यादित आहे. परंतु नोटबंदीमुळे याचा वापर वाढत आहे.

**५) ई—वॉलेट:**

ई—वॉलेट व्दारे किरकोळ वस्तू खरेदी पासून ते किमान तिकिटे बुकिंग करण्यासाठी तसेच ऑनलाईन वस्तू खरेदीसाठी केला जातो. या पध्दतीचा

वापर करण्यासाठी ग्राहक व व्यापारी दोघांकडेही इंटरनेट चालू असलेले स्मार्टफोन असावे लागतात. ई—वॉलेट/ऑनलाईन नोंद केली असता त्यात तुमचे डेबीट कार्ड लिंक करावे लागते.Paypalहे यातील प्रसिध्द ई—वॉलेट आहे. त्याचप्रमाणे Payonner, Transferwise, Skill, Payzaही त्याचीच उदाहरणे आहेत.

**६) मोबाईल वॉलेट:**

या पध्दतीत तुम्हाला डेबीट कॉर्ड, क्रेडीट कार्ड अथवा इंटरनेट बॅक पासवर्डची आवश्यकता नसते. फक्त मोबाईल वॉलेटमध्ये IMPSव्दारे पैसे भरायचे आणि ते खर्चासाठी वापरायचे. तुम्ही तुमच्या स्मार्टफोनमधील लो—स्टोअरमधून मोबाईल वॉलेट डाऊनलोड करु शकतो. जसे. —PAYTM, PAYMONEY, OXIGEN, ZIME, MOBIKWIK, etc.

**७) UPIप्रणाली:**

UPIही मोबाईल पेमेंट प्रणाली आहे. जी तुम्हाला तुमच्या स्मार्टफोनवर विविध आर्थिक व्यवहार करण्याची सुविधा देते.UPI तुम्हाला पेमेंट बॅकेच्या वापरुन माहितीमध्ये प्रवेश न करता पैसे देवाण—घेवाणाची सुविधा उपलब्ध करुन देते.

जसे व्यापारी बॅकेत नोदंणी करुन स्वाईप मशीन वापरतात. ज्याप्रमाणे व्यापारी बॅकांशी नाव नोदंणीकृत त्याच्याशी UPI किंवाआर्थिक व्यवहारासाठी वापरता येते. यासाठी व्यापाऱ्याचे बॅकेत चालू खाते असणे बंधनकारक आहे. काही UPI apps खालील प्रमाणे. जसे —SBIPAY, ICICI Pocket, Axis Pay, Upi Apps, Union Bank, Upi App, PNB Upi, PhonePay, Tranzapp etc.

**८) गिफ्ट कार्ड:**

गिफ्ट कार्ड या पध्दतीत एखाद्या बॅकेकडून किंवा खात्याकडून ठराविक मर्यादित रक्कमेचे तयार केलेले कार्ड तुम्हाला मिळतात याचा वापर तुम्हाला एखाद्या विशिष्ट व्यापाऱ्याकडून वस्तू खरेदी करण्यासाठी वापरतात.

**९) आधार आधारित पेमेंट प्रणाली:**

ही पध्दत सर्वोत्तम मानली जाते. या प्रणालीचे कार्य एखाद्या मायक्रो ATMसारखे असते. जी स्मार्टफोन व फिंगर प्रिन्ट स्कॅनर चा वापर करुन चालते. या पध्दतीला वापरायची तुम्हाला तुमचा आधार क्रमांक तुमच्या बॅक

खात्याशी जोडणे बंधनकारक असते. या पध्दतीने तुम्ही तुमचे पेमेंट तुमच्या आधार क्रमांकाकडून इतरांच्या आधार क्रमांकावर पाठवू शकतो किंवा स्वीकारु शकतो. त्याचप्रमाणे बॅकेतून पैसेही काढू शकतो.

**१०) USSDनंबर व्दारे, मोबाईलव्दारे पेमेंट प्रणाली:**

जर तुमच्याकडे स्मार्टफोन व इंटरनेटची सुविधा नसेल तर तुम्ही ही पध्दत वापरु शकता ही एक मोबाईल बॅकिंग सुविधा आहे. तुम्ही तुमच्या कोणत्याही मोबाईल फोनवरुन ९९ असा USSDक्रमांक दाखल करुन ही सुविधा वापरु शकतो. यासाठी तुम्हाला तुमच्या मोबाईल क्रमांकाची नोंद मोबाईल बॅकिंगसाठी करुन पहाणे, इतरांच्या खात्यावर पैसे हस्तातंरित करणे हे व्यवहार करता येतात.

ही सुविधा सर्व बॅकांत उपलब्ध असून खालील SBI, ICICI, BOB,Axis Bank and PNBया बॅकांत ही सुविधा चालू आहे.


- प्रा.एस.एम.पाटील
  अर्थशास्त्र विभाग



# महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

NAAC - छायांकित

आरूड २०१६-१७



सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतांना महाविद्यालयीन विद्यार्थिनी




महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांसोबत महाविद्यालयाच्या लॉनवर 'नॅक पीयर टीम'



'एक्झीट मिटींग' मार्गदर्शन करतांना नॅक पीयर टीमचे अध्यक्ष



प्राचार्य डॉ.वसंत बिरादार यांना गोपनीय अहवाल देताना 'नॅक पीयर टीम'

# विभागनिहाय अहवाल

# मराठी विभाग

*'जो तुमची सेवा करतो,त्याच्या ऋणातून तुम्ही केवळ पैसे मोजून मुक्त होऊ शकत नाही.*
*सेवेचे ऋण जगात फक्त दोनच मार्गांनी फेडता येते,एक प्रेमाणे व दुसरे सेवेने.'*



**डॉ.वसंत बिरादार**
प्राचार्य व विभागप्रमुख



**प्रा.डॉ. अनिल मुंढे**
सहाय्यक प्राध्यापक



**प्रा.डॉ.नरसिंग कदम**
सहाय्यक प्राध्यापक

# मराठी विभाग : वार्षिक अहवाल

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर व्दारा संचलित महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर हे मागील १७ वर्षापासून शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात ‘फुले पॅटर्न’ निर्माण करुन आपला नावलौकिक करत आहे. महाविद्यालयातील मराठी विभाग भाषा व वाड्.मयांच्या क्षेत्रात उपक्रमशील ठरला आहे. मराठी विभागाच्या वतीने २०१६–१७ शैक्षणिक वर्षामध्ये विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वागीण विकास करण्यासाठी प्रयत्न केले.

शैक्षणिक वर्ष २०१६–१७ वर्षाच्या प्रारंभी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करुन महाविद्यालयात नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा घेण्यात आला. वर्षाच्यासुरवातीला मराठी विभाग प्रमुख प्राचार्य डॉ.वसंत बिरादार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. वार्षिक नियोजन, वेळापत्रक विभागणी व अभ्यासक्रम विभागणी करण्यात आली. त्यानंतर पुढे महाविद्यालयीन वेळापत्रकानुसार अभ्यासक्रम शिकवण्यास सुरुवात झाली. मराठी विभागाने बी.ए.प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षातील मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांची बैठक घेतली. त्यामध्ये वाड्मय मंडळ व संपादक मंडळाची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. वाड्.मय मंडळाचे अध्यक्ष म्हणून बी.ए.तृतीय वर्षातील गोरे परमेश्वर तर संपादक मंडळाच्या संपादकपदी बी.ए.तृतीय वर्षातील कु.माने रोहिणी यांची निवड झाली.

मराठी वाड्.मय मंडळ व संपादक मंडळाने नियोजन करुन मंडळाच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले. मा.प्राचार्य तथा समीक्षक विचारवंत डॉ.वसंत बिरादार पाटील हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडयातील सुप्रसिध्द कथाकार मा. दिगंबरराव कदम यांची यांची उपस्थिती लाभली. यावेळी ‘आविष्कार’ भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

मराठी वाड्मय मंडळाने व संपादक मंडळ वर्षभर विविध कार्यक्रम घेण्याचे नियोजन केले. विद्यार्थ्यांकडून स्वलिखित साहित्य घेऊन वर्षभर प्रत्येक महिन्यामध्ये भित्तीपत्रक स्वत:च्या हस्ताक्षरामध्ये लिहून त्याचे प्राचार्य व प्रमुख

पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मराठी विभागातील प्राध्यापकांनी वर्गामध्ये विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र, गटचर्चा, समूहचर्चा, प्रश्नमंजूषा आदी कार्यक्रम घेतले. तसेच १ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाचे' आयोजन केले. त्यादरम्यान कविसंमेलन, निबंधस्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, ग्रंथप्रदर्शन आदी कार्यक्रम घेण्यात आले.

२७ फेब्रुवारी हा कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. त्यानिमित्त कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील कवीनी त्यात सहभाग नोंदवला. त्यांना प्रेरणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांनी दिली.डॉ.वसंत बिरादार हे थोर समीक्षक आहेत तसेच त्यांचे अनेक ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. अनेक ग्रंथ विद्यापीठाच्या अभ्यासक्रमास लागलेले आहेत. महाविद्यालयात अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष मा.श्रीपाल सबनीस यांनी भेट दिली त्यावेळी त्यांनी मराठी विभागात धावती भेट देऊन विभागाचे कौतुक केले.

# ॥ मराठी वाङ्मय मंडळ ॥


महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर
मराठी विभाग - छायांकित
आसूड
२०१६-१७
'आविष्कार'
भित्तीपत्रकाचा प्रकाशन सोहळा
Programme held under I.Q.A.C
'मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा'
कार्यक्रम
मराठी वाङ्मय मंडळ
विविध वाङ्मय मंडळ आयोजित
कार्यक्रम

# हिंदी विभाग

*'नए दौर के इस जमाने में आओं, सहयोग दें डिजिटल इंडिया बनाने में।'*

—भारतेंदु हरिश्चंद्र



**प्रा.नागराज मुळे**
विभागप्रमुख



**प्रा.डॉ.पांडुरंग चिलगर**
सहाय्यक प्राध्यापक

# हिंदी विभाग : वार्षिक अहवाल

जून २००० में महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपुर की स्थापना के साथ हिंदी विभाग भी स्थापित हुआ है। तब से लेकर हिंदी विभाग इस महाविद्यालय में कार्यरत है। इस महाविद्यालय में यह विभाग निरंतर प्रगति पथ पर अग्रेसर है। इस महाविद्यालय में हिंदी विषय बी.ए.में व्दितीय भाषा एवं ऐच्छिक के रुप में पढाया जाता है। स्नातक स्तर पर हिंदी लेने के लिए छात्र—छात्राओं का बारहवीं कक्षा मे हिंदी विषय ही हो यह आवश्यक नहीं है। किसी भी विषय या संकाय पूर्णकालिन का विद्यार्थी हिंदी विषय ले सकता है।

हिंदी को पढाने के लिए महाविद्यालय के हिंदी विभाग में दो सहायक प्राध्यापक कार्यरत हैं। प्रा.एन.यु.मुळे ३ फरवरी २००४ से हिंदी विभागाध्यक्ष के रुप में कार्यरत हैं तो डॉ.पी.डी.चिलगर ३० नवम्बर २००९ से सहायक प्राध्यापक के रुप में कार्यरत हैं। दोनो पूर्णकालिन हैं।

हर साल महाविद्यालय की शुरुआत जुन में होती है। महाविद्यालय में प्रवेश लेते ही तासिकाएँ सुरु होती हैं। हमारे महाविद्यालय में स्वा.रा.ती.म.वि. नांदेड का सत्रनिहाय पाठयक्रम पढाया जाता है।

हर साल की तरह २०१६—२०१७ मे भी बी.ए.प्रथम,व्दितीय एवं तृतीय वर्ष में प्रवेश लेने के बाद नियमित रुप से हिंदी की तासिकाएँ शुरु हो गई। हिंदी विभाग की गतिविधियों को अंमल में लाने के लिए सभी छात्र—छात्राओं की बैठक बुलाकर हिंदी साहित्य मंडल एवं संपादक मंडल की की स्थापना सत्र के प्रारंभ में की गई। सभियों के साथ चर्चा कर बहुमत से कु.पल्लवी हणमंतराव काळे हिंदी साहित्य मंडल की अध्यक्षा बन गई एवं संपादक मंडल की संपादिका बन गई —कु.स्नेहा सुर्यकांतराव कांबळे। नविर्वाचित सभी पदाधिकारीयों का स्वागत किया गया साथ ही उन्हें हार्दिक शुभकामनाएँ दी गई।

सितम्बर २०१६ में हिंदी दिवस के उपलक्ष्य में हिंदी साहित्य मंडल एवं संपादक मंडल का उद्घाटन समारोह संपन्न हुआ। इस समारोह के लिए

कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती के हिंदी विभागाध्यक्ष डॉ. सादिक शेख प्रमुख अतिथि के रुप में उपस्थित थे। इस सुअवसर पर हिंदी विभाग की 'प्रयास' पत्रिका का विमोचन भी किया गया।

विद्यार्थियों के सर्वांगिण विकास के लिए हिंदी विभाग सदैव तत्पर रहता है। राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा, युवक महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रमों आदि में भाग लेने के लिए छात्र–छात्राओं को सदैव प्रेरित एवं प्रोत्साहित किया जाता है। इसके परिणामस्वरुप अनेक विद्यार्थियों ने उपर्युक्त विभागों में उल्लेखनीय काम किया है। सालभर सभियों ने मिल–जुलकर काम किया और सफलता प्राप्त की।


हिन्दी दिवस
14 सितंबर



## महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर

हिंदी विभाग - छायांकित

आसूड २०१६-१७



'होली विशेषांक' का विमोचन प्रधानाचार्य डॉ.वसंत बिरादार के करकमलोंसे



'गणतंत्र दिवस विशेषांक' का विमोचन करते हुए मा.प्रधानाचार्य डॉ.वसंत बिरादार




हिंदी साहित्य मंडल के उद्घाटन समारोह पर मार्गदर्शन करते हुए डॉ.सादिक शेख।

# इंग्रजी विभाग

***<u>'A cashless economy is secure, it is clean. You have a leadership role to play in taking India towards an increasingly digital economy.'</u>***

– N.Modi



**Mr. Atish Akade**
H.O.D.Dept. of English

## Annual Report : English Department

The department of English is one of the leading departments in the college. The department conducts various activities for the enrichment of students such as seminars, group discussion & unit tests.etc.

The English Literary Association was inaugurated with all its splendor and grandeur. Asst.Prof. Mr. S. T.Jadhav, Head, Department of English, B.K.D. Mahavidyalaya Chakur was the inaugurator and chief guest of this festive day. Hon'ble Principal Dr. Vasant Biradar was the Chairperson of this inaugural function.

The department through the English Literary Association runs wallpaper 'Prism'. It was also inaugurated by Asst.Prof. Mr. S. T.Jadhav. The department is excelling in its research contribution through publication of research papers and presentation in seminar and conference at various levels.



# महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

## इंग्रजी विभाग - छायांकित

आसूड २०१६-१७




विभागाचा वाङ्मय मंडळ उद्घाटन समारंभ

' प्रीझम' भित्तीपत्रक प्रकाशन सोहळा






विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ.वसंत बिरादार

# संस्कृत विभाग

*'धनाने भरलेल्या तिजोरीची किल्ली ज्ञानरूपी चावीनेच उघडते.'*



**प्रा.डॉ.प्रशांत बिरादार**
विभाग प्रमुख

# संस्कृत विभाग : वार्षिक अहवाल

किसान शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलितमहात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूरची स्थापना जून 2000 मध्ये झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेसोबतच संस्कृत विभागाचीही स्थापना झाली. तेव्हांपासून आजपर्यंत संस्कृत विभागाची घोडदौड प्रगतीच्या दिशेने अविरत चालू आहे. या विभागात बी.ए.कला शाखा अंतर्गत संस्कृत हा ऐच्छिक विषय शिकविला जातो. बारावीला संस्कृत भाषा नसणार्‍या विद्यार्थ्यांनाही बी.ए. ला संस्कृत भाषा घेऊन शिकता येते व संस्कृत साहित्याचा आनंद घेता येतो.उत्तराचे माध्यम मराठी,हिंदी इ. मातृभाषाही ठेवता येते.

● दिनांक05 जुलै 2016 रोजी संस्कृत विभागाद्वारे **'महाकवी कालिदास दिन'** साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमूख अतिथी व मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील भूगोल विभागप्रमुख **प्रा.डी.एन.माने** सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील** होते. तसेच प्रमूख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे **अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी.डी. चौधरी सर** उपस्थित होते.

● बी.ए.प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची एकत्रित बैठक बोलावून '**संस्कृत वाङमय मंडळ' व 'संपादक मंडळाची स्थापना**' करण्यात आली.

●संस्कृत वाङमय मंडळ व संपादक मंडळाने महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.वसंत बिरादार** व विभागप्रमुख डॉ.प्रशांत बि.बिरादार यांच्या साह्याने दिनांक 19 जुलै 2016 रोजी महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर. येथे संस्कृत विभागातर्फे **'संस्कृत दिन ववाङ्मय मंडळ उद्‍घाटन कार्यक्रम'**साजरा करण्यात आला. राखी पोर्णिमा किंवा नारळी पोर्णिमेला दरवर्षी संस्कृतदिन साजरा करण्यात येतो.या कार्यक्रमाला प्रमूख अतिथी व मार्गदर्शक म्हणून 'पूण्यश्लोक अहिल्यादेवी महाविद्यालयातील' संस्कृत विभागाचे **प्रा.शंकर धारबा घाडगे** सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील** होते. तसेच प्रमूख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे **अर्थशास्त्र विभागप्रमुखडॉ. डी.डी.चौधरी सर** उपस्थित होते.

●संस्कृत वाङमय मंडळ व संपादक मंडळाने या वर्षामध्येही विविध विषयावर भित्तीपत्रके संपादित करून संस्कृत विभागाच्या शोकेसमध्ये लावलेले आहेत.

● याशिवाय संस्कृत विभागातील विद्यार्थी राष्ट्रिय सेवा योजना शिबीरात, क्रिडा स्पर्धेत व विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रिय सहभागी होतात.

● विविध उपक्रमासोबतच संस्कृत विभागाचा निकालही उज्ज्वल आहे.



# महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर

## संस्कृत विभाग - छायांकित

आसूड २०१६-१७



विभागाव्दारा आयोजित
'कालिदास दिन'

वाङ्मय
मंडळ उद्‌घाटन कार्यक्रम





वाङ्मय मंडळव्दारा
'संस्कृतसुधा' भित्तीपत्रकाचे
प्रकाशन

# इतिहास विभाग

*'आओ चलो इतिहास बनाये । देश की अर्थव्यवस्था कॅशलेस बनाये।'*



**प्रा. डॉ. बब्रुवान मोरे**
विभाग प्रमुख

## इतिहास विभाग : वार्षिक अहवाल

शैक्षणिक वर्ष २०१६–१७ मध्ये इतिहास विभागात बी.ए.प्रथम वर्षासाठी ७१, व्दितीय वर्षासाठी ३२ व बी.ए.तृतीय वर्षासाठी २४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. सर्व प्रथम विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाची माहिती देण्यात आली. इतिहास विभागामार्फत वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात आले. इतिहास विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांमधून इतिहास अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. तसेच इतिहास विषयाच्या ‘संस्कृती’ भित्तीपत्रकाच्या संपादक मंडळाची विद्यार्थ्यामधून निवड करण्यात आली. यावर्षी गिरी नरसिंग याने इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्षपद भूषविले तर कु.रोहिणी माने ही ‘संस्कृती’ भित्तीपत्रकाची संपादक होती. या दोघांनी इतिहास विभागाचे विविध उपक्रम राबवून नावलौकीक प्राप्त केला.

दिनांक २७/०८/२०१७ रोजी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ.एम.डी.दामाजीवाले यांच्या प्रमुख उपस्थितीत इतिहास अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले. इतिहास अभ्यास मंडळाचे पदाधिकारी व ‘संस्कृती’ भित्तीपत्रकाचे संपादक मंडळ यांचा मा.प्राचार्य व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या भव्यदिव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन संपूर्णपणे इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांतर्फे करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी विविध उपक्रमाचे नियोजन इतिहास विभागातर्फे केले जाते. याचसाठी दरवर्षी इतिहास विभागातर्फे सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन केले जाते. कॉलेज जीवनामध्येसुध्दा विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी केला जाणारा हा अभिनव उपक्रम आहे. यावर्षी बी.ए. प्रथम वर्षापासून बी.ए.तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यापर्यंत सर्व विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला. कु.गुलशन पठाण ही सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम आली. मा. प्राचार्यांच्याहस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावर्षी इतिहास विभाग प्रमुख डॉ.बब्रुवान मोरे यांची युनीव्हर्सल रिसर्च ग्राउंड या नांदेड येथील आंतरराष्ट्रीय संशोधनाच्या त्रैमासिकासाठी कार्यकारी मंडळावर संपादक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. याचबरोबर डॉ.संतोष पाटील व डॉ.बब्रुवान मोरे यांनी राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सेमीनारमध्ये सहभाग नोंदविला व संशोधन पेपरचे वाचन केले. तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या दूर शिक्षण विभागाच्या संचालकांनी डॉ.बब्रुवान मोरे यांची एम.ए.इतिहास (दूर शिक्षण) प्रथम वर्षासाठी लेखक म्हणून निवड केली.

याचबरोबर वर्षभरात इतिहास विभागामार्फत गेस्ट लेक्चरचे आयोजन, चर्चासत्र, सेमीनार यांचे आयोजन व नियोजन करुन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देण्यात आले. इतिहास विभागातर्फे महामानवांची जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात आली. इतिहास विभागातर्फे वर्षभर भित्तीपत्रक करुन महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये योगदान दिले जाते. विशेष म्हणजे दर्जेदार निकाल हे इतिहास विषयाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होय.





## महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर
### इतिहास विभाग - छायांकित
आसूड २०१६-१७



अभ्यास मंडळाच्या 'संस्कृती' भित्तीपत्रकाचे प्रकाशन




अभ्यास मंडळ उद्‌घाटन कार्यक्रम



गेस्ट लेक्चर : प्राचार्य डॉ.बबन पवार

# समाजशास्त्र विभाग

## ***'Digital payment, safe payment'***



**प्रा.सतीश ससाणे**
विभाग प्रमुख

## समाजशास्त्र विभाग : वार्षिक अहवाल

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर व्दारा संचलित महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर येथे सन २००० झाली. या शैक्षणिक वर्षापासून समाजशास्त्र विभागाची सुरवात झाली.तेव्हापासून आजपर्यंत या विभागाची यशस्वी परंपरा सातत्यपूर्ण चालू आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला आपले दैवत मानून व महाविद्यालयाचा केंद्रबिंदु ठरवून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी या विभागाच्या वतीने विविध उपक्रमांचे दरवर्षी आयोजन केले जाते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना प्रेरणा, प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थी हा केवळ ज्ञानपिपासू असता कामा नये तर या बरोबरच तो कुटुंब, समाज आणि राष्ट्राचा एक महत्वपूर्ण घटक आहे. त्यामुळे त्याला समाज मन आणि समाजभान ही असले पाहिजे. त्यासाठी त्यांच्यावर चांगले संस्कार घडले पाहिजेत. तो उद्याचा राष्ट्राचा आधारस्तंभ घटक बनला पाहिजे. आदर्श नागरिक बनला पाहिजे. त्यासाठी प्रतिवर्षाप्रमाणे शै.वर्ष २०१६—१७ मध्ये दि.०३/०९/२०१७ रोजी कुमारस्वामी महाविद्यालय औसा येथील सेवानिवृत्त समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.व्ही.एम.मलशेट्टे यांना समाजशास्त्र अभ्यास मंडळ व 'संस्कार' भित्तीपत्रकाच्या प्रकाशन सोहळा कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बोलावण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील होते. या कार्यक्रमाप्रसंगी समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रमुख पाहुणे व प्राचार्य यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना आंबा, चिकू, लिंबू यासारख्या महत्त्वपूर्ण रोपवाटीकेचे वाटप करण्यात आले. १ जुलै २०१६ रोजी २ कोटी वृक्षाचे लक्ष हा उपक्रम महाराष्ट्र शासनाने राबविला होता. महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभागाच्या वतीनेही पर्यावरण संवर्धन पर्यावरणाचे जतन करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांना एक रोपवाटिका देऊन त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी

सोपविली हा अभिनव उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या प्रेरणातून साकार झाला.

बी.ए.प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना एकत्रीत बैठक घेऊन समाजशास्त्र अभ्यास मंडळ व संपादक मंडळातील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. संपादक मंडळ व समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने शै. वर्ष २०१६—१७ मध्ये एक दोन नव्हे तर आठ भित्तीपत्रकाच्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले हे भित्तीपत्रक विविध महापुरुषांच्या जयंती आणि स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारे काढले तसेच विशेष दिनविशेषावर भर टाकणारे काढले, जेणे करुन विद्यार्थ्यांसमोर सतत महापुरुषांच्या कार्याचा आदर्श ठेवा असावा. आणि त्यांच्या सरकाराची जोपासनी अंगी यावी या उद्देशाने संपादक मंडळ आणि अभ्यास मंडळाने सदैव जागरुक राहून कार्य केले. या सर्व गोष्टीच्या पाठीमागे प्राचार्य साहेबांची प्रेरणा असते.

विद्यार्थ्यांमध्ये निर्णयक्षमता वाढावी, बौध्दीकक्षमता वाढावी, समाजातल्या प्रश्नावर चर्चा व्हावी. यासाठी समाजशास्त्र विभागाच्या वतीने सेमीनार, गटचर्चा घेण्यात आल्या. अशा विविध उपक्रमाबरोबर समाजशास्त्र विषयाचा निकालही उत्कृष्ट आहे. निकालाची परंपरा उज्ज्वल आहे.


The Indian Society
BUILDING A BETTER TOMORROW..



# महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

## समाजशास्त्र विभाग - छायांकित

आसूड २०१६-१७




अभ्यास मंडळाव्दारा 'संस्कार' भित्तीपत्रकाचा प्रकाशन सोहळा.

अभ्यास मंडळाचा उद्‌घाटन कार्यक्रम





अभ्यास मंडळाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम.

# राज्यशास्त्र विभाग

## *'कॅशलेस भारत महासत्ता भारत'*



**प्रा. डॉ. प्रकाश चौकटे**
विभाग प्रमुख

## राज्यशास्त्र विभाग : वार्षिक अहवाल

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर व्दारा संचलित, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर येथे स.न.२००० पासून राज्यशास्त्र या ऐच्छिक विषयाची सुरवात झाली. राज्यशास्त्र या विषयाने अगदी अल्पावधीतच भरारी घेतली आहे. राज्यशास्त्र या विभागाने गुणवत्तेसोबत व्यक्तिमत्व विकासाला पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सातत्याने या विभागाचे कामकाज चालू आहे. या वर्षी बी.ए.प्रथम वर्षात राज्यशास्त्र हा ऐच्छिक विषय घेणारे ७३ विद्यार्थी, बी.ए.व्दितीय वर्षात १७, बी.ए.तृतीय वर्षात ०७ विद्यार्थी आहेत. शैक्षणिक वर्षाची सुरवात झाल्यानंतर सुरवातीला सर्व वर्गातील विद्यार्थ्यांचे अभिनदन करण्यात आले.

तसेच या शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस अभ्यास मंडळाची स्थापना करुन, अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन प्रा.कारीकटे सर, कै. दुंडामहाराज महाविद्यालय, देगलूर, जि.नांदेड यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बंधुता या नावाच्या भितीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ.वसंत बिरादार तसेच अभ्यास मंडळाचे अध्यक्ष गोरे परमेष्वर गोविंदराव व संपादक मंडळाचे मुख्य संपादक शेख नीलोफर नबी महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.डी.डी.चौधरी हेही उपस्थित होते.

तसेच राज्यशास्त्र विभागामार्फत भित्तीपत्रकाच्या विविध विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले. मतदार जागृती अभियान शहरात रॅली काढून राबविण्यात आले. महिला दिनानिमित्य कर्तबगार माझी विद्यार्थिनी कु. प्रा.शेख खैरून व कैगादे वैषाली यांचा सत्कार महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या हस्ते करण्यात आला.याशिवाय अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले गेले त्यात वादविवाद, गटचर्चा, गेस्ट लेक्चेर्स इ.समावेश होता.



# महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर

## राज्यशास्त्र विभाग - छायांकित

आसूड २०१६-१७



माजी विद्यार्थी सत्कार समारंभ.

विभागाच्या वतीने
'मतदान जागृती रॅली'






अभ्यास मंडळाचे 'बंधुता'
भित्तीपत्रकाचा प्रकाशन सोहळा

# भूगोल विभाग

***<u>'Present is the key of past and future'</u>***



**प्रा.दिगंबर माने**
विभागप्रमुख



**प्रा. सचिन गर्जे**
सहा. प्राध्यापक

# भूगोल विभाग : वार्षिक अहवाल

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर व्दारा संचलित महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर येथे सन २००० पासून भूगोल या ऐच्छिक विषयाच्या अभ्यासाला सुरुवात झाली. अल्पावधीतच हा विषय विद्यार्थीप्रिय झाला भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली. भूगोल विभागात मी. प्रा.दिगंबर माने व माझे सहकारी प्रा.सचिन गर्जे कार्यरत आहोत. गेल्या १६ वर्षात भूगोल विभागाने विद्यार्थ्यांना अधिकाधिक उपयोजित ज्ञान देण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला आहे. भविष्यात अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय ज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यासाठी आमचा विभाग वचनबध्द आहे. महाविद्यालयाच्या उज्ज्वल यशाच्या परंपरेत भूगोल विभागाचे विशेषत: विद्यार्थ्यांचे योगदान नक्कीच उच्च कोटीचे आहे. भूगोल विषयातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात तसेच विद्यापीठ स्तरावर सर्वाधिक गुण घेऊन महाविद्यालयाचा, विभागाचा नावलौकीक वाढवला आहे.


सन २०१६—१७ मध्ये बी.ए.प्रथम वर्षात ५८, व्दितीय वर्षात २५ व तृतीय वर्षात २३ विद्यार्थी भूगोल विषयाचे अध्ययन करत आहेत. शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाल्यानंतर भूगोल अभ्यास मंडळाची बैठक ४/९/२०१६ रोजी संपन्न झाली. लोकशाही पध्दतीने विद्यार्थ्यांच्या निवडणुका घेऊन भूगोल अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली.दि.१३ ऑगस्ट रोजी भूगोल अभ्यास मंडळाचे उद्घाटन प्रा.ज्ञानेश्वर फाजगे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाविद्यालय, राणीसावरगांव यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी 'वसुधंरा' या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील होते. भूगोल अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी कु.शेख आसमा व उपाध्यक्षपदी गोरे शंकर यांची निवड झाली.

भित्तीपत्रकाचे संपादक मंडळ—संपादक कमल बयास सहसंपादक कु. सलगर किरण, प्रसिध्दी प्रमुख हौसे अनंत इ. विद्यार्थी होते. भूगोल विभागात

दरवर्षी महत्त्वपूर्ण दिवस, क्षेत्रमापण, क्षेत्रभेटी, सहल इत्यादी आयोजन करण्यात येते.

१४ जानेवारी हा दिवस 'भूगोल दिन' साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणन महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.डी.डी.चौधरी यांनी मार्गदर्शन केले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील होते. दि. २/३/२०१७ रोजी बी.ए.तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची भौगोलिक सहलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी तेरु प्रकल्प, मलेअप्पा, संजीवनी बेट वडवळ, साईनंदनवन परिसर चाकूर या ठिकाणांना भेटी देण्यात आल्या.




N
NW
NE
W
E
SW
SE
S
© Can Stock Photo - csp2980149



# महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

## भूगोल विभाग - छायांकित

आसूड २०१६-१७



अभ्यास मंडळाचा
उद्‌घाटन समारंभ

अभ्यास मंडळाच्या
'वसुंधरा' भित्तीपत्रकाचे प्रकाशन






अभ्यास मंडळ
आयोजित कार्यक्रम.

# अर्थशास्त्र विभाग

*'अर्थव्यवस्थेचा विनाश झाल्यास, श्वास घेत असूनही हे जग नष्ट होईल'.*

—कौटिल्य



**प्रा.डॉ.दुर्गादास चौधरी**
विभागप्रमुख

## अर्थशास्त्र विभाग : वार्षिक अहवाल

शैक्षणिक वर्ष २०००—०१ पासून महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग कार्यरत आहे. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसोबत व्यावहारिक, ज्ञानात्मक विकास आणि व्यक्तीमत्वाचा बहुआयामी विकास घडावा या हेतुने अर्थशास्त्र विभाग यशस्वीपणे प्रयत्नरत राहिलेला आहे.

विद्यार्थ्यांना सैध्दांतिक ज्ञानासोबत व्यावहारिक ज्ञान होण्यासाठी त्यांच्यातील कौशल्य विकास होण्यासाठी प्रेरणात्मक कार्यक्रमाची आखणी व कार्यक्रमाची यशस्वीता मा.प्राचार्यांच्या मार्गदर्शनाने साध्य करत राहिलेला आहे. त्याचीच एक सुरवात म्हणून शै.वर्ष २०१६—१७ च्या प्रारंभी प्रवेशीत विद्यार्थ्यांचे स्वागत व अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली.

अर्थशास्त्र विभाग, अभ्यास मंडळाच्या साहयाने विद्यार्थी प्रबोधनाचे, त्यांच्यातील संशोधन कृती, विविध कौशल्ये अंगभूत सुप्त गुण प्रगट व्हावेत यासाठी सेमीनार, गटचर्चा व भित्तीपत्रक इ.माध्यमातून प्रयत्नरत राहिलेला आहे.

यशवंत महाविद्यालय, नांदेड येथील अर्थशास्त्र विभागाचे डॉ.डी.डी. भोसले व अन्य मान्यवरांचे विविध विषयावर मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले. रोकडरहित व्यवहार, डीजीटल इंडिया, या विषयानुसंगाने विविध माध्यमातून मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय सेवा योजना व अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या समन्वयाने रोकड विरहीत भारत या विषयावर विद्यार्थ्यांना व्यावहारिक मार्गदर्शन केले तसेच वार्षिक शिबीर घेतलेल्या 'उगिलेवाडी' गावातील ग्रामस्थांना रोकडविरहीत व्यवहारांचे महत्त्व व साधने यावर मार्गदर्शन व प्रबोधन अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी केले व ग्रामस्थांना कॅशलेस व्यवहारासाठी प्रोत्साहीत केले.

अर्थशास्त्र संपादक मंडळाने या शैक्षणिक वर्षात विविध महत्त्वपूर्ण आर्थिक घडामोडीची माहिती सर्व विद्यार्थ्यांना कळा यासाठी 'अर्थस्पंदन'

भित्तीपत्रकाचे विविध विशेषांक मा.प्राचार्य साहेबांच्या प्रोत्साहनाने विमोचित केले. अर्थशास्त्राच्या अर्थस्पंदन भित्तीपत्रकाचे कौतुक मा.प्राचार्य साहेबांनी अर्थशास्त्राचे 'अर्थस्पंदन' हे अर्थव्यवस्थेतील आर्थिक स्पंदनाची जाणीव करुन देणारे व आर्थिक घडामोडीचे ज्ञान देणारे एक प्रमुख साधन ठरले आहे, असे कौतूक केले.

विद्यार्थ्यांना व्यावहारिक व कौशल्ययुक्त माहिती मिळावी या उद्देशाने 'अभ्यास भेट' उपक्रमा अंतर्गत जागृती मल्टीस्टेट सहकारी पतसंस्था, अहमदपूर येथे अभ्यास भेट अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी देऊन सहकारी पत संस्थांच्या कार्याची माहिती व उच्चमुल्यांच्या नोटबंदीचा पतसंस्थेवर होणारा परिणाम या अनुषंगाने माहिती युक्त ज्ञान घेतले.

अर्थशास्त्र विभाग वरील प्रमाणे विविध उपक्रम राबवून 'विद्यार्थी केंद्रीत' कार्य यशस्वीपणे पूर्ण करताना उज्ज्वल निकालाची परंपरा सातत्यपूर्ण ठेवत राहिलेला आहे.





# महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर

## अर्थशास्त्र विभाग - छायांकित

आसूड
२०१६-१७



विभागाचे विविध आयोजित कार्यक्रम.

'जागृती'सहकारी पतसंस्थेस शेक्षणिक भेट.





अभ्यास मंडळाचे 'अर्थस्पंदन' भित्तीपत्रकाचे प्रकाशन.

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग वार्षिक अहवाल

*'हम सब मिलकर देश का जग में नाम जगायेगे। एन.एस.एस का परछम लेकर भारत को रोकडरहित बनायेंगे।।'*



**प्रा.डॉ.पी.डी.चिलगर**
कार्यक्रमाधिकारी

आपल्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे 'एकक' (युनिट) सन २००२—०३ पासून कार्यरत आहे. महाविद्यालयातील एक क्रियाशील विभाग म्हणून एन.एस.एस. नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०१६—१७ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मा. प्राचार्य डॉ.वंसत बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी डॉ.पांडुरंग चिलगर यांनी विविध उपक्रम राबविले. या संबंधीचा सविस्तर अहवाल या प्रमाणे आहे.

मे—जून २०१६ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाच्या वतीने आव्हान २०१६ या राज्यस्तरीय शिबीरामध्ये आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी १). गोरे शंकर बाबुराव—बी.ए.व्दितीय वर्ष व २.) होळे श्याम साहेबराव—बी.ए.तृतीय वर्ष यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे यशस्वीरित्या नेतृत्व केले.

नवी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन परेड संचलनासाठी जिल्हास्तरावरुन नागरगोजे हरिश्चंद्र बालाजी व गोरे शंकर बाबुराव यांची निवड झाली. राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलनाकरिता जिल्हानिवड समितीवर आमच्या महाविद्यालयाचे प्राध्यापक तथा कार्यक्रमाधिकारी डॉ.पांडुरंग चिलगर यांनी निवडसमिती सदस्य म्हणून यशस्वी भूमिका पार पाडली. केलेल्या राजमाता जिजाऊ उद्यानाचे संगोपन संवर्धन तसेच नवनवीन वनस्पतीचे रोपन करुन महाविद्यालय परिसर अत्यंत अल्हाददायक, पर्यावरणीय दृष्टीने समृध्द करण्याचे काम वर्षभर आमचे एन.एस.एस. विद्यार्थी करीत असतात.

भारत सरकारने सुरु केलेली 'रोकड रहित भारत' ही मोहिम महाविद्यालयाने यशस्वी केली. या संबंधीची कार्यशाळा विषयतज्ज्ञ डॉ.डी.डी. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ६ जानेवारी २०१७ रोजी घेण्यात आली. तसेच विद्यापीठ स्तरीय रोकड रहित कार्यशाळेत कार्यक्रमाधिकारी डॉ.पांडुरंग चिलगर यांच्यासह कु.शिल्पा कदम व सतीश बुधवारे या विद्यार्थ्यांनी यशस्वी सहभाग नोंदविला.

या बरोबरच विद्यापीठाच्या वार्षिक नियोजनाप्रमाणे महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम, रक्तदान जनजागृती व रक्तदान शिबीर आरोग्य तपासणी शिबीर प्रसिध्द स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.मणकणी चिवडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.तसेच एड्स जन—जागरण, मतदार जागरण रॅलीचे आयोजन ही करण्यात आले.

महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या मौजे उगिलेवाडी येथे दि.१० फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी २०१७ या दरम्यान वार्षिक विशेष शिबीराचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले. शिबीर काळातच नव्हे तर वर्षभर मौजे उगिलेवाडी

या गावाचा विकास करण्याकरीता आमचे महाविद्यालय प्रयत्नशील असते. यामुळेच मौजे उगिलेवाडीला १०० टक्के धूरमुक्त व हगणदारी मुक्त करण्यात आम्ही यशस्वी झालो.

अशा प्रकारे या शैक्षणिक वर्षात सामाजिक बांधिलकी जोपासत राष्ट्रीय कार्य तसेच विविध उपक्रम राबविण्यात आले. या करिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील साहेबांचे नेहमीच मार्गदर्शन लाभले या बरोबरच महाविद्यालयातील सर्व कर्मचारी प्राध्यापक बंधू भगिनी, कार्यालयीन कर्मचारी व एन.एस.एस.च्या सर्व स्वयंसेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले. याबद्दल सर्वांचे आभार!

**NOT ME BUT YOU**

# क्रीडा विभाग वार्षिक अहवाल

***<u>'Be smart be digital'</u>***



**प्रा.डॉ.ए.एस.मोरे**
क्रीडा संचालक

## वार्षिक अहवाल

**आंतर विद्यापीठ संघात निवड झालेले खेळाडू:**

१) कु.माने रोहिणी : गुरु नानक देव विद्यापीठ, पंजाब येथे तलवारबाजी विद्यापीठ संघात निवड.

२) मुंढे कमलाकर : गुरु नानकदेव विद्यापीठ, अमृतसर (पंजाब) येथे विद्यापीठ तलवारबाजी संघात निवड.

३) हारणे गोपाळ : एस.आय.एम. विद्यापीठ, चेन्नई येथे बॉल बॅडमेन्टन स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड.

४) राठोड किरण : विद्यापीठ हॅन्डबॉल संघात उदयपूर येथे निवड.

# सांस्कृतिक विभाग वार्षिक अहवाल



• डॉ.बब्रुवान मोरे
सांस्कृतिक विभाग प्रमुख

इ.स. २०१६—१७ या शैक्षणिक वर्षात महात्मा फुले महाविद्यालयात सांस्कृतिक विभागातर्फे विविध उपक्रम राबवून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्यात आले.

**१) महाराष्ट्र शासन स्वच्छता करडंक प्रथम व व्दितीय पारितोषिक:**

महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातर्फे घेण्यात आलेल्या तालुका स्तरीय स्वच्छता करंडक वक्तृत्व स्पर्धेत गिरी नरसिंग राजेंद्र हा प्रथम तर कु.माने रोहिणी मारोतीराव हिला व्दितीय पारितोषीक प्राप्त झाले. गटविकास अधिकारी मा.श्री.नितीनजी दाताळ यांच्या हस्ते गिरी नरसिंग राजेंद्र याला पाच हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक व प्रमाणपत्र तर कु. माने रोहिणी मारोतीराव हीस तीन हजार रुपये व प्रमाणपत्र मिळाले.

**२) महाराष्ट्र शासन स्वच्छता करंडक जिल्हास्तरीय सहभाग:**

महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातर्फे घेण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय स्वच्छता मित्र करंडक स्पर्धेत अहमदपूर तालुक्यातून

प्रथम व व्दितीय आलेल्या गिरी नरसिंग व कु.माने रोहिणी यांनी सहभाग नोंदवून वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला व त्यांना सहभागाचे प्रमाणपत्र मिळाले.

**३) गांधी विचार संस्कार परीक्षा सिलव्हर मेडल प्राप्त:**

गांधी विचार संस्कार परीक्षा जळगाव केंद्राव्दारे दरवर्षी घेण्यात येते यावर्षी प्रा.नागराज मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या परीक्षेत कु. माने रोहिणी मारोतीराव या विद्यार्थीनीस सिल्वर मेडल मिळाले वतिने लातूर जिल्हयात व्दितीय पारितोषिक प्राप्त केले.

**४) मराठवाडा स्तरीय वादविवाद स्पर्धेत सहभाग:**

वसुंधरा महाविद्यालय घाटनांदूर जि.बीड येथे आयोजित मराठवाडा स्तरीय विद्यापीठ वाद विवाद स्पर्धेत गोरे शंकर व होळे शाम या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**५) 'बेटी बचाव' महाराष्ट्र राज्य जनजागृती कार्यक्रम:**

सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती कृष्णाबाई संभाजी इंगळे रा.सातेगाव ता. पालम जि.परभणी यांनी 'बेटी बचाव' महाराष्ट्र राज्य जनजागृती कार्यक्रम दि. १८/०१/२०१७ रोजी महाविद्यालयात सादर केला. या कार्यक्रमात त्यांनी प्रमुख प्रबोधन पुढील विषयावर केले.

१. लेक वाचवा, टिकवा व शिकवा
२. हुंडाबळी व स्त्रीभ्रूण हत्या.
३. मुलांनी हुंडा घ्यायचा नाही व आपल्या बहिणीला द्यायचा नाही.
४. मुला—मुलीमध्ये भेदभाव का?

६) जयंत्या व पुण्यतिथ्यांचे आयोजन :

महाविद्यालयात सांस्कृतिक विभागातर्फे विविध जयंत्या व पुण्यतिथ्यांचे आयोजन केले जाते. मा. प्राचार्य साहेबांच्या नेतृत्वाखाली महात्मा फुले परिवारातर्फे अहमदपूर शहरात शोभायात्रा काढून शिवजयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन करण्यात आले.

महात्मा फुले जयंती, महात्मा फुले स्मृतिदिन, छत्रपती संभाजी बलीदान दिन, शहीद दिन, महात्मा गांधी जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, युवक दिन, राजमाता जिजाऊ जयंती, शहाजीराजे जयंती, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, हैद्राबाद मुक्तीदिन, महाराष्ट्र दिन असे अनेक कार्यक्रम सांस्कृतिक विभाग आयोजित करतो.

**७) विविध कार्यक्रमाचे आयोजन:**

बी.ए. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत कार्यक्रम, बी.ए.तृतीय वर्ष विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम घेण्यात आला. याबरोबरच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वाद—विवाद स्पर्धा, निबंध लेखन वक्तृत्व स्पर्धा, आयत्यावेळचे भाषण, रांगोळी स्पर्धा, एकपात्री नाटक इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

**८) वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन:**

सांस्कृतिक विभागातर्फे भव्यदिव्य स्वरुपाच्या वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्याचे कार्य या माध्यमातून होतो. प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करुन वार्षिक स्नेह मेळावा संपन्न झाला.

**९) माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा:**

सांस्कृतिक विभागातर्फे माजी विद्यार्थ्यांचा एक दिवशी स्नेह मेळावा घेण्यात आला. माजी विद्यार्थी या दिवसी कॉलेज मध्ये येऊन जुन्या आठवणींना उजाळा देतात. व यामुळे कॉलेज व माजी विद्यार्थी नाते संबध दृढ होतात. म्हणूनच दरवर्षी माजी विद्यार्थी स्नेह मेळावा घेणे हे आमच्या महाविद्यालयाचे वैशिष्टये होय.

# परीक्षा विभाग वार्षिक अहवाल



प्रा.एन.यु.मुळे
परीक्षा विभाग

परीक्षा विभाग महाविद्यालयातील एक सक्षम विभाग आहे.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार महाविद्यालयात परीक्षा विभाग कार्यरत आहे. २०१६–१७ या वर्षाचे सत्रनिहाय अंतर्गत मूल्यांकन गुण याद्या तयार करुन त्या महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडे पाठविण्यात आल्या. या कामी परीक्षा विभागाने सर्व प्राध्यापकांना वेळोवेळी सूचित केले होते. यावेळी प्रथमच स्वा.रा.ती.म.वि.नांदेडने उन्हाळी २०१७ पासून परीक्षेच्या कामकाजाचे विकेंद्रिकरण करुन परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याचे आदेश दिले होते.त्यानुसार हिवाळी २०१६ व उन्हाळी २०१७ च्या बी.ए.च्या परीक्षेसाठी परीक्षा विभागाने स्वतंत्र गोपनीय कक्ष, स्वतंत्र मूल्यांकन कक्ष व संकलन कक्ष स्थापन करुन त्यानुसार ऑनलाईन प्रश्नपत्रिका काढणे, त्या सिलबंद पाकिटातून सहकेंद्रप्रमुखामार्फत वितरित करणे, उत्तरपत्रिकांचे कोडींग करणे, मूल्यांकन कक्षामार्फत उत्तरपत्रिका तपासणे व त्या विद्यापीठाकडे वेळेत पाठवणे इ.कामे परीक्षा विभागाने अत्यंत जबाबदारीने पार पाडल्या

आहेत. उन्हाळी २०१६ च्या परीक्षेसाठी सहकेंद्रप्रमुख म्हणून संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट जि. लातूरचे प्रा.पस्तापुरे आर.एम. यांनी काम केले. प्रा.डी.एन.माने हे केंद्रप्रमुख होते. हिवाळी २०१६ च्या परीक्षेचे सहा.केंद्रप्रमुख म्हणून डॉ.पी.बी.बिरादार व उन्हाळी २०१७ च्या परीक्षेचे सहा.केंद्रप्रमुख म्हणून प्रा.एन.यु.मुळे यांनी काम केले. परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्वांचे सहकार्य मिळाले.

तसेच दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी महाविद्यालयाने निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र  वार्षिक अहवाल



प्रा.डॉ.अनिल व्यंकटराव मुंढे
केंद्रसंयोजक

‘ज्ञानगंगा घरोघरी’ हे ब्रीद धारण करुन शिक्षणापासून वंचित राहिलेल्या सर्व घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेणारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आज घराघरात पोहचलेले आहे. १ जुलै १९८८ रोजी महाराष्ट्र विधीमंडळ कायद्यानुसार स्थापन झालेले हे विद्यापीठ गरजू, होतकरु व वंचितांना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाची सोय प्राप्त करुन देत आलेले आहे.

महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूरमध्ये शैक्षणिक वर्ष २०११—१२ पासून हे अभ्यासकेंद्र कार्यरत आहे. अल्पावधीतच या अभ्यासकेंद्राकडे अधिकाधिक विद्यार्थ्यांचा ओढा वाढत आहे. अहमदपूर व परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कार्य या केंद्राव्दारे अविरत चालू आहे. दरवर्षी शेकडो विद्यार्थी पदवीधर होऊन नोकरी, व्यवसायाचा लाभ घेत आहेत.

आपल्या महाविद्यालयात पूर्वतयारी, बी.ए, एम.ए (मराठी) हे अभ्यासक्रम शिकण्याची सोय उपलब्ध असून २०१६–१७ मध्ये एकूण ४९८ विद्यार्थी प्रवेशित होते. या विद्यार्थ्यांना दर रविवारी समंत्रण संत्राच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन करण्याचे कार्य महाविद्यालयातील अभ्यास केंद्राच्या मान्यता प्राप्त समंत्रकांनी केले आहे.

महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ.वसंत बिरादार हे केंद्रप्रमुख असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासकेंद्राची यशस्वी वाटचाल सुरु आहे. प्रा.डॉ. अनिल मुंढे केंद्रसंयोजक म्हणून तर डॉ.संतोष पाटील सहाय्यक आणि श्री. अरुण गिरी शिपाईपदी कार्यरत आहेत. अभ्यास केंद्राच्या नियोजनात दरवर्षी विद्यापीठीय परीक्षेचे केंद्र यशस्वीपणे परीक्षा महाविद्यालयात घेते. यावर्षी जवळपास १०६० विद्यार्थ्यांच्या परीक्षा अभ्यासकेंद्रावर झाल्या आहेत.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र चालवताना आम्हाला महाविद्यालयाचे कर्तव्यदक्ष प्राचार्य डॉ. वसंत बिरादार हे सतत मार्गदर्शन करतात. पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश देऊन आमच्यावर विश्वास टाकल्याने शिक्षणाचे गुणात्मक कार्य करणे सुलभ होत आहे. यापुढेही हे कार्य अखंडपणे चालणार आहे.

# Department of Library Annual Report

*'Books are for use'*

*-S.R.Rangnathan.*



**Asst.Prof. Ingle P.M.**

Librarian

Library is a 'Heart' of the College. Teaching and learning system are supported by library through reading material. College Central Library has established in 2000 for students as well as for faculty members. Library is well prepared with reference books, textbooks, journals, periodicals and newspapers etc.

In this academic year 2016-17 library has take various orientation programme to the library users. Also on the special vocation, we have arranged the books exhibition.This year we arranged books exhibition on **"Marathi pandharawada 01 Jan.To 15 Jan.2017."**

Also library has organized the orientation to new users for use of library services; give the information about the library rules and regulations.And welcomes to

new admit first year students in the college.Also library has celebrated birth anniversary of Dr.S.R.Ranganathan. This academic year library has purchased **102** books and one book is donated. Total collections of books are **7866**.

In this academic year **16** periodicals are subscribed for one year and seven newspapers are purchased for library. Also **194** users are using the library reading materials in this year. Library has launched last two years book bank scheme, scholar student card and demand on books these services are given by the library.Library is also started new "**Wachan sanskratisamrudhi yojana**". Library has giving Current awareness service, newspaper clipping service, and SMS alert service on what's up for primary using for only teachers.

Library collections of this year are following….

| Sr.no. | Subject | Textbooks/References |
|---|---|---|
| **01** | Marathi | 39 |
| **02** | Hindi | 07 |
| **03** | English | 18 |
| **04** | Political Science | 03 |
| **05** | History | 09 |
| **06** | Economics | 06 |
| **07** | Competative Exam | 20 |
| **08** | Other | 01 |
| | **Total** | **103** |

## Following services are provided by the library:

- Reference services
- Circulations.

- User orientation and information literacy.
- Reading room.
- Newspaper clipping service.
- Inter library loan.
- Wachan sanskrati samrudhi yojana

**Library staff:**

Following library staff is available for the users.

Mr. Ingle P.M. (Librarian)

Mr. Malkapure W.K. (Lib. Attended)

**Library advisory committee**

Dr. Biradar V.M. {President}

Mr. Ingle P.M. {Secretary}

Dr. Choudhary D.D. {Member}

Mr.Mundhe A.V. {Member}

Mr. Gurnale V.D. {Member}

# गांधी विचार संस्कार परीक्षा अहवाल

***'अहिंसा परमो धर्मः'***
***— महात्मा गांधी***



प्रा.एन.यु.मुळे
समन्वयक

शैक्षणिक वर्ष २०१३—१४ पासून दरवर्षी आमच्या महाविद्यालयामध्ये गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगावच्या गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन केल जाते. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये गांधीजींचे विचार रुजविण्याच्या उदात्त ध्येयाचे प्रेरित होऊन ही परीक्षा घेतली जाते.

शैक्षणिक वर्ष २०१६—१७ मध्ये आमच्या महाविद्यालयातील बी.ए. प्रथम,व्दितीय व तृतीय वर्षातील एकूण ४३ विद्यार्थी या गांधी विचार संस्कार परीक्षेस बसले होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून ०२ ऑक्टोंबर २०१६ रोजी ही परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेमध्ये बी. ए.तृतीय वर्षाची कु.माने रोहिणी मारोतीराव ही विद्यार्थिनी लातूर जिल्हातून गुणानुक्रमे सर्व व्दितीय आली. तिच्या या यशाबद्दल प्रमाणपत्र व रजतपदक

देऊन महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ.वसंत बिरादार यांच्या हस्ते तिचा यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच १९ डिसेंबर २०१६ रोजी शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव येथे या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व प्रमाणपत्र वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाध्ये कु.माने रोहिणी मारोतीराव हिचा सत्कार करण्यात आला. तसेच परीक्षा समन्वयक म्हणून प्रा.एन.यु.मुळे यांना प्रशस्तीपत्र व महाविद्यालयाला सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून मा.भुजंग बोबडे (जळगाव) हे उपस्थित होते.

गांधी विचार संस्कार परीक्षेचे वैशिष्टये असे की, यामध्ये मुलींची संख्या अधिक होती आणि या परीक्षेमध्ये कु.माने रोहिणी ही मुलगीच रजत पदाची मानकरी ठरली हे विशेष!



**'अहिंसा परमो धर्मः'—म.गांधी**



The primary pitch and narrative of the demonetisation drive by Prime Minister Narendra Modi seems to have taken a major shift to cashless economy from the initial key highlights of war against black money, corruption and counterfeit currency. That's the inference one can draw from the PM's *Mann Ki Baat* speech on Sunday.

"Our dream is that there should be a cashless society. This is correct that 100 percent cashless society is never possible. But we can make a start with less-cash society, then cashless society will not be a far-off destination," Modi said in the programme. A significant part of the radio programme was devoted to the youth with the PM calling out to make the transition happen first to a

'less-cash economy' and a 'cashless' economy later. There was mention about black money, but the core of the talk was change to a cashless economy.

The PM urged people to start using cash substitutes like debit cards and digital wallets, saying it will make transactions cheaper and easier and in the long-term it will help India "leapfrog into a less cash-use economy at par with more developed nations."

"We are also urging banks to make a big push with PoS (Point of Sale) machines with traders so that debit card use becomes more prevalent," Modi said…. (Published Date: Nov 28, 2016 11:32 am | Updated Date: Feb 06, 2017 02:54 pm)

छात्र आम्ही एम.पी.एम.चे। घडवू राष्ट्र उद्याचे।।

# आसूड

# महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर

२०१६-१७



स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा



ग्रंथालयाच्या वतीने नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ




महाविद्यालयाचे राजमाता 'जिजाऊ उद्यान'



राष्ट्रीय सेवा योजनेने दत्तक घेतलेले उगिलेवाडी हे गाव




महाविद्यालयाचे विलोभनीय प्रस्थान व्दार

'आसूड' या अंकाचे प्रकाशक प्राचार्य डॉ.वसंत बिरादार हे असून यातील लेखातील आशयाशी प्रकाशक व संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

# आसूड महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर

२०१६-१७




महाविद्यालयात विद्यापीठस्तरीय आंतरमहाविद्यालयीन 'नेटबॉल व बॉलबॅडमिंटन' स्पर्धेप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.अशोकराव पाटील एकंबेकर उद्घाटकीय भाषण करतांना



सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतांना महाविद्यालयाचे विद्यार्थी



श्रमदान करत असतांना रा.स.यो.चे स्वंयसेवक विद्यार्थी



महाविद्यालयातील ग्रंथ प्रदर्शन




स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन